• पुणे, सोमवार, २१ एप्रिल २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 143 • वर्ष ४ थे, अंक १४३ • किंमत ₹ ६ • पाने : १२



भ्रष्टाचाराची 'जेसीबी खोदाई' P३

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



बंगळुरू विजयी १२

## भाजपाचे तब्बल २३ मंडल अध्यक्ष; निवडीमध्ये ना. मोहोळ यांचा वरचष्मा!

**पुणे : शहर भाजप मंडल अध्यक्ष निवडीची प्रक्रिया पूर्ण झाली असून, भाजपने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लक्षात घेऊन तब्बल २३ मंडळ अध्यक्षाच्या घोषणा केल्या. वाढीव अध्यक्ष संख्या मुळे संघटना अधिक बळकट होणार की उमेदवारीसाठीची स्पर्धा तीव्र होणार हे लवकरच कळेल . तथापि भाजपा अंतर्गत तीन नेत्यांच्या सुप्त सत्तासंघर्षात केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांचा या मंडळ अध्यक्ष विस्तार आणि निवडीवर वरचष्मा दिसत आहे.**

शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी सर्व मंडलांच्या अध्यक्षांच्या नावांची घोषणा प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे. यांमध्ये हडपसर (४ मंडल), कसबा (३ मंडल), शिवाजीनगर (३ मंडल), कोथरूड (३ मंडल), वडगावशेरी (४ मंडल), कॅन्टोन्मेंट (२ मंडल), पर्वती (३ मंडल) आणि खडकवासला (४ मंडल) अशा विधानसभा निहाय 26 मंडल अध्यक्षांची निवड प्रक्रिया झाली.

**निवड झालेल्या अध्यक्षांची नावे पुढीलप्रमाणे**

१. लोहगाव - धानोरी- श्री संदीप मोझे
२. विमाननगर सोमनाथ नगर-श्री नितीन जाधव
३. खराडी वडगावशेरी-श्री आशिष देशमुख
४. येरवडा-श्री रमेश गव्हाणे
५. शिवाजीनगर दक्षिण-श्री शैलेंद्र बडदे
६. शिवाजीनगर उत्तर-श्री आनंद छाजेड
७. खडकी-श्री शाम काची
८. कोथरूड उत्तर (बाणेर बालेवाडी पाषाण) - श्री लहू बालवडकर
९. कोथरूड मध्य - श्री निलेश कोंढाळकर
१०. कोथरूड (एरंडवणे, कर्वेनगर) - श्री कुलदीप सावळेकर
११. पर्वती - सिंहगड रोड - श्री राजू कदम
१२. मार्केट यार्ड - श्री निखिल शिळीमकर
१३. तळजाई-श्री प्रशांत थोपटे
१४. कोरेगाव पार्क घोरपडी वानवाडी डायस प्लॉट -पुणे कॅनटोणमेंट बोर्ड- श्री सुशांत निगडे
१५. ससुन - पुणे स्टेशन - ताडीवाला रोड भवानी रोड -काशीवाडी- सोमवार पेठ मंगळवार पेठ - रास्ता पेठ- श्री विशाल कोंडे
१६. कसबा गणपती - श्री अमित कंक
१७. समता भूमी - श्री छगन बुलाखे
१८. क्रांतिवीर उमाजी नाईक - श्री प्रशांत सुर्वे
१९. धनकवडी बालाजीनगर - श्री महेश भोसले
२०. वारजे - बावधन - भुसारी - श्री गणेश वर्पे
२१. वडगाव बुद्रुक-धायरी - श्री यशवंत लायगुडे
२२. धायरी-शिवणे - श्री रुपेश घुले
२३. कात्रज, सुखसागर नगर, कोंढवा बुद्रुक - श्री प्रमोद टिळेकर
२४. कोंढवा खुर्द, NIBM, मोहम्मदवाडी - श्री अमर गव्हाणे
२५. घोरपडी, मुंढवा, मगरपट्टा, केशव नगर, माळवाडी, साडे सतरा नळी, भोसले गार्डन - श्री संदीप लोणकर
२६. वैदुवाडी, रामटेकडी, काळेपडळ, ससाणे नगर हडपसर गाव - श्री आकाश डांगमाळी

## जम्मू-काश्मीरमध्ये ढगफुटीने हाहाकार

- भूस्खलनाच्या अनेक घटना
- जम्मू-श्रीनगर मार्ग बंद
- शेकडो वाहने अडकली
- बचावकार्य वेगात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीनगर :** गेल्या काही दिवसांपासून जम्मू-काश्मीरमध्ये पाऊस पडत आहे. रविवारी सकाळी रामबन जिल्ह्यातील सेरी बागना भागात पावसानंतर झालेल्या ढगफुटीत तीन जणांचा मृत्यू झाला. पोलिसांनी सुमारे १०० जणांना वाचवले. ढगफुटीमुळे अचानक पूर आला. डोंगरावरून आलेला ढिगारा गावांकडे आला आणि अनेक लोक आणि घरांना धडकला. सध्या बचावकार्य सुरू आहे.

दुसरीकडे, रामबन जिल्ह्यातील बनिहाल परिसरात अनेक ठिकाणी भूस्खलनाच्या घटना घडल्या आहेत. यामुळे जम्मू-श्रीनगर



राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आला आहे. शेकडो वाहने अडकली आहेत. किश्तवार-पद्दर रस्ता देखील बंद आहे. येथे वाहनांची वाहतूक थांबवण्यात आली आहे. हवामान स्वच्छ झाल्यानंतरच महामार्गावरून प्रवास करण्याचे आवाहन अधिकाऱ्यांनी केले आहे. भूस्खलनाचे काही व्हिडिओ समोर आले आहेत, ज्यामध्ये डोंगरावरून ढिगारा पडताना दिसत आहे. काही भागात, डोंगराचा ढिगारा रस्ते आणि निवासी भागात पोहोचला आहे. एका व्हिडिओमध्ये तीन-चार टँकर आणि काही इतर वाहने पूर्णपणे ढिगाऱ्याखाली गाडलेली दिसत आहेत. याशिवाय, हॉटेल्स आणि घरांनाही ढिगाऱ्यांचा » पान ७ वर

## विद्यार्थिनींसोबत चाळे करणाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यामध्ये पुन्हा एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पुण्यातील नांदेड सिटी परिसरात शालेय विद्यार्थिनींसोबत अश्लील चाळे करणा-या नराधम स्कूल व्हॅन चालकाविरोधात नांदेड पोलिस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


रसूल अत्तार असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. रसूल अत्तार नांदेड परिसरात एका नामांकित शाळेत विद्यार्थ्यांना स्कूल व्हॅन मधून घेऊन जात असे. ही स्कूल व्हॅन रस्त्यातच थांबवून विद्यार्थ्यांना अश्लील चाळे करत असल्याचे लक्षात आल्यानंतर काही विद्यार्थ्यांनी याबाबत घरी माहिती दिली होती. त्यानंतर नागरिकांनी आरोपीला चोप देत आरोपीला पोलिसांच्या ताब्यात दिल आहे.

## महाराष्ट्रात पाणीटंचाईच्या झळा!

### राज्यातील धरणसाठा आता ३८.९५ टक्क्यांवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील धरणसाठा आता ३८.९५ टक्क्यांवर आलाय. पुणे, छत्रपती संभाजीनगर, कोकण, विदर्भातील सर्व मोठ्या धरणांचा पाणीसाठा आता झपाट्यानं खाली घसरलाय. एकीकडे तापमानाच्या झळा आणि दुसरीकडे पाणीटंचाई अशा दुहेरी कात्रीत राज्यातील बहुतांश भागातील नागरिक सापडले आहेत. अकोल्यात पाणी



चोरीला जाऊ नये म्हणून पाण्याच्या टाक्यांना कुलूप लावले जात आहेत. मराठवाड्यात १०-१२ दिवसांनी एकदा नळाला पाणी येतानाचे चित्र पुन्हा सुरु झाले आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये पाण्याच्या नियोजनावरून नागरिकांमध्ये रोष दिसून येत आहे. राज्यभरात पाणीटंचाईचा प्रश्न चांगलाच पेटला आहे.

महाराष्ट्राच्या सहा महसूल विभागांपैकी पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर या तीन विभागातील धरणांमध्ये आता ४० टक्क्यांहूनही कमी पाणी शिल्लक आहे. पुणे विभागात राज्यातील सर्वात कमी पाणीसाठा आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत काही टक्क्यांनी पाणीसाठा अधिक असला तरी काही प्रमुख धरणे एप्रीलमध्यावरच मायनसच्या दिशेने वाटचाल करू लागली आहेत. त्यामुळे शेतीच्या » पान ७ वर

## सहा महिन्यांत दहशतवादाला मूठमाती - सिन्हा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीनगर :** येत्या सहा महिन्यांत जम्मू आणि काश्मीरमधून दहशतवाद आणि त्याचे पर्यावरण पूर्णपणे नष्ट केले जाईल. आम्ही शांतता खरेदी करण्यावर विश्वास ठेवत नाही तर शांतता प्रस्थापित करण्यावर विश्वास ठेवतो. जम्मू आणि काश्मीर पोलिस आणि सुरक्षा दल यावर काम करत आहेत, अशा शब्दांत जम्मू-काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी काश्मीर घाटीतील दहशतवादाबाबत विधान केले » पान ७ वर

## राज-उद्धव युतीला 'मनसे' विरोध

### मनसे नेत्यांचा निर्णयाला विरोध, नाराजी व्यक्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी एका मुलाखतीमध्ये उद्धव ठाकरेंसोबत युती करण्यास तयार असल्याचे म्हटले. तसा प्रस्ताव त्यांनी मुलाखतीमध्ये दिला. यावर उद्धव ठाकरेंनी देखील महाराष्ट्राच्या हितासाठी एकत्र येणार असल्याचे सांगितले. त्यामुळे राज-उद्धव ठाकरे एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. मुंबई महापालिका



निवडणुकीसाठी मनसे-शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची युती होईल, असे बोलले जात आहे.

राज-उद्धव ठाकरे यांची युती होणार असल्याची चर्चा सुरू असतानाच मनसेतील नेत्यांनी मात्र या युतीला विरोध » पान ७ वर

### 'ती' वैचारिक दरिद्रता...

- तू एवढ्या जागा लढव मी एवढ्या लढवतो, तू ही जागा लढव मी ही जागा लढवतो, तुला हे पद, मला हे पद इतका मर्यादित विचार करून चालणार नाही. फक्त निवडणूक एवढाच विचार केला तर ती वैचारिक दरिद्रता असेल, असे ट्विट संदीप देशपांडे यांनी निवडणुकीपेक्षा मराठीच्या मुद्यावर एकत्र येण्यावर भर दिला.

## श्रीसाईचरणी ६८ लाखांचा सोन्याचा मुकुट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर :** शिर्डी येथील श्रीसाईबाबांच्या खजिन्यात दिवसेंदिवस मौल्यवान हिरे, सोने, चांदी याबरोबरच रोख स्वरुपातील पैशांचे मोठे दान साईभक्त देत आहेत. त्यातच आता शनिवारी आंध्रप्रदेशमधील एका साईभक्ताने ६८ लाख रुपयांचा सुवर्ण मुकुट दान दिल्याची माहिती साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली आहे.

मागील काही वर्षांपासून भाविकांकडून दानाच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात सुवर्ण मुकुट येत आहेत. शनिवारी » पान ७ वर

### मुहूरीवरील बंधाऱ्याने सीमेलगतच्या शहरांमध्ये पुराची भीती

## बांगलादेशाचे भारताविरोधात षड्यंत्र?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सत्ताबदलानंतर भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंध बिघडत चालले आहेत. आता बांगलादेशने भारताविरोधात आणखी एक षडयंत्र रचले आहे. दक्षिण त्रिपुरातील मुहुरी नदीजवळ आणखी एक बंधारा बांधत आहे. त्यामुळे सीमेलगतच्या शहरांमध्ये पुराची भीती वाढली आहे. बेलोनियाचे माकपचे आमदार दीपांकर सेन यांनी हा मुद्दा उपस्थित करत केंद्रीय गृहमंत्रालयाने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली.



माध्यमातील वृत्तानुसार, नदीवर बांधण्यात येत असलेला हा बंधारा दीड किलोमीटर लांब आणि २० फूट उंच आहे. इंदिरा-मुजीब करारानुसार कोणत्याही देशाला सीमेच्या १५० यार्डच्या आत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्याची परवानगी नाही. या करारानंतरही सीमेपासून ५० यार्ड अंतरावर तर काही ठिकाणी १० यार्ड अंतरावर हा बंधारा बांधला जात आहे. या करारामुळे बांगलादेशच्या आक्षेपानंतर दक्षिण त्रिपुरातील प्रकल्प थांबवण्यात आले होते.

मुख्यमंत्री कार्यालयातील सूत्रांनी सांगितले की, ते या प्रकरणाच्या अहवालाची वाट पाहत आहेत. एसपी दक्षिण त्रिपुरा म्हणाले, ही बाब आमच्या निदर्शनास आली आहे आणि आम्ही याचा तपास करत आहोत. आत्ता काही प्रॉब्लेम नाही. भारत-बांगलादेश सीमेजवळील मुहुरी नदीलगतच्या शहरांमध्ये राहणाऱ्या किमान ५०० कुटुंबांना बंधाऱ्याच्या बांधकामामुळे पावसाळ्यात पुराची भीती आहे.

## पालिकेसाठी भाजपची खास रणनिती!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश संघटनेत एक महत्त्वाचा टप्पा पार पडला आहे. राज्यभरात एकूण १२२१ मंडळ स्थापन करण्यात आले आहेत. त्यापैकी ९६३ मंडळ अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ही प्रक्रिया अत्यंत नियोजनबद्ध आणि प्रभावी पद्धतीनं पूर्ण झाली आहे. "संघटन हेच खरे बळ" या तत्त्वावर चालत, भाजपनं आता महाराष्ट्रात मजबूत गड उभारण्याची तयारी सुरू केली आहे.

भाजपच्या संघटनात्मक बांधणीचा हा टप्पा महाराष्ट्राच्या सर्व भागांतील राजकीय » पान ७ वर

## म्हणून सोडला काँग्रेसचा 'हात'

### संग्राम थोपटेंनी दिली कारणे, २२ तारखेला प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** काँग्रेसचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी काँग्रेसमधील आपला राजीनामा दिल्यानंतर त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांनी कार्यकर्ते यांच्यासोबत चर्चा केली, त्याचबरोबर त्यांनी आपला पुढचा निर्णय जाहीर केला आहे. ते लवकरच भाजप पक्षात प्रवेश करणार आहेत. येत्या २२ तारखेला भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे त्यांनी अधिकृतपणे जाहीर केले आहे. या प्रवेश कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित राहणार आहेत. मुंबईमधील भाजपच्या मुख्यालयात



हा पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पार पडणार आहे.

संग्राम थोपटे यांनी पत्रकार परिषदेवेळी बोलताना सांगितलं की, काँग्रेस सोडताना मनात दुःख आहे, पण ही वेळ पक्षानेच आणली आहे. पक्षाने मला संधीच दिली नाही. अनेक वेळा मला डावलण्यात आलं. कार्याध्यक्षपद » पान ७ वर

### डॉ. वळसंगकर आत्महत्या प्रकरण

## सुसाईड नोटमध्ये महिलेचे नाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापुरातील प्रसिद्ध न्युरो फिजिशीयन डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येप्रकरणी मोठी बातमी समोर आली आहे. डॉ. वळसंगकर यांना आत्महत्येला प्रवृत्त केल्याप्रकरणी एका महिलेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वळसंगकर यांच्या हॉस्पिटलमध्ये प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करणा-या मनीषा मुसळे-माने हिच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, आत्महत्येपूर्वी डॉ. वळसंगकर यांनी एक चिठ्ठी लिहलेली होती, यामध्ये मनीषा मुसळे-माने हिच्यामुळेच टोकाचे पाऊल उचलत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार रात्री १० च्या सुमारास पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून रात्रीच न्यायालयाची परवानगी घेऊन आरोपी महिलेला अटक करण्यात आली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली होती.

डॉ. वळसंगकरांना रुग्णालयातील सर्व आर्थिक व्यवहार हे कागदोपत्रांवरती हवे होते. त्यासाठी त्यांचा आग्रह देखील होता, पण आजकाल रुग्णांकडून उपचाराची रक्कम » पान ७ वर

## लाडक्या बहिणीमुळे शेतमजूर मिळेनात

### कांदा काढणीसाठी मध्यप्रदेशातील मजूर

**योजना**

**लाडकी बहीण योजनेबाबत दाखल याचिकेच्या सुनावणीवेळी राज्यात शेतीच्या कामाला मजूर मिळत नाहीत अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी केली होती. याचा प्रत्यय ग्रामीण भागात फिरताना येतो आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात सध्या कांदा काढणीच्या कामांसाठी स्थानिक मजुरांची कमतरता भरून काढण्यासाठी थेट मध्यप्रदेशातून मजुरांच्या टोळ्या आल्या आहेत.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर :** राज्य शासनाने महिलांसाठी लाडकी बहीण योजना सुरु करत दर महिन्याला दीड हजार रुपये खात्यात जमा केले जात आहेत. यामुळे महिलांना योजनेचा लाभ मिळत असताना दुसरीकडे मात्र शेतक-यांसाठी अडचणीचे होत आहे. लाडकी बहीण योजनेमुळे शेती कामांसाठी मजूर मिळत नसल्याचे चित्र आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात कांदा काढणी सुरु असून याकरिता मध्य प्रदेशातील मजूर आणण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात सध्या कांदा काढणीची लगबग सुरू आहे.



मात्र स्थानिक मजूर मिळत नसल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे. परिणामी मध्यप्रदेशातून आलेल्या मजुरांच्या टोळ्या श्रीरामपूर तालुक्यात कांदा काढणीचे काम करत आहेत. परराज्यातून शेतमजूर आणावे लागत असल्याने मजुरांना आणण्यासाठी व सोडण्यासाठी अधिकचा खर्च शेतकऱ्यांना लागत आहे.

लाडकी बहीण योजनेबाबत दाखल याचिकेच्या सुनावणीवेळी राज्यात शेतीच्या कामाला मजूर मिळत नाहीत अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी केली होती. याचा प्रत्यय ग्रामीण भागात फिरताना येतो आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात सध्या कांदा काढणीच्या कामांसाठी स्थानिक मजुरांची कमतरता भरून काढण्यासाठी थेट मध्यप्रदेशातून मजुरांच्या टोळ्या आल्या आहेत. श्रीरामपूर तालुक्यातील मुठेवडगाव येथे शिवाजी पवार यांच्या शेतात मध्यप्रदेशातील हिरालाल अहिरे हा आपल्या ३४ मजुरांच्या टोळीनिशी कांद्याची काढणी करत आहे.

### स्थानिक मजूर मागत आहेत जास्त रोजगार

- महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना सुरू झाल्यापासून शेतमजूर मिळणे मुश्किल झाले आहे. स्थानिक महिला जास्त रोजंदारी मागत असल्याने अडचण निर्माण झाली होती. मध्य प्रदेशातून आलेल्या मजुरांमुळे आमची शेती वाचली आणि मोठं आर्थिक नुकसान टळले, अशी प्रतिक्रियात कांदा उत्पादक शेतकरी शिवाजी पवार यांनी दिली आहे.



## श्रीमंत भाऊसाहेब रंगारी बाप्पाला द्राक्षाची आरास

**पुणे :** हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती बाप्पाला संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने द्राक्षाची सजावट करण्यात आली होती. ही सजावट पाहण्याबरोबरच बाप्पाच्या दर्शनासाठीही भाविकांनी गर्दी केली होती.

'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट'कडून विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. संकष्टी चतुर्थी निमित्ताने मंदिरात बाप्पाला निळ्या आणि काळ्या द्राक्षाचा नैवद्य वाढवून त्यातून आकर्षक सजावट करण्यात आली होती. या द्राक्षांचे पुण्यातील 'सुर्योदय फाऊंडेशन' या स्वयंसेवी संस्थेला वाटप करण्यात आले.

## रिअल इस्टेटसाठी मार्गदर्शन शिबीर

**पुणे :** रिअल इस्टेट प्रॉपर्टी व्हॅल्युएशन करण्याच्या क्षेत्रात यायचा विचार करत असणाऱ्यांसाठी किंवा या क्षेत्रात काम करत आहे परंतु सुयोग्य पद्धत माहित नाही अशांसाठी उपयुक्त असे प्रशिक्षण प्रशिक्षण ५ ते १८ मे दरम्यान होणार आहे. हे प्रशिक्षण पूर्ण करून रिअल इस्टेट प्रॉपर्टी व्हॅल्युएशन करणाऱ्या कंपनीमध्ये नोकरी मिळू शकते. प्रशिक्षण ऑनलाइन दोन आठवडे व एक दिवस प्रात्यक्षिक अशा स्वरूपात होणार आहे. सिव्हिल इंजिनिअर्स, आर्किटेक्ट्स व विद्यार्थी यांच्यासाठी प्रशिक्षण उपयुक्त आहे.

## ग्रामस्तरावरील व्यवसाय विकास प्रशिक्षण

**पुणे :** शेतमाल व अन्न प्रक्रिया, कुटीरोद्योग, गृहोद्योग, स्थानिक व नैसर्गिक संसाधनांवरील प्रक्रियाआधारित उद्योग इत्यादी विविध प्रकारचे उद्योग व व्यवसाय करण्यासाठी इच्छुक गावातील होतकरू, उद्यमशील युवावर्ग, महिला, शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण घेण्यात येणार आहे. गावामध्ये अशा प्रकारचे व्यवसाय विकास प्रशिक्षण आयोजित करण्याची तयारी असलेल्या ग्रामपंचायती तसेच स्थानिक संस्थांनी सिमासेस लर्निंगकडे संपर्क साधावा.



## अनुसूचित विभाग व ओबीसी विभाग कार्यालयाचे उद्घाटन

**पुणे :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते आज काँग्रेस भवन येथे पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभाग व पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन पार पडले.

मागासवर्गीय विभागाच्या वतीने अध्यक्ष सुजित यादव यांनी प्रदेशअध्यक्ष मान्यवरांना कबीराची वाणी, बुद्ध आणि त्यांचा धम्म हे सुप्रसिद्ध ग्रंथ भेट म्हणून दिले, तसेच पंचशील शाल अर्पण करून सत्कार केला. यावेळी, सुजित यादव यांनी पक्षासाठी आतापर्यंत केलेल्या निस्वार्थी आणि प्रामाणिक कार्याची माहिती प्रदेशाध्यक्षांना दिली. ओबीसी विभागाच्या वतीने शहराध्यक्ष प्रदीप परदेशी आणि साहिल केदारी यांनी शहराध्यक्षांचा सन्मान केला. यावेळी आमचे मार्गदर्शक काँग्रेस पक्षाचे पुणे शहराध्यक्ष अरविंद शिंदे आणि पक्षाचे सर्व वरिष्ठ पदाधिकारी,नेते व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी अजित दरेकर,प्रदेश सदस्य मेहबूब नदाफ,नितीन परतनी, ब्लॉक अध्यक्ष संतोष पाटोळे,राजू ठोंबरे, हेमंत राजभोज, रमेश सोनकांबळे, राजेंद्र मोहिते, अनिल जाधव, अमर मंडलिक,हरीश काकडे, ईश्वर गायकवाड, अभिषेक यादव, प्रणव परदेशी आणि ओबीसी व एस.सी विभागाचे कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

## अभिवादन शहीदांना...!



पुणे — जनतेमध्ये अग्निशमनाबाबत जनजागृती निर्माण होण्यासाठी प्रत्येक वर्षी १४ ते २० एप्रिल या कालावधीत अग्निशमन सेवा सप्ताह पाळण्यात येतो. दलाचे प्रमुख देवेंद्र पोटफोडे यांनी एरंडवणा येथील शौर्यस्तभांस पुष्पचक्र अर्पण करीत भवानी पेठेतील मुख्यालयात ध्वजवंदन केले व "टोपी उतार" करीत कर्तव्य बजावत असताना मृत्युमुखी पडलेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## अग्निशमन सेवा सप्ताहाचा सांगता समारोह संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** १४ एप्रिल १९४४ रोजी मुंबई गोदीत एस. एस. फोर्ट स्टिकिन् या जहाजाला आग लागून झालेल्या भीषण स्फोटात अग्निशमन व विमोचनाचे कार्य करीत असताना मुंबई अग्निशमन दलाच्या ६६ जवानांना हौतात्म्य प्राप्त झाले. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सुचनेनुसार जनतेमध्ये अग्निशमनाबाबत जनजागृती निर्माण होण्यासाठी प्रत्येक वर्षी १४ ते २० एप्रिल या कालावधीत अग्निशमन सेवा सप्ताह पाळण्यात येतो. तसेच यावर्षी "संघटित व्हा, अग्नि सुरक्षित भारताला प्रज्वलित करा" हे घोषवाक्य जारी करण्यात आले होते.

दलाचे प्रमुख देवेंद्र पोटफोडे यांनी एरंडवणा येथील शौर्यस्तभांस पुष्पचक्र अर्पण करीत भवानी पेठेतील मुख्यालयात ध्वजवंदन केले व "टोपी उतार" करीत कर्तव्य बजावत असताना मृत्युमुखी पडलेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यादरम्यान शहर परिसरात शाळा, महाविद्यालये, शासकीय संस्था, रहिवाशी व व्यापारिक इमारती, मॉल, मेट्रोस्थानके अशा ठिकाणी आपत्कालिन परिस्थितीत कशाप्रकारे कार्य करावे यासंदर्भात व्याख्याने व प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

# शिक्षकेतर पदभरतीची 'उजळणी'...!

### अनुकंपा तत्त्वावरील शंभर टक्के पदभरतीला मान्यता

अनुशेषाच्या नावाखाली रखडून ठेवण्यात आलेली पदभरतीला आता ' ग्रीन सिग्नल' मिळाला आहे; त्यानुसार अनुकंपा तत्त्वावरील १०० टक्के तर अन्य पदभरती ८० टक्के होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यातूनच या भरतीला येत्या काही दिवसातच वेग येणार आहे; त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून त्यासाठी 'वेटिंग'वर असलेल्या उमेदवारांना त्याचा लाभ होणार आहे.पदभरती करण्यास सरकारने मान्यता दिल्याने अनेक दिवसांपासून अनुशेषाच्या नावाखाली थांबवण्यात आलेली शिक्षकेतर पदभरती करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र; हे वास्तव असले तरीही त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे तितकेच महत्त्वाचे असणार आहे. तरच त्याचा बेरोजगार उमेदवारांना लाभ घेता येणार आहे.

> अनेक वर्षांपासून अनुशेषाच्या नावाखाली थांबवण्यात आलेली शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदभरती करण्याचा मार्ग आता शासन निर्णयाने मोकळा झाला आहे. माध्यमिक शाळांतील रिक्त असलेली शिक्षकेतर पदभरती सुरू होऊन त्यांना मान्यता देण्यासाठी सर्व संबंधित शिक्षणाधिकारी व शिक्षण उपसंचालक यांनाही निर्देश दिले आहेत. पदभरती करण्यास मान्यता मिळाल्याने राज्यातील नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेले पाच हजार शिक्षकेतर भावा- बहिणींना दिलासा मिळाला असून या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात येत आहे.
>
> **-शिवाजी खांडेकर,** सरकार्यवाह, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर महामंडळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिक्षक भरतीच्या धर्तीवर शिक्षकेतर पदांनाही एकूण रिक्त पदांच्या 80 टक्के पदभरतीची अट लागू केली असून, या निर्णयामुळे शिक्षकेतर पदांच्या भरतीला वेग येणार असून, शासन निर्णयामुळे भरती प्रक्रियेला दिशा मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्यातील मान्यताप्राप्त खासगी अंशतः, पूर्णतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातील कनिष्ठ लिपिक, पूर्णवेळ ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहायक आदी संवर्गातील पदे अनुकंपा नियुक्तीसह 100 टक्के नामनिर्देशनाने भरण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. कनिष्ठ लिपिक, पूर्णवेळ ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहायक ही अनुकंपा पदे 100 टक्के, तर उर्वरित रिक्त पदांवर 80 टक्के पदभरती करण्यास सरकारने मान्यता दिल्याने अनेक दिवसांपासून अनुशेषाच्या नावाखाली थांबवण्यात आलेली शिक्षकेतर पदभरती करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्यातील मान्यताप्राप्त खासगी अंशतः पूर्णतः अनुदानित माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सुधारित आकृतिबंध लागू केला आहे. विद्यार्थी पटसंख्येच्या आधारे शिक्षकेतर संवर्गातील कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक, मुख्य लिपिक, पूर्णवेळ ग्रंथपाल प्रयोगशाळा सहायक ही नियमित पदे मंजूर केली आहेत. तर चतुर्थ श्रेणी कर्मचारी पद रद्द करून त्याऐवजी शिपाई भत्ता लागू केला आहे.

मात्र, नियमित नियुक्तीने कार्यरत चतुर्थ श्रेणी शिक्षकेतर कर्मचारी सेवानिवृत्तीपर्यंत कार्यरत राहणार आहेत. शिक्षकेतर पदे रिक्त राहिल्याने ती कामे शिक्षकांना करावी लागतात. त्याचा अध्यापन, शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर, शिक्षकेतर संवर्गातील काही पदांच्या नियुक्तीचे प्रमाण सुधारित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे शासन निर्णयात नमूद केले आहे. तसेच, भरती प्रक्रिये बाबतच्या सूचनाही दिल्या आहेत.

कनिष्ठ लिपिक, पूर्णवेळ ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहाय्यक या संवर्गात खासगी मान्यताप्राप्त शाळांतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वारसास अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देण्याबाबत निश्चित केलेल्या या तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे, ही पदे 100 टक्के सरळसेवेने भरताना त्यात अनुकंपा नियुक्तीच्या मार्गाचा समावेश आहे.

काही संस्थांमध्ये चतुर्थ श्रेणी पदावर नियमित नियुक्तीने कार्यरत कर्मचाऱ्यांपैकी काही कर्मचारी संबंधित पदावर पदोन्नतीने नियुक्त होण्यासाठी आवश्यक पात्रता धारण करत असल्यास प्रचलित पद्धतीनुसार ही पदे 50 टक्के मर्यादित पदोन्नतीने भरणे आवश्यक आहे.

तसेच मान्यता देण्यात आलेली पदे शासनमान्य पद्धतीनुसार भरण्यात आली आहेत की नाही, याची खातरजमा करून नियुक्त्यांना मान्यता देण्याची कार्यवाही संबंधित शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी यांनी करावी, असे शासन निर्णयाद्वारे स्पष्ट केले आहे.

## नसते उद्योग बंद; आता केवळ शिकवा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अशैक्षणिक कामांतून सुटका करण्याची मागणी गेल्या काही वर्षांपासून राज्यभरातील शिक्षकांकडून सातत्याने करण्यात येत होती. त्यानुसार शैक्षणिक आणि अशैक्षणिक कामांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्याशिवाय आता शाळास्तरावरील समित्यांचे विलीनीकरण करून त्यांच्या संख्येला कात्री लावण्यात आलेली आहे.राज्यातील शाळा स्तरावरील पंधरा विविध समित्यांचे विलीनीकरण करण्यात आले असून, समित्यांची संख्या कमी करण्यात आलेली आहे. यामुळे आता मुख्याध्यापक, शिक्षकांना अध्ययन-अध्यपनासाठी व शालेय कामकाजासाठी अधिकचा वेळ देता येणार आहे.

शाळांमध्ये आता शालेय व्यवस्थापन समिती, विद्यार्थी सुविधा आणि भौतिक विकसन समिती, सखी सावित्री समिती, महिला तक्रार निवारण समिती या चार समित्या कार्यरत राहणार आहेत. शाळा स्तरावरील समित्यांची संख्या कमी केल्यामुळे शिक्षकांचा समित्यांच्या कामकाजातील वेळ वाचणार आहे. हा वेळ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी देता येणार आहे.

शाळा व्यवस्थापन समितीमध्ये १२ ते १६ सदस्यांचा समावेश असेल. त्यातील ७५ टक्के सदस्य पालकांमधून निवडण्यात येतील. पालकांमध्ये उपेक्षित, दुर्बल घटकांतील पालक, सर्व इयत्तांतील पालकांना प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे. एकूण सदस्यांपैकी ५० टक्के सदस्य महिला असतील. शाळेच्या कामकाजाचे नियंत्रण, विद्यार्थ्यांची १०० टक्के उपस्थिती, निधीच्या विनियोगावर नियंत्रण, शिक्षकांच्या कर्तव्याचा पाठपुरवठा आणि समस्यांचे निराकरण, प्रधानमंत्री पोषण निर्माण शक्ती योजनेची अंमलबजावणी, शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न अशी विविध कामे या समितीला करावी लागणार आहेत.

> सीएसआरच्या माध्यमातून शाळेसाठी भौतिक, शैक्षणिक सुविधांची उपलब्धता, शाळेसाठी मदत मिळवणे, शाळा स्वच्छता, स्वच्छतागृहांची स्वच्छता याबाबत उपाययोजना अशी विविध कामे या समितीच्या कार्यकक्षेत निश्चित करण्यात आली आहेत,
>
> — **विजय भोसले,** अव्वर सचिव, शिक्षण विभाग

## घर मनातलं' सांगितिक अभिवाचनाला प्रतिसाद

**पुणे :** आयुष्यभर ध्यास घेतलेल्या घरासाठी मराठी साहित्य आणि काव्यातून उतरलेल्या तरल संवेदना प्रस्तुत करणारा,'वृंदावन' प्रस्तुत 'घर मनातलं' हा सांगीतिक अभिवाचनाचा अनोखा कार्यक्रम शनिवारी चांगलाच रंगला. भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनने या कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत केले होते. भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत सादर होणारा हा २४० वा कार्यक्रम होता. भारतीय विद्या भवनचे मानद सचिव नंदकुमार काकिर्डे यांनी प्रास्ताविक केले .'घर' या संकल्पनेवरील लोकप्रिय मराठी भावगीते आणि गाणी,मराठी साहित्यातील उतारे हेही या कार्यक्रमाचे एक वैशिष्ट्य होते.प्रवेश विनामूल्य होता.विवेक वेलणकर,प्र.ना.परांजपे उपस्थित होते. या कार्यक्रमाची संकल्पना आणि दिग्दर्शन ज्येष्ठ मराठी कॉपीरायटर राजेंद्र देशपांडे यांची होती. संहितेसाठी संशोधन,संपादन व लेखन डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी यांनी केले .ज्येष्ठ अभिनेत्री अनुराधा जोशी,डॉ. वंदना बोकील कुलकर्णी,प्रदीप फाटक आणि युवा अभिनेता आदित्य बीडकर या कलाकार,वाचक, निवेदकांसोबत संगीत संयोजक योगेश तपस्वी,गायिका बिल्वा द्रवीड सहभागी झाले होते.



पुणे — भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनने या कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत केले होते. भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत सादर होणारा हा २४० वा कार्यक्रम होता.

# युवा, ज्येष्ठ कलाकारांच्या सादरीकरणाने घुमला 'ब्रम्हनाद'...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नव्या पिढीतील आश्वासक गायक गंधार देशपांडे, प्रसिद्ध संवादिनी वादक सुधीर नायक आणि किराणा घराण्याच्या ज्येष्ठ गायिका विदुषी पद्माताई देशपांडे यांच्या बहारदार आणि सुश्राव्य सादरीकरणाने रौप्य महोत्सवाकडे वाटचाल करीत असलेल्या ब्रह्मनाद संगीत महोत्सवातील पहिला दिवस संगीत रसिकांसाठी आनंददायी ठरला.

ब्रह्मनाद कला मंडळ आणि धारेश्वर विद्या व क्रीडा प्रतिष्ठान, धायरी यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय २४ व्या ब्रह्मनाद संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाला युवा रसिक, कलाकारांसह ज्येष्ठांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.

सुरुवातीस धारेश्वर विद्या व क्रीडा प्रतिष्ठानचे अध्यक्ष काका चव्हाण, संचालक अनिकेत चव्हाण, डॉ. पंडित संजय गरुड, रागिणी गरुड, कॉसमॉस बँकेचे माजी संचालक मिलिंद पोकळे, सुभाष चाफळकर, ह. भ. प. विजय महाराज जगताप, माजी कामगार आयुक्त विकास पनवेलकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि सरस्वती पूजन झाले. या प्रसंगी ब्रह्मनाद संगीत



विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सरस्वती वंदना सादर केली.

महोत्सवाच्या पहिल्या दिवसाची सुरुवात प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित डॉ. राम देशपांडे यांचे सुपुत्र आणि शिष्य गंधार देशपांडे यांच्या गायनाने झाली. त्यांनी आपल्या मैफलीची सुरुवात धानी रागातील रचनेने केली. विलंबित आणि द्रुत तालावर आधारित भगवान शंकरांवरील पंडित राम देशपांडे यांनी रचलेली 'शंभो महोदव' ही बंदिश तयारीने सादर केली. त्यानंतर भगवान शंकरांच्या तांडव नृत्याचे वर्णन करणारी 'डम डम डमरू बाजे' ही रचना सादर करून शास्त्रीय संगीतावरील आपली पकड दर्शविली. 'गाओ विद्या गुणी सम' ही रचना सादर करून 'अबिर गुलाल उधळीत रंग' हे सुप्रसिद्ध भजन सादर करत रसिकांची मने जिंकली. अखेरीस 'श्री राम जय राम जय जय राम' आणि 'विठ्ठल' नामाचा गजर करताना गंधार यांना रसिकांनी टाळ्यांच्या गजरात साथ करत वातावरणात भक्तिरसाची निर्मिती केली. उदय कुलकर्णी (संवादिनी), ऋषिकेश जगताप (तबला), ज्ञानेश्वर दुधाणे (पखवाज), ओम देशमुख, सिद्धार्थ गोडांबे (सहगायन, तानपुरा) यांनी साथसंगत केली.

दुसऱ्या सत्रात पंडित तुळशीदास बोरकर यांचे शिष्य प्रसिद्ध संवादिनी वादक पंडित सुधीर नायक यांचे एकल संवादिनी वादन झाले. त्यांनी मैफलीची सुरुवात राग पूरिया कल्याण सादर करून केली. त्यानंतर गुरू पंडित तुळशीदास बोरकर यांची झपतालातील एक रचना ऐकविली. पंडित रामाश्रय झा रचित बंदिश सादर करून तिलक कमोद रागातील रचना ऐकविली. कार्यक्रमाची सांगता पिलू रागातील ठुमरीने केली.



> पुण्यातील उपनगरात पहिल्यांदाच गायनसेवा करीत आहे. पंडित संजय गरुड यांनी या परिसरात भारतीय अभिजात शास्त्रीय संगीताचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणावर केल्यामुळे रसिकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे याचा आनंद आहे.
>
> **— गंधार देशपांडे,** प्रसिध्द शास्त्रीय गायक



## डॉ. सिद्धार्थ धेंडे यांचा सन्मान

**पुणे :** . बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव समितीच्या वतीने माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे यांचा महात्मा फुले पगडी देऊन सन्मान करण्यात आला. संस्थेचे संस्थापक सचिव प्रा. विजय गायकवाड यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले, यावेळी अध्यक्ष मंदार खरात, सचिव प्रविण जगताप, बौद्धाचार्य अशोक अवसरे, कांबळे आदी उपस्थिती होते. तसेच आंबेडकरी चळवळीतील नेते आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## मूळव्याध परिषदेत डॉ. अंभोरे यांचे संशोधन सादर

**पुणे :** मुळव्याध तज्ञ डॉ. सुनिल दिवाकर अंभोरे यांना



इजिप्तमध्ये पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय जागतिक मुळव्याध परिषदेत स्थानिक संज्ञाहरण (लोकल अनास्थेशिया / प्यूडेंडल नर्व्ह ब्लॉक) वापरून शस्त्रक्रियेचे सादरीकरण करण्याचा बहुमान मिळाला. भारतातून केवळ चार तज्ञांची निवड परिषदेसाठी करण्यात आली होती, त्यामध्ये डॉ. अंभोरे यांचा समावेश होता.

कैरो येथे संपन्न झालेली ही परिषद इजिप्शियन सोसायटी ऑफ कोलन अँन्ड रेक्टम,मेडिटेरिनियन सोसायटी ऑफ पेल्विक फ्लोअर डिसऑर्डर्स आणि कैरो पेल्विक फ्लोअर अँन्ड कोलोरेक्टल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. या परिषदेसाठी भारतासह एकूण १९ देशांमधून विविध मुळव्याध तज्ञ, कोलोरेक्टल सर्जन आणि वैद्यकीय क्षेत्रातील नामवंत व्यक्ती आमंत्रित करण्यात आले होते.



## शरद पवार यांचे वाडेबोल्हाईत नागरिकांकडून जंगी स्वागत

**वाघोली :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार पुण्याच्या हवेली तालुक्यातील हिंगणगाव-शिंदेवाडी येथे साकारण्यात येणाऱ्या 'वारकरी संतपीठ' भूमिपूजन व लोकनेते दादा जाधवराव माध्यमिक विद्यालयाच्या रौप्य महोत्सवास कार्यक्रमाला जात असताना श्रीक्षेत्र वाडेबोल्हाई येथे ग्रामस्थांच्या वतीने पवार यांचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. पिडीसीसी बँकेचे माजी संचालक माणिकराव गोते,वाडेबोल्हाई माजी उपसरपंच संजय भोरडे, माजी सरपंच दिपक गावडे,शिरसवडीच्या सरपंच सीमा गावडे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी माजी आमदार अशोक पवार, बोल्हाई माता पतसंस्थेचे संस्थापक शिवाजीराव भोरडे, माजी सरपंच संदिप गोते,माजी उपसरपंच संदिप गावडे,माजी उपसरपंच सुमित शिंदे,उपसरपंच वाडेबोल्हाई, कीर्ती पायगुडे,ग्रामपंचायत सदस्य सोनाली शिंदे,मोनाली भोर,चेअरमन प्रमोद गावडे,मानसिंग गावडे,चेअरमन बळीराम गावडे,कृषी उद्योजक नितीन गावडे,,युवा नेते राहुल इंगळे,सुखदेव गावडे,प्रवीण भोर, उपस्थित होते.

## 'एक जिल्हा-एक नोंदणी' उपक्रम राबविणार

**पुणे :** 'एक जिल्हा-एक नोंदणी' (वन डिस्ट्रीक्ट वन रजिस्ट्रेशन) ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठीची तयारी नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने केली असून प्रायोगिक तत्त्वावर त्यांची चाचणी घेण्यात येत आहे. त्यामुळे पुढील महिन्यांपासून पुणे जिल्ह्यात प्रत्यक्षात ही योजना अमलात येणार आहे. परिणामी पुणे शहर, पिंपरी चिंचवड अथवा ग्रामीण भागांत कोठूनही दस्तनोंदणी करता येणार आहे.

# मंदिरे सामाजिक ऐक्याचे केंद्र - ना.पाटील

## ग्रामदैवत म्हातोबाच्या मूळ ठिकाणी जाणे झाले अधिक सुकर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोथरूडचे ग्रामदैवत श्री म्हातोबाचे मूळ ठिकाण असलेल्या एआरआय टेकडीवरील मंदिराकडे जाणे अधिक सुकर झाले आहे. ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या पुढाकारातून सदर मंदिराकडे जाणाऱ्या पायऱ्यांची पुनर्बांधणी करण्यात आली असून, त्यामुळे भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

कोथरूडचे ग्रामदैवत श्री म्हातोबा यांचे एआरआय टेकडीवरील मूळ ठाणे असून, मंदिराकडे जाणाऱ्या पायऱ्यांची अतिशय दुरवस्था झाली होती. सदर पायऱ्या अतिशय जीर्ण आणि भग्न झाल्याने मंदिरात दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना मोठी कसरत करावी लागत होती. सदर पायऱ्यांची पुनर्बांधणी करुन; दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची व्यवस्था व्हावी; अशी ग्रामस्थांची सातत्याने मागणी होती.

त्यामुळे ना. चंद्रकांतदादा पाटील यांनी पुढाकार घेत; या पायऱ्यांची पुनर्बांधणी केली असून; घडीव दगडी पायऱ्या बांधण्यात आल्या आहेत. त्यामुळे मंदिर परिसराचे वैभव देखील वाढले असून; दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे. नामदार चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की; कोथरुड मतदारसंघातील म्हातोबाचे मूळ ठिकाण असलेल्या एआरआय टेकडीवरील मंदिराकडे जाणाऱ्या पायऱ्यांची पुनर्बांधणी करण्याची मागणी सातत्याने होत होती. त्यामुळे हे काम करुन; म्हातोबांच्या चरणी अर्पण करतो. भविष्यात ही या परिसराच्या विकासासाठी एकात्मिक आराखडा तयार करावा; त्यासाठी आमदार निधीतून निधी उपलब्ध करून देऊ, अशी ग्वाही यावेळी दिली. दरम्यान, नामदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या पुढाकाराबद्दल म्हातोबा सेवक संघाच्या वतीने समाधान व्यक्त केले.



> मंदिर हे सामाजिक ऐक्य आणि संस्कारांचं केंद्र आहे. त्यामुळे तिथे होणाऱ्या एकत्रिकरणातून सामाजिक ऐक्य जपले जाते. राज्याचा सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना; अनेक मार्ग उभारले. पण मी लहानपणापासून ज्या देवस्थानात जायचो; त्या कोल्हापूरमधील तळे माऊली मंदिराकडे जाणारा मार्ग तयार केला.
>
> **-चंद्रकांतदादा पाटील;** उच्च व तंत्र शिक्षण मंत्री



## आशा वर्कर्स'चे मानधन थकीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आशा वर्कर्स'चे गेल्या तीन महिन्यांपासून मानधन थकले आहे. ते वेळेत मिळावे, यांसह सर्व आशा वर्कर यांना महागाई भत्त्यांशी जोडून किमान वेतन २६ हजार मिळावे, राष्ट्रीय आरोग्य मिशनला कायमस्वरूपी दर्जा देऊन आशा वर्कर्स आणि एनएचएम कर्मचाऱ्यांना सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळावा, अशा विविध मागण्यासाठी 'सी.टू.' प्रणित आशा वर्कर्स युनियनचे पुण्यात अधिवेशन पार पडले. लसीकरण मोहीम, जन्म-मृत्यू नोंदणी सर्वेक्षण अशा 'राष्ट्रीय आरोग्य मिशन'च्या विविध कामांमध्ये महत्त्वाची भूमिका त्या बजावत असतात.'आशा वर्कर्स'च्या विविध प्रश्नांसह समाविष्ट गावांतील आशा वर्कर्स प्रश्नांबाबत चर्चा घडवून आणण्यासाठी नुकतीच शिवाजीनगर परिसरात जिल्हा पातळीवरील आशा वर्कर्सचे एकदिवसीय अधिवेशन आयोजित करण्यात आले. या अधिवेशनाचे उद्‌घाटन सीटू संघटनेचे नेते आणि पुणे जिल्हा अध्यक्ष कॉ. अजित अभ्यंकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी जनवादी महिला संघटनेच्या जिल्हाध्यक्ष हिराबाई घोंगे आणि जन आरोग्य मंचचे डॉ. सुधीर दहिटनकर, शुभा शमिम, गणेश दराडे, सचिव किरण मोघे, सीटूचे सचिव कॉम. वसंत पवार आदी उपस्थित होते.

# भ्रष्टाचाराची 'जेसीबी खोदाई'

## तीन दिवस जेसीबीचे काम; बील दहा लाखांचे: १९ लाखांची 'साफसफाई'

आशिया खंडात सर्वात मोठी बाजार समिती असा नावलौकिक मिळविलेल्या हवेली बाजार समितीला पहिल्यापासूनच भ्रष्टाचाराचे 'ग्रहण' लागले आहे; विशेष म्हणजे भ्रष्टाचाराच्या माध्यमातून संचालकांनी अक्षरश: बाजार समितीला विळखा घातला आहे. धक्कादायक बाब म्हणजे प्रशासकीय कारभार असताना हा भ्रष्टाचार काही प्रमाणात रोखला जात होता. मात्र; संचालक मंडळाच्या काळात या भ्रष्टाचाराचा कळस गाठला जात असल्याने अनेकवेळा संचालक मंडळ बरखास्त करण्याची नामुष्की राज्य शासनावर ओढवली आहे. त्यातून कोणताही धडा आतापर्यंतच्या संचालक मंडळाने अथवा राज्य शासनाने घेतलेला नाही, विद्यमान संचालक मंडळही त्याला अपवाद ठरलेले नाही.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बाजार समितीत महिना ते दीड महिन्यापूर्वी पुन्हा नुकतेच डाळिंब यार्ड करण्याच्या नावाखाली पुन्हा नुकतेच सपाटीकरणाचे काम सुरू केले. मात्र, केवळ तीन दिवस जेसीबीने कचरा सपाटीकरण केले. एक हजार रुपये एक तासप्रमाणे रोजचे दहा तास पकडले तरी 30 हजार रुपयांत हा कचरा व राडारोडा सपाट केल्याचे दाखवले. मात्र, संचालक मंडळाने या कामाचे ९ लाख ८० हजार रुपये बिल काढले. बाजार समितीवर संचालक मंडळ आल्यापासून भ्रष्ट कारभाराने कळस गाठला आहे.

कामे न करता बिले काढण्याचा सपाटा लावला आहे. संचालक मंडळाने त्यांच्या दोन वर्षांच्या काळात कामगार सोसायटीजवळील जुन्या पाण्याच्या टाकीच्या जवळील न्यायप्रविष्ट जागेतील कचरा, राडारोडा उचलणे आणि जागा स्वच्छ करण्याच्या नावाखाली सुमारे नऊ ते साडेनऊ लाखांची दोन वेळा बिले काढण्यात आली. एकाच जागेवरील दोनदा साफसफाई करत एकूण सुमारे १९ लाख ७८ हजार रुपये खर्च केल्याने बाजारात खळबळ उडाली आहे.

पुणे बाजार समितीवर मे २०२३ मध्ये संचालक मंडळ आले. समितीवर संचालक मंडळ आल्यापासून मनमानी कारभाराचा धडाका सुरू आहे. गुलटेकडी मार्केटयार्ड येथील गेट क्रमांक ७ जवळ न्यायप्रविष्ट जागा आहे. या जागेवरील कचरा हटवणे आणि साफसफाईचे काम केल्याचे दाखवून जून महिन्यात ९ लाख ९७ हजार रुपयांचे बिल काढले. त्यानंतर संचालक मंडळाच्या कारभाराला दोन वर्षे पूर्ण होण्यापूर्वी पुन्हा एकदा संचालक मंडळाला या जागेवरील साफसफाई करण्याची आठवण झाली.

राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी येथील कचऱ्याचा प्रश्न समोर आणत पालिका प्रशासनाला धारेवर धरले होते. त्यानंतर पालिकेने येथील कचरा हटविला होता. याचा फायदा घेत बाजार समिती संचालक मंडळाने काम न करताच, येथे साफसफाईचे काम केले दाखवून दहा लाखांचे बिल काढल्याची बोंब झाली होती.

> या जागेवरील पुन्हा साफसफाई केल्याचे दाखवून सुमारे ९ लाख ८० हजार रुपयांचे बिल काढले. या ठरावाला बाजारातील एका संचालकाने विरोध केला असून, इतर सर्व संचालकांनी मंजुरी दिली आहे. याबाबत सत्यता पडताळून कारवाई करू.
>
> **-डॉ. राजाराम धोंडकर,** सचिव, हवेली बाजार समिती

## काँग्रेसचे रोहन सुरवसे पाटील यांचा राजीनामा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्रात काँग्रेसला लागलेली गळती थांबण्याचे नाव घेत नसल्याची स्थिती आहे. माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्या शिवसेना प्रवेशानंतर, भोरचे माजी आमदार व काँग्रेसचे मातब्बर नेते म्हणून ओळखले जाणारे संग्राम थोपटे हे देखील भाजपच्या वाटेवर आहेत. अश्यातच महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस सरचिटणीस रोहन सुरवसे-पाटील यांनी आज पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा व सरचिटणीस पदाचा राजीनामा पक्षाकडे सोपवला आहे. आधीच अडचणीत असलेल्या काँग्रेसला नाराज नेतेमंडळींची मनधरणी करता येत नसल्याचेच दिसून येत आहे. पक्षातील नेतेमंडळींमध्ये समन्वय नसून अंतर्गत गटबाजीमुळे कार्यकर्ते हताश असल्याची परिस्थिती काँग्रेसमध्ये पाहायला मिळत आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या राजीनामा पत्रात रोहन सुरवसे पाटील यांनी म्हटले आहे की,

"सरचिटणीस पदावर काम करत असताना काँग्रेस पक्षाच्या विचारधारेला प्रमाण मानून आजपर्यंत मी काम केले. कुठल्याही गटातटाच्या भानगडीत न पडता माझ्या खांद्यावर पक्षाची जी जबाबदारी आहे ती लक्षात ठेवून सर्वसामान्य नागरिकांना न्याय देण्यासाठी, त्यांच्या अडचणी



सोडवण्यासाठी आणि पक्षाचे नाव चांगल्या पद्धतीने कायम अधोरेखित होईल अश्या आशयानेच मी आजवर काम करत आलोय. पक्षकार्यात मी नेहमीच सक्रियपणे काम केले आहे. जनप्रश्नांसाठी अनेक आंदोलने केली युवक काँग्रेसच्या अनेक आंदोलनात सक्रिय सहभागी राहिलो.

२०२१ सालच्या महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या निवडणुकीत सरचिटणीस पदावर निवडून आल्यानंतर संघटनेसाठी काम करत असताना या पदाला कायमच न्याय देण्याचे आणि पक्षाची गरिमा कायम राखण्यासाठी किंबहुना ती वृद्धिंगत करण्यासाठी मी सदैव कटिबध्द राहिलो आहे. काँग्रेस हा एक विचार आहे. हा विचार आणि हा पक्ष आजही तळागाळातील आणि गावकुसातील सर्वसामान्यांपासून ते मध्यमवर्गीय ते श्रीमंत अश्या सर्व स्तरातील लोकांना आपलासा वाटतो. मात्र, पक्ष संघटनेतील अनेक बाबी माझ्या सारख्या कार्यकर्त्याला पटत नाहीत. सध्या पक्ष अडचणीच्या काळातून जातोय तरीही माझ्यासारख्या कार्यकर्त्याला पक्ष सोडण्याचा निर्णय का घ्यावा लागतोय याचा विचार पक्षनेतृत्वाने करावा अशी माझी अपेक्षा आहे.

# सुमधुर गीत संगीताने रंगला 'दिल ने ये कहा है दिल से'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सुमधुर संगीत, गायकांचे अप्रतिम सादरीकरण, वादकांची चपखल साथ संगत आणि जोडीला रसिकांची दिलखुलास दाद, अशा सुर आणि संगीताने नटलेल्या वातावरणात 'दिल ने ये कहा है दिल से' हा कार्यक्रम रंगला.

स्वच्छंद पुणे प्रस्तुत आणि ईगल इन्फ्रा ग्रुप यांच्या सहकार्याने 'दिल ने ये कहा है दिल से' हा नव्या आणि जुन्या बहारदार हिंदी आणि मराठी संगीत गीतांचा कार्यक्रम कोथरूड मधील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे रंगला. या कार्यक्रमांमध्ये कलाकारांच्या अप्रतिम सादरीकरणामुळे रसिक हिंदी संगीताच्या सुवर्ण युगामध्ये हरवले.

पल्लवी आनदेव यांनी 'ये समा समा है ये प्यार का' या गाण्याने कार्यक्रमाची सुरुवात केली. यानंतर रवींद्र शाळू यांनी 'और इस दिल में क्या रखा है' हे गाणे सादर केले तसेच त्यानंतर संजय कांबळे यांनी 'मैं शायर तो नही' या गाण्याच्या सादरीकरणातून कार्यक्रमात रंगत आणली.

'चांद सिफारिश जो करता तुम्हारी', 'जादू तेरी नजर', 'दिल ने ये कहा है दिल से', 'करवटे बदलते रहे', 'सुरज हुआ मद्धम', 'दिवाने है दिवानो को ना घर चाहिये', 'गाता रहे मेरा दिल' अशा नवीन आणि जुन्या बहारदार हिंदी गीत संगीत सादर करून कलाकारांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले.

पल्लवी आनदेव ,संजय कांबळे, मनोज सेठिया, रवींद्र शाळू यांच्यासह कार्यक्रमाचे खास आकर्षण असलेल्या मुंबईतील कलाकार व्हाईस ऑफ लतादीदी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्राजक्ता सातार्डेकर यांनी अप्रतिम गाणी सादर केली. प्राजक्ता सातार्डेकर यांनी गायलेल्या मोसे छल किये जा, रंगीला रे या गाण्यांना विशेष दाद मिळाली. प्राजक्ता श्रावणे यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. यश भंडारे यांनी संगीत संयोजन केले. केदार परांजपे, शैलेश देशपांडे, नागेश भोसेकर, आसिफ इनामदार, रोहित जाधव या सर्व वादक कलाकारांनी आपल्या वादनातून रसिकांना भारावून टाकले.



# पुण्यात कृत्रिम पाय बसविण्याचा विश्वविक्रम

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत भारत विकास परिषदेचा कार्यक्रम



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतात सेवेची परंपरा खूप मोठी असून सेवा कार्याचा संस्कार आपल्या प्रत्येकात आहे. सेवाकार्य करण्यासाठी सरकार सोबत स्वयंसेवी संस्था उभ्या राहिल्या तर कार्याची गती अधिक वाढेल, अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केली. भारत विकास परिषदेच्या नवभारत फौंडेशनने फक्त साडेचार तासात एकूण ८९२ दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव बसवण्यात आले. या विश्वविक्रमाचे गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड प्रमाणपत्र मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भारत विकास परिषदेला प्रदान करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकात पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार सिद्धार्थ शिरोळे, सागर ढोले पाटील, राजेश पांडे, भारत विकास परिषदेचे दत्ता चितळे, विनय खटावकर, राजेंद्र जोग उपस्थित होते.

भारत विकास परिषदेच्या पुण्यातील विकलांग पुनर्वसन केंद्रातर्फे अवघ्या साडेचार तासात तब्बल८९२ दिव्यांगांना कृत्रिम पाय (मॉड्यूलर फूट) व कृत्रिम हात बसवून विश्वविक्रम झाला असल्याची घोषणा गिनिज वर्ल्ड रेकॉर्डसचे मुख्य प्रतिनिधी स्वप्नील डांगरीकर यांनी आज येथे केली व प्रमाणपत्र दिले.

पुण्यातील ढोले-पाटील शिक्षण संस्थेच्या खराडी येथील महाविद्यालयात राज्यस्तरीय शिबिर घेण्यात आले, त्यामध्ये झालेला विश्वविक्रम भारत विकास परिषद नवभारत फौंडेशनच्या दत्ता चितळे आणि ढोले-पाटील शिक्षण संस्थेच्या सागर ढोले-पाटील यांच्या नावावर नोंदविला गेला. आजच्या विश्वविक्रमी दिव्यांगांमध्ये सुमारे २०० महिलांचा देखील समावेश आहे. यावेळी गिनिज वर्ल्ड रेकॉर्डसकरिताचे समन्वयक मिलिंद वेर्लेकर तसेच दिव्यांगांच्या वैद्यकिय तपासणीकरिता डॉ. तापडीया, डॉ. मिलिंद गांधी, डॉ. नागापूरकर आदी उपस्थित होते. यापूर्वीचा विश्वविक्रम गुजरातमध्ये 2021 साली 8 तासात 710 दिव्यांगाना कृत्रिम पाय बसविण्याचा झाला होता.

यावेळी खटावकर म्हणाले की, पुण्यातील विकलांग पुनर्वसन केंद्र सन १९९७ मध्ये गुडीपाडव्याच्या मुहूर्तावर सुरु झाले. या केंद्रातर्फे सुमारे ५० हजार रुपये किंमतीचा अत्याधुनिक मोड्युलर फूट मोफत बसविला जातो. परिषदेने गेल्या २५ वर्षात २५ हजार पेक्षाही जास्त कृत्रिम अवयव परिषदेने मोफत दिले आहेत. या केंद्राच्या रौप्य महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ १६ डिसेंबर २०२४ रोजी रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या उपस्थितीत संपन्न झाला होता. त्यादिवशी 800 पेक्षा जास्त दिव्यांग व्यक्तींच्या पायाची मोजमापे घेण्यात आली होती. त्यांना आज कृत्रिम पाय (मॉड्युलर फूट) व कृत्रिम हात मोफत बसविण्यात आले व त्याचाच हा विश्वविक्रम झाला आहे. यावेळी चितळे म्हणाले की, सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून दिव्यांग गरजूंची सेवा आपुलकीने करणे हे दायित्व, कर्तव्य आणि सामाजिक ऋण भारत विकास परिषदेने जोपासले असून संपर्क, सहयोग, संस्कार, सेवा आणि समर्पण या पंचसूत्रीच्या आधारावर संपूर्ण देशभर सुमारे 1500 शाखांच्या माध्यमातून हे सामाजिक कार्य सुरु आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र खरे यांनी केले तर श्रीनिवास कुलकर्णी यांनी आभार मानले.

# आधी गाड्या; मगच टप्प्याटप्प्याने पैसे देऊ

## टीकेची झोड उठल्यानंतर महापालिकेचा सावध पवित्रा; नगरपरिषद प्रशासनाशी पत्रव्यवहार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे शहरातील सांडपाणी वाहिन्या स्वच्छतेसाठी १३ गाड्या खरेदी करण्यासाठी तब्बल ९५ कोटी रुपये महापालिकेला राज्य शासनाला द्यावे लागणार होते. यामध्ये सांडपाणी वाहिन्यांची स्वच्छतेऐवजी महापालिकेची तिजोरीच रिकामी होईल अशी टीका करण्यात आली. त्यानंतर महापालिका प्रशासनाने सावध भूमिका घेतली आहे. महापालिका लगेच ९५ कोटी रुपये देणार नाही तर गाड्या आल्यानंतर टप्प्याटप्प्याने काम जसे पूर्ण होईल तसे पैसे दिले जातील असे पत्र महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी नगरपरिषद प्रशासन संचालनालयाला पाठवले आहे.

महापालिका सात वर्षांसाठी या सक्शेसन आणि जेटिंग मशिन भाडेकराराने घेणार आहे. यामध्ये १८.५ टन उच्च क्षमतेच्या ८ गाड्या आणि ७ ते ८ टन क्षमता असलेल्या ५ गाड्या अशा १३ गाड्यांची नोंदणी महापालिकेने केली आहे. यासाठी १३ कोटींचा निधी पहिल्यावर्षी दिल्या नंतर ही कंपनी वाहने खरेदी करणार आहे. पहिल्या वर्षी १३ पैकी केवळ दोनच वाहने महापालिकेला मिळणार आहेत. ७ ते ८ टन क्षमता असलेल्या वाहनांची किंमत सव्वा कोटी रुपये असून, त्यासाठी महापालिका साडेसहा कोटी रुपये खर्च करणार आहे. १८.५ टन क्षमता असलेल्या वाहनांची किंमत पावणे दोन कोटी रुपये आहे. त्यासाठी १४ कोटींचा खर्च येईल. महापालिकेने स्वतः या गाड्या घेतल्यास केवळ २० कोटी रुपयांचा खर्च येईल. तसेच प्रत्येक वर्षाला या वाहनांवर पाच कोटींचा देखभाल दुरुस्तीचा खर्च करता येऊ शकतो.

यामध्ये या गाड्यांचा कालावधी सात वर्षांचा आहे, त्यासाठी लागणारा निधी महापालिकेच्या अर्थसंकल्पातून आर्थिक वर्षानुसार टप्प्याटप्प्याने दिला जाईल. तसेच १३ गाड्या आल्यानंतर अतिरिक्त यंत्रांची देयके स्वीकृत निविदेच्या अटी व शर्तीनुसार महापालिकेने स्वतः ठेकेदारास देणे योग्य राहील.यासाठी संचालनालय, महापालिका आणि ठेकेदार असा स्वतंत्र करारनामा करावा लागेल. निविदेतील दरानुसार महापालिकेला परस्पर बिल देण्याची परवानगी द्यावी असे पत्रात नमूद केले आहे.



" दोन गाड्या नुकत्याच महापालिकेला हस्तांतरित केल्या आहेत. मात्र; यापुढील कालावधीत गाडया मिळाल्यानंतर त्याचे पैसे टप्प्याटप्प्याने देण्यात येणार आहेत.

**-डॉ. राजेंद्र भोसले,**
आयुक्त, पुणे मनपा

### दिवसाला ५२ हजार भाडे

**● सांडपाणी वाहिनी स्वच्छ करण्यासाठी घेण्यात येणाऱ्या या वाहनासाठी प्रत्येकी आठ तासासाठी २६ हजार रुपये इतके भाडे आहे. त्यामध्ये चार कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. एक गाडी दोन शिफ्टमध्ये काम करणार आहे, म्हणजे एका दिवसासाठी ५२ हजार रुपये भाडे असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.**

## ‘टेमघर’ दुरूस्तीला जानेवारीचा मूहूर्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** टेमघर धरण दुरुस्तीसाठी अंदाजपत्रक तयार करणे त्याला मंजुरी मिळणे आणि त्यानंतर निविदा प्रसिद्ध होऊन कंत्राटदार निश्चित होणे, यासाठी किमान तीन महिन्यांचा कालावधी लागणार आहे. पावसाळ्यात काम करणे शक्य नसल्याने दुरुस्तीच्या कामासाठी जानेवारीचा वाट पाहावी लागणार आहे. पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या टेमघर धरणातून होत असलेली पाण्याची गळती रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या दुरुस्तीच्या कामाला आता पुढील वर्षी जानेवारीत मुहूर्त लागणार आहे.

दरम्यान, जुन्या कंत्राटदाराकडून काम केले असते तर मेअखेर प्रत्यक्ष कामाला सुरुवात करता आली असती. मात्र, आता नवीन कंत्राटदारच काम करेल, हे स्पष्ट झाले आहे. टेमघर धरणातून पाणीगळती होत असताना दुरुस्तीस २०२० नंतर तब्बल पाच वर्षांनंतर मुहूर्त मिळाला आहे. धरणाच्या मजबुतीकरण व गळती रोखण्याच्या कामासाठी राज्य मंत्रिमंडळाने ७ फेब्रुवारीच्या बैठकीत ३१५ कोटी ५ लाख रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिली. टेमघर धरणातून पुणे शहराला दरवर्षी ३.७१ टीएमसी पाणी पिण्यासाठी उपलब्ध केले जाते.




## विद्यापीठाच्या परकीय भाषा विभागातर्फे प्रवेश प्रक्रिया सुरू

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परकीय भाषा विभागातर्फे फ्रेंच, जर्मन, जपानी, रशियन, स्पॅनिश या परकीय भाषांच्या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरूकरण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना येत्या 31 मे पर्यंत नियमित शुल्कासह अर्ज करता येणार असून 1 जून ते 8 जून या कालावधीत विलंब शुल्कासह अर्ज स्वीकारले जाणार आहेत. प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी 14 जूनला प्रसिध्द करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

अभ्यासक्रमाच्या प्रवेश शुल्काचा तपशील विद्यापीठाने परिपत्रकाद्वारे प्रसिद्ध केला असून खुल्या गटासाठी प्रवेश अर्ज शुल्क 800 रुपये तर आरक्षित गटातील विद्यार्थ्यांसाठी 600 रुपये शुल्क आकारले जाणार आहे. विद्यापीठाचे हे अर्धवेळ अभ्यासक्रम ऐच्छिक आहेत. त्यास कोणत्याही प्रकारची शुल्क सवलत लागू असणार नाही.

प्रत्येक भाषेचे अभ्यासक्रमासंबंधीचे स्तर असून या स्तरानुसार विद्यार्थ्यांची शैक्षणिक अहर्ता निश्चित करण्यात आली आहे. फाउंडेशन कोर्स लेव्हल एक साठी इयत्ता दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. त्यापुढील स्तरांसाठीची शैक्षणिक अहर्ता विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात नमूद करण्यात आली आहे.

# तरुणांनो, व्यक्त व्हा... टोकाचा निर्णय घेऊ नका!

कनेक्टिंग ट्रस्टची साद; मानसिक तणावमुक्ती व आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी उपक्रम



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'तरुणांनो, टोकाचा निर्णय घेऊ नका. बोलते व्हा, आपले मनमोकळे करा. मनातील नैराश्याचे ओझे दूर करून कणखरपणे उभे राहा,' अशी साद कनेक्टिंग ट्रस्टने तरुणाईला व समाजात नैराश्य, तणावाने ग्रस्त लोकांना घातली आहे. सोलापुरातील प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येने खळबळ उडाली आहे. त्याचबरोबर गेल्या तीन महिन्यात पिंपरी-चिंचवड आणि लगतच्या परिसरात २२४ आत्महत्या झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यामध्ये सर्वाधिक प्रमाण हे तरुणांचे असून, १७७ आत्महत्या पुरुषांनी केल्या आहेत. ही आकडेवारी चिंताजनक आहे. तरुण पिढीच्या मानसिक व भावनिक समस्यांकडे अतिशय गंभीरतेने बघायची गरज निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर कनेक्टिंग ट्रस्टने टोकाचा निर्णय घेऊ नये, असे आवाहन केले आहे. मानसिक आरोग्य आणि आत्महत्या प्रतिबंध यासाठी २० वर्षांपासून कनेक्टिंग ट्रस्ट हेल्पलाईनद्वारे काम करीत आहे. तणावाखाली, नैराश्यात असलेल्याना भावनिक आधार देत, त्यांना व्यक्त होण्याची संधी देत आत्महत्येपासून परावृत्त केले जात आहे. यासाठी ९९२२००४३०५ आणि ९९२२००११२२ या दोन विनामूल्य हेल्पलाईन आठवड्यातील सातही दिवस सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत कार्यरत आहेत. कॉलच्या सुविधेसह अपॉइंटमेंटद्वारे प्रत्यक्ष भेटून बोलायची सोयही आहे. विनामूल्य अपॉइंटमेंट ८४८४०३३३१२ ह्या क्रमांकावर फोन, मेसेज करून घेता येते. ईमेलद्वारे व्यक्त व्हायचे असेल, तर distressmailsconnecting@gmail.com यावर बोलता येते. या सर्व सुविधा विनामूल्य आहेत.

कनेक्टिंग ट्रस्टचे प्रकल्प समन्वयक विक्रमसिंह पवार म्हणाले, "गेल्यावर्षी (२०२४) एकूण ९३४० कॉल आले. त्यामध्ये ६५ टक्के पुरुषांचे, तर ३५ टक्के महिलांचे कॉल आले होते. या हेल्पलाईनवर सर्वाधिक कॉल १८ ते ४० वयोगटातील व्यक्तींकडून आल्याचे निरीक्षण आहे. हेल्पलाईनवर कोणतेही सल्ला न देता व कोणतीही वैयक्तिक किंवा नैतिक निकष लावलेले निर्णय न देता केवळ सहृद्ध भावनेने त्यांचे ऐकून घेऊन भावनिक आधार दिला जातो. मन मोकळे होऊन भावनिक ताण कमी होण्यास मदत होते. सध्या ४७ प्रशिक्षित स्वयंसेवक ही हेल्पलाईन चालवत आहेत. या कार्यात नवीन स्वयंसेवकांना जोडण्याची संधी आहे. त्यासाठी जूनमध्ये अडीच महिन्याचे प्रशिक्षण आयोजिले आहे.

# 'आरटीई' साठी मागविणार पालकांचा अभिप्राय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेसाठी सुधारित नियम तयार करण्यासाठी समिती स्थापन केली आहे. या समितीसमोर पालकांचे अभिप्राय सादर केले जाणार आहेत. त्यासाठी अधिकाधिक पालकांनी २५ एप्रिलपर्यंत अभिप्राय द्यावेत, असे आवाहन प्राथमिक शिक्षण विभागाने केले आहे.

या प्रवेश प्रक्रियेत अधिक सुलभता यावी, या अनुषंगाने पालकांकडून अभिप्राय मागविण्यात येत असल्याचे प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी स्पष्ट केले आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ कलम १२ (सी) (१) नुसार वंचित आणि दुर्बल घटकातील बालकांना २५ टक्के प्रवेश मोफत देण्यात येतात.


राज्यात केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे ही प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी तयार केलेल्या नियमावलीत काही बदल करावेत, अशी मागणी विविध पालक संघटनांकडून होत आहे. तर, आरटीईच्या नियमावलीत बदल करण्याची आवश्यकता असल्याचे संस्थाचालकांकडूनही सांगण्यात येत आहे. त्यामुळे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांच्या अध्यक्षतेखाली शाळांमधील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेसाठी सुधारित नियम तयार करण्याच्या अनुषंगाने राज्य सरकारला शिफारशी करण्यासाठी समिती स्थापन केली आहे. या समितीसमोर पालकांचे अभिप्राय सादर केले जाणार आहेत. त्यासाठी पालकांकडून २५ एप्रिलपर्यंत अभिप्राय मागविले आहेत.

### अभिप्राय देतानाच्या सूचना

- १०० शब्द मर्यादेतच अभिप्राय असावेत
- अभिप्राय मोघम असू नयेत.
- कोणीतीही व्यक्ती, संस्था, शाळा यावर टीका टिप्पणी नसावी
- विषयाशी संबंधितच अभिप्राय असावेत
- आरटीई पोर्टलवर ‘पालकांचे अभिप्राय’ यात अभिप्राय द्यावेत.

" या प्रवेशासाठी काय तरतूदी असाव्यात, त्याची अंमलबजावणी व्हावी याची माहिती पालकांच्या अभिप्रायातून समजणार आहे. त्याचा यासाठी निश्चितच फायदा होणार आहे, त्यामुळेच शिक्षण विभागाने हा निर्णय घेतला असून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे.

— **सचिंद्र प्रताप सिंह,** शिक्षण आयुक्त



## 'भांडारकर' ची हस्तलिखिते पुन्हा युनेस्कोच्या यादीत

**पुणे :** भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरातील सहा हस्तलिखितांचा समावेश युनेस्कोच्या ‘मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टर’ मध्ये झालेला आहे. दोन हजार वर्षांपूर्वी रचलेल्या भरतमुनींच्या नाट्यशास्त्र या ग्रंथाचे एक हस्तलिखित तसेच भगवद्गीतेची काश्मीरी शारदा लिपीतील पाच हस्तलिखिते यांची विशेष नोंद युनेस्कोने नुकतीच घेतलेली आहे.

युनेस्कोच्या यादीतील समावेशाकरिता कागदपत्रांची पूर्तता नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्रातील अभ्यासक डॉ. रमेशचंद्र गौर यांच्या चमूने तसेच भांडारकर संस्थेतील डॉ. अमृता नातू आणि डॉ. श्रीनन्द बापट यांनी गेल्या वर्षी जून २०२४ मध्ये केली होती. जॉर्ज ब्यूह्लर या विद्वानाने १८७५-७६ या वर्षात भगवद्गीतेची तीन हस्तलिखिते काश्मीरमधून मिळवलेली होती. तसेच सर रा. गो. भांडारकरांनी १८८३-८४ या वर्षात दिल्लीहून दोन हस्तलिखिते विकत घेतलेली होती. या सर्व हस्तलिखितांचा संस्कृत भाषेमधला मजकूर शारदा लिपीत लिहिलेला असून भगवद्गीतेवरील निरनिराळ्या प्राचीन टीका या पाच हस्तलिखितांमध्ये आढळतात. त्यामुळे हा वारसा जागतिक महत्त्वाचा असल्याचे युनेस्कोने घोषित केलेले आहे.

नाट्यशास्त्राचे हस्तलिखित जॉर्ज ब्यूह्लर या विद्वानानेच १८७३-७४ या वर्षी राजस्थानातून मिळवलेले होते. या हस्तलिखितामध्ये एकूण २६० पृष्ठे असून नाट्यशास्त्राच्या अत्यंत प्राचीन परंपरेचे प्रतिनिधित्व ही पोथी करते. रूपणिमिश्र हे या पोथीचे लेखनिक होते असे दिसून येते.

ऋग्वेद, सहृदयालोकलोचन हा अभिनवगुप्ताचा काव्यशास्त्रावरील प्राचीन ग्रंथ तसेच पंचतंत्र या भांडारकर संस्थेतील तीन महत्त्वाच्या हस्तलिखितांचा समावेश यापूर्वीच युनेस्कोच्या या यादीत झालेला आहे.

## 'गौरव संविधाना’ तून उलगडला महामानवाचा संघर्षमय प्रवास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणे आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) तर्फे जागर संविधानाचा या उपक्रमाअंतर्गत आज 'गौरव संविधानाचा' या सांगीतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संघर्षमय जीवनप्रवास उलगडला, तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याला 'गौरव संविधानाचा' मधून उजाळा देण्यात आला.

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणे आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेश संघटक सचिव परशुराम वाडेकर, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर यांच्या पुढाकारातून यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज, प्रियदर्शी सम्राट अशोक, महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने संयुक्त जयंती महोत्सव साजरा करण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत आज राजर्षी शाहू महाराज चौक बोपोडीमध्ये दिमाखदार सांगीतिक कार्यक्रम पार पडला.



पुणे 'गौरव संविधानाचा' या सांगीतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संघर्षमय जीवनप्रवास उलगडला, तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याला 'गौरव संविधानाचा' मधून उजाळा देण्यात आला.

## खडकी रेल रोको प्रकरणी दोघांना अटक

**पुणे :** खडकी रेल्वे स्थानकावर ‘रेल रोको’ आंदोलन केल्याप्रकरणी आरपीएफने दोघांना ताब्यात घेतले आहे. शुक्रवारी (ता. १८) सायंकाळी नॅशनल हेरॉल्ड प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी लोणावळा - पुणे लोकल फलाटावर आल्यानंतर रूळावर उतरून सहा मिनिटे ही लोकल रोखून धरली. या आंदोलनामुळे रेल्वे वाहतूक विस्कळित झाली. मुंबईहून पुण्याला येणाऱ्या गाड्यांचे वेळापत्रक बिघडले. रेल्वे वाहतुकीत व्यत्यय आणल्याप्रकरणी आरपीएफने राहुल गोपाल शिंदे (वय २८, रा. शिवाजीनगर) आणि विक्रांत संजय धोत्रे (वय २७, रा. शिवाजीनगर) यांना अटक केली आहे. या प्रकरणी आरपीएफ पोस्ट शिवाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भरधाव ट्रकची धडक, दुचाकीस्वार ठार

**पुणे :** भरधाव ट्रकची दुचाकीला धडक बसून झालेल्या अपघातात दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना नगर रस्त्यावर घडली.

महेश मनोहर चव्हाण (वय २८, रा. साजूर, कराड, जि. सातारा) असे अपघातात मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी नीलेश सुर्वे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ट्रक चालकाविरुद्ध विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार चव्हाण हे बुधवारी रात्री साडेअकरा वाजता दुचाकीवरून नगर रस्त्याने जात होते. खराडी बाह्यवळण मार्ग चौकात भरधाव ट्रकने चव्हाण यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झाल्याने चव्हाण यांचा मृत्यू झाला. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक रवींद्र ढावरे करत आहेत.

# पॅलेटिव्ह केअर ही संज्ञा भारतात रूजणे आवश्यक : डॉ. जामकर




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वैद्यकीय क्षेत्रात वरचेवर होत असलेल्या नवनवीन संशोधनामुळे मनुष्याचे आयुर्मान वाढत असून या वाढत्या आयुर्मानापुढील विविध आजारांची आव्हाने पेलण्यासाठी पॅलेटिव्ह केअर अर्थात परिहार सेवा आवश्यक असून ही ही संज्ञा भारतात रूजणे आवश्यक आहे, असे मत ज्येष्ठ युरोलॉजिस्ट डॉ. अरुण जामकर यांनी व्यक्त केले.

डॉ. प्रियदर्शिनी कुलकर्णी लिखित आणि राजहंस प्रकाशनातर्फे प्रकाशित ‘सोबत सांजवेळची’ या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. अरुण जामकर बोलत होते. भांडारकर इन्स्टिट्यूटच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर प्रसिध्द अभिनेत्री मृणाल देव-कुलकर्णी, राजहंस प्रकाशनाचे संपादक शिरीष सहस्रबुद्धे आणि लेखिका डॉ. प्रियदर्शिनी कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. अरुण जामकर म्हणाले की, एखाद्या दुर्धर आजारासमोर ज्यावेळी रुग्ण आणि नातवाईक दोघेही हतबल होतात. त्यावेळी कोणाच्यातरी आधाराची नितांत आवश्यकता असते. अशावेळी पॅलेटिव्ह केअर अर्थात परिहार सेवा देणारा चमु बरोबर असल्यास त्यांचा मोठा आधार होतो. सेवाभाव हा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. तसेच एकत्र कुटुंब व्यवस्था आणि फॅमिली डॉक्टर हे कधीकाळी आपल्या समाजाचे बलस्थान होते. मात्र, काळाच्या ओघात या दोन्ही संकल्पना नामशेष होण्याच्या टप्प्यावर आल्या आहेत. यावेळी राजहंस प्रकाशनाचे संपादक शिरीष सहस्रबुद्धे यांनी पुस्तकाची भूमिका विशद केली. लेखिका डॉ. प्रियदर्शिनी कुलकर्णी यांनी पुस्तक लेखनाचे अनुभव विशद केले. विनया देसाई यांनी सूत्रसंचालन केले. तर भालचंद्र कुलकर्णी यांनी आभार मानले.

" आपल्या जवळच्या लोकांना आयुष्याच्या संध्याकाळी होणारा वेदनादायी मृत्यू हा आपल्याला आतून-बाहेरून हालवून टाकतो. मृत्यू हा अटळ असला तरी त्या मृत्यूला सामोरे जाण्याची प्रगल्भता किंवा हिंमत पॅलेटिव्ह केअर टेकर्स आपल्यात निर्माण करीत असतात. वेदनेने ग्रस्त रुग्णांमध्ये सकारात्मकता पेरण्याचे काम पॅलेटिव्ह केअरच्या माध्यमातून केले जाते.

**— मृणाल देव- कुलकर्णी,**
प्रसिद्ध अभिनेत्री

# सर्वसामान्य विद्यार्थ्यांनी साधला डिझाईन क्षेत्रातील दिग्गजांशी संवाद

## फॅशन टेक्नॉलॉजी विभागातील विद्यार्थ्यांचा "सृजन - द क्रिएटिव विंग्स २०२४-२५" उत्साहात संपन्न




**चिंचवड :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या बाबुरावजी घोलप महाविद्यालयातील फॅशन टेक्नॉलॉजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्त्र आणि डिझाइन्स चा भव्य फॅशन शो "सृजन – द क्रिएटिव विंग्स २०२४-२५" आज मोठ्या उत्साहात संपन्न झाला.सामान्य घरातून आलेल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील फॅशन शो चा अनुभव देणे आणि त्यांना फॅशन, वस्त्र, डिझाईन क्षेत्रातील दिग्गजांशी संवाद साधता यावा यासाठी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी हा फॅशन शो आयोजित केला होता. यंदाचा फॅशन शो हा खादी आणि ज्युट या भोवती गुंफन्यात आलेला होता.

एलप्रो सिटी स्क्वेअर मॉल ऑडिटोरियम,चिंचवड, पुणे येथे संपन्न झालेल्या या फॅशन शो प्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रा.कुलगुरू पराग काळकर, विद्यापीठाच्या कुलसचिव ज्योती भाकरे, सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक प्रभाकर देसाई,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य,पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव अॅड. संदिप कदम,प्राचार्य डॉ.संगीता व्ही. जगताप, विभागप्रमुख प्रा.प्रिती सदाशिव जोशी, ज्युरी दीपाली जोशी, पूजा वाघ, प्राजक्ता साळवे ,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य बागेश्री मंथळकर,डॉ नितीन घोरपडे, डॉ देविदास वायदंडे,डॉ.डी.बी. पवार, संदीप पालवे, प्राचार्य पंडित शेळके, डॉ तुषार शितोळे, डॉ. शर्मिला चौधरी, डॉ अंजली काळकर, सरोज पांडे,योगेश पवार आदि यावेळी उपस्थित होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य , प्राचार्य डॉ संगीता जगताप म्हणाल्या, अलीकडे एक दोन महीने कपडे वापरुन नवीन ट्रेंडचे कपडे वापरण्याकडे कल असतो. मात्र आमच्या विद्यार्थ्यांनी ज्युट आणि खादी यातून आधुनिक कपडे निर्माण केले आहेत. मुलांचा उत्साह वाढवण्यासाठी आज विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित आहेत, यातूनच मुलांना भविष्याच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

विभागप्रमुख प्रा. प्रीती सदाशिव जोशी म्हणाल्या, आमच्याकडे विविध कोर्सेस चालतात, हा फॅशन शो पदवीच्या विद्यार्थ्यांचा आहे. एका थीम वर रिसर्च करून या शो मध्ये सादरीकरण केले जाते. आजच्या शो मध्ये ज्युट ला पारंपारिकता जपत मॉडर्न लुक दिल्याचे बघायला मिळते

या फॅशन शोच्या यशस्वीतेसाठी फॅशन टेक्नॉलॉजी विभागाच्या वद्यार्थ्यांच्या मदतीसाठी आणि मार्गदर्शनासाठी फॅशन टेक्नॉलॉजीच्या विभाग प्रमुख प्रा प्रीती सदाशिव जोशी, वीणा करांडे, फातेमा सय्यद, अंजली बोंद्रे, ऋतुजा पाटसकर यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांचे पालकही मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर जे बंड्या यांनी केले.

## आंबेगावात जागेच्या वादातून तरुणाचा खून

**पुणे :** पुण्यात हत्येची मालिका सुरूच असल्याचे समोर आले आहे. पुण्यातील आंबेगाव परिसरात रेकॉर्डवरील गुन्हेगारांकडून एकाची हत्या करण्यात आली आहे. आंबेगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत आज पहाटेच्या सुमारास ही घटना घडली आहे. यात गुन्हेगारांकडून एका तरुणाचा खून करण्यातं आलाय.

प्राथमिक माहितीनुसार, जागेच्या वादातून तरुणाचा खून करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. शुभम सुभाष चव्हाण अस हत्या झालेल्याचे नाव असून आज पहाटे साडेचार वाजता ही घटना घडली आहे. तर रेकॉर्ड वरील गुन्हेगार अमर साकोरे आणि त्याच्या दोन साथीदारांकडून ही हत्या करण्यात आली आहे. स्टंप आणि लाकडी बांबू डोक्यात घालत ही हत्या करण्यात आलीय. घटनेची माहिती मिळताच पुण्यातील आंबेगाव पोलीस स्टेशनच्या पथकाने घटनास्थळ गाठत पुढील कारवाई सुरू केलीय. तर या प्रकरणी 3 आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पोलीस आरोपी मारेकऱ्यांचा शोध घेत आहे.



## दापोडी येथे ईस्टर संडे मोठ्या उत्साहात साजरा

**पिंपरी :** प्रभु येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या स्मरणार्थ ख्रिस्ती बांधवांद्वारे साजरा केला जाणारा ईस्टर संडे दापोडी येथील विनयार्ड वर्कर्स चर्चमध्ये मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला. हा पवित्र दिवस ख्रिश्चन श्रद्धेतील मूलभूत स्तंभ असून, आशा आणि नवजीवनाचे प्रतीक मानला जातो.

यावेळी चर्चचे संस्थापक बिशप डॉ. पीटर डेव्हिड सिलवे आणि पास्टर डॉ. जयश्री पीटर सिलवे यांच्या नेतृत्वाखाली चर्चमध्ये उपस्थितांनी स्तुती-प्रार्थनेत सहभाग घेतला. त्यांनी दिलेला प्रेरणादायी संदेश येशू ख्रिस्ताने मृत्यूवर मिळवलेला विजय आणि अनंत जीवनाच्या आशेवर आधारित होता, असे बिशप पीटर यांनी यावेळी सांगितले. ईस्टर ही देवाने मानवाला दिलेली एक हमी आहे. जीवनात कितीही अडचणी, दुःख किंवा अपयश आले, तरी देवाच्या सामर्थ्याने आपण पुन्हा उभे राहू शकतो. यावेळी मोठया संख्येने ख्रिस्त बांधव उपस्थित होते.

## गावठी हातबॉम्बची विक्री; तरूणास कारावास

**पुणे :** विक्री करण्याच्या उद्देशाने बॉम्ब बाळगल्याप्रकरणी तरुणास न्यायालयाने दोन महिने साध्या कारावासासह एक हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश जे. जी. डोरले यांनी हा निकाल दिला.

विकी अशोक सावंत (वय २४, रा. शिवकृपा कॉलनी, नढेनगर, काळेवाडी) असे शिक्षा सुनावण्यात आलेल्याचे नाव आहे. ९ सप्टेंबर २०१५ ला दुपारी अडीचच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला होता. वाकड पोलिस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंगदरम्यान सावंत याच्या जर्किनच्या खिशामध्ये बेकायदेशीर विनापरवाना हातबॉम्ब आहे. तो रहाटणी येथील थोपटे लॉन्स समोर हातबॉम्ब विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्याला ताब्यात घेत त्याची झडती घेतली असता त्याकडे रुमालमध्ये गुंडाळलेला एक हातबॉम्ब आढळून आला. त्यानंतर बॉम्ब शोधक व नाशक पथकाला पाचारण करून हातबॉम्बची तपासणी करण्यात आली.

पथकाने तो जिवंत असल्याचा अहवाल दिला. सावंत याला याप्रकरणात अटक करत त्याविरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. याप्रकरणात, सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकील वामन कोळी यांनी काम पाहिले. त्यांनी नऊ साक्षीदार तपासले.

# महापुरूषांचे विचार आत्मसात करावेत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** सुदृढ आदर्शवत समाज निर्मितीसाठी युवकांनी महापुरुषांचे विचार आत्मसात करून रोजच्या जिवनात त्यांचे संस्कार अंगिकारले पाहिजेत. ध्येयपूर्तीसाठी लक्ष्य असणे गरजेचे आहे. त्यासाठी कष्टाची अभ्यासाची खडतर परिश्रमाची तयारी असली पाहिजे. जुनी सांगवी येथील फिनिक्स सोशल ऑर्गनायझेशन आयोजित ' संयुक्त जयंती महोत्सवाच्या पहिल्या दिवसाच्या व्याख्यानमालेत प्रा.नीतिन बानगुडे पाटील यांनी 'चला नवीन पिढी घडवुया' विषयावर व्याख्यानात बोलताना सांगितले.

आज समाजात संस्कारक्षम पिढी तयार करायची असेल तर, आजच्या नवीन पिढी वर योग्य संस्कार व्हायला हवे. युवकांमधील वाढती व्यसनाधीनता रोखण्यासाठी पालकांनी मुलांवर योग्य संस्कार करायला हवेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी सगळ्या जाती धर्माची माणसं सोबत घेऊन पुढे गेले. त्यांनी माणसा-माणसात भेद केला नाही.

परस्त्रीचा मातेसमान आदर राखणे ही त्यांची शिकवण आहे. मात्र आजची पिढी नक्की कोणत्या दिशेने जातेय? हा प्रश्न उपस्थित होतो.ही चिंताजनक बाब आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात की, तुम्हाला माणूस म्हणून जगताना केवळ पैसा महत्वाचा नसून माणसाचे, शील, विनय, नीतीमत्ता अधिक महत्त्वाची आहे.महात्मा ज्योतिराव फुले यांनी शेतकऱ्यांसाठी ज्या गोष्टी सांगितल्या त्या आजही तशाच्या तशा लागू पडतात. त्यात काहीही बदल झालेला नाही.



> वैचारिक गुलामगिरी नष्ट न झाल्याने, पिढी कालची असू द्या अथवा आजची. शोषण होतच राहते. त्यात बदल केवळ प्रश्न पडणारी जीवंत मनाची माणसं करु शकतात. जो रण गाजवतो त्याला विर म्हणतात जो मनावर राज्य करतो त्यास महावीर म्हणतात. त्या दिशेने युवकांनी ध्येय ठेवायला हवे.
> **-प्रा. नितीन बानगुडे पाटील,** प्रसिध्द व्याख्याते

व्यासपिठावर राजू साळवे,प्रा. राजाभाऊ भैलुमे, डॉ.प्रकाश रोकडे,यश ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत बाराथे, बाळासाहेब सोनवणे, फिनिक्स सोशल ऑर्गनायझेशनचे रविंद्र यादव, माजी नगरसेवक संतोष कांबळे, आरंभ महिला प्रतिष्ठानच्या तृप्ती कांबळे, ज्येष्ठ नागरिक संघाचे कमलाकर जाधव, बंडोपंत शेळके, हर्षल कांबळे,जय गणेश क्रिकेट क्लबचे युवक पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुर्यकांत वराडकर यांनी केले.

# मराठी भाषेचे नुकासन सहन करणार नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** राष्ट्रीय शिक्षण धोरणाची राज्यात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासूनच म्हणजे यंदापासूनच अंमलबजावणी सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला असून या नव्या धोरणानुसार आता पहिलीपासूनच मराठी, इंग्रजी बरोबरच हिंदी भाषाही सक्तीची करण्यात आली आहे. नव्या शैक्षणिक धोरणानुसार शालेय अभ्यासक्रमात भाषासंवर्धनाला विशेष महत्त्व देण्यात आले असून, इयत्ता १ ते ५ मध्ये मराठी, इंग्रजी आणि हिंदी या तीन भाषा सक्तीच्या असतील. आता खासदार सुप्रिया सुळे यांनीसुद्धा राज्य सरकारला इशारा दिला आहे. मराठी भाषेचे नुकसान होणार असेल तर आम्ही सहन करणार नाही, असा इशारा खासदार सुप्रिया सुळे यांनी दिला आहे.

राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४ नुसार महाराष्ट्रात पहिलीपासूनच हिंदी ही भाषा अनिवार्य करण्यात आली आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या, नवीन शिक्षण धोरण हे चुकीचे आहे. मुलांचे प्रचंड नुकसान होईल, शिक्षकांचीही तयारी झालेली नाही. माझे म्हणणे एवढाच आहे की सीबीएसई बोर्ड कशासाठी पाहिजे. एसएससी बोर्ड तुम्ही का नाही इम्प्रूव्ह करत आहात. मग महाराष्ट्र बोर्डाचे काय होणार हा बेसिक मुद्दा आहे. म्हणजे मराठी भाषेचा तर मुद्दा आहेच. पण त्याच्याबरोबर महाराष्ट्राच्या बोर्डाचे काय करणार आहात, केंद्र सरकारचे बोर्ड का घेताय? असा सवाल सुळे यांनी उपस्थित केला.

महाराष्ट्राचे चांगले बोर्ड आहे. मला बालभारतीचा मराठी भाषेचा सार्थ अभिमान आहे. फार लोकांनी कष्ट करून बालभारतीचची अतिशय उत्तम पुस्तके केलेली आहेत, जी देशासाठी वापरली जातात. माहितीसाठी सांगते, जर महाराष्ट्रातली एसएससी अतिशय उत्तम आहे. तर त्याला तुम्ही डावलून सीबीएसई पर्याय द्या. तुम्ही हे गरीब कष्ट करणाऱ्यांच्या मुलांना देणार. जी मोठ्या मोठ्या फी भरून त्या मोठ्या इंटरनॅशनल बोर्डमध्ये मध्ये मुले शिकतात. त्यांना हिंदी मराठी सक्तीचे करणार का? मग सगळ्यांना नियम कायदा करायचा असेल तर सगळ्यांना एक केला पाहिजे. हे असे सोई प्रमाणे चालणार नाही. आणि नवे शिक्षण धोरण ज्या पद्धतीने महाराष्ट्रात येत आहे. त्याच्यात मराठी भाषेचे नुकसान होणार असेल तर ते आम्ही सहन करणार नाही. आणि हे धोरण आम्ही येऊ देणार नसल्याचे खासदार सुळे यांनी सांगितले.

# भाजप मंडल अध्यक्षांच्या निवडीची प्रक्रिया पूर्ण -धीरज घाटे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहर भाजप मंडल अध्यक्ष निवडीची प्रक्रिया पूर्ण झाली असून, शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी सर्व मंडलांच्या अध्यक्षांच्या नावांची घोषणा प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

हडपसर (४ मंडल), कसबा (३ मंडल), शिवाजीनगर (३ मंडल), कोथरूड (३ मंडल), वडगावशेरी (४ मंडल), कॅन्टोन्मेंट (२ मंडल), पर्वती (३ मंडल) आणि खडकवासला (४ मंडल) अशा विधानसभा निहाय 26 मंडल अध्यक्षांची निवड प्रक्रिया झाल्याचे घाटे यांनी कळविले.



निवड झालेल्या अध्यक्षांची नावे पुढीलप्रमाणे:

संदीप मोझे: लोहगाव - धानोरी, नितीन जाधव:विमाननगर, सोमनाथ नगर, आशिष देशमुख: खराडी वडगावशेरी, रमेश गव्हाणे: येरवडा, शैलेंद्र बडदे: शिवाजीनगर दक्षिण, आनंद छाजेड: शिवाजीनगर उत्तर, शाम काची: खडकी, लहू बालवडकर: कोथरूड उत्तर (बाणेर बालेवाडी पाषाण), निलेश कोंढाळकर: कोथरूड मध्य, कुलदीप सावळेकर: कोथरूड (एरंडवणे, कर्वेनगर), राजू कदम: पर्वती - सिंहगड रोड, निखिल शिळीमकर: मार्केट यार्ड, प्रशांत थोपटे: तळजाई, सुशांत निगडे: कोरेगाव पार्क घोरपडी वानवडी डायस प्लॉट -पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड, विशाल कोंडे: ससुन - पुणे स्टेशन - ताडीवाला रोड भवानी रोड -काशीवाडी- सोमवार पेठ मंगळवार पेठ - रास्ता पेठ, अमित कंक: कसबा गणपती, छगन बुलाखे : समता भूमी, प्रशांत सुर्वे: क्रांतिवीर उमाजी नाईक, महेश भोसले: धनकवडी बालाजीनगर, गणेश वर्पे: वारजे - बावधन - भुसारी, यशवंत लायगुडे: वडगाव बुद्रुक - धायरी, रुपेश घुले: धायरी-शिवणे, प्रमोद टिळेकर: कात्रज, सुखसागर नगर, कोंढवा बुद्रुक, अमर गव्हाणे: कोंढवा खुर्द, महमंदवाडी, संदीप लोणकर: घोरपडी, मुंढवा, मगरपट्टा, केशव नगर, माळवाडी, साडे सतरा नळी, भोसले गार्डन आणि आकाश डांगमाळी: वैदुवाडी, रामटेकडी, काळेपडळ, ससाणे नगर हडपसर गाव.

# हिंदूवरील अत्याचारा विरोधात विहिंपचे आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'पश्चिम बंगाल की गलीया सुनी है, ममता सरकार खुनी है'.. 'हिंदू वरील अत्याचार थांबलाच पाहिजे'.. अशा घोषणा देत पश्चिम बंगाल येथे हिंदूवर होत असलेल्या होत अत्याचाराचा जाहीर निषेध करण्यासाठी विश्व हिंदू परिषदेच्या वतीने जन आक्रोश आंदोलन करण्यात आले. पश्चिम बंगाल मध्ये लवकरात लवकर राष्ट्रपती शासन लागू करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.त्याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयात महामहिम राष्ट्रपती यांच्या नावाने देण्यात आले.

विश्व हिंदू परिषद बजरंग दल कसबा जिल्हा यांच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालय येथे विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत आंदोलन केले. यावेळी पश्चिम महाराष्ट्र प्रांत मंत्री किशोर चव्हाण, लालजी महाराज, बजरंग दल संयोजक नितीन महाजन, विभाग मंत्री धनंजय गायकवाड, केतन घोडके, विभाग सहमंत्री संतोष अनगोळकर, जिल्हा मंत्री विजय कांबळे, बजरंग दल संयोजक विक्रम घुंगुरवाले, मातृ शक्ती संयोजिका सरिता अंबिके यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.

किशोर चव्हाण म्हणाले, पश्चिम बंगाल मध्ये होणारे हिंसक आंदोलन थांबवण्यात ममता बॅनर्जी सरकार यांना अपयश आले आहे.




**पुणे** विश्व हिंदू परिषद बजरंग दल कसबा जिल्हा यांच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालय येथे विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत आंदोलन केले. पश्चिम बंगाल मध्ये लवकरात लवकर राष्ट्रपती शासन लागू करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.त्याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयात महामहिम राष्ट्रपती यांच्या नावाने देण्यात आले.

# ज्येष्ठांप्रमाणे तरुणांमध्ये हास्य चळवळ रूजावी : काटे




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बदलत्या जीवनशैलीत तरूणांध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार या शारीरिक व्याधींसह अनेक मानसिक व्याधींनी शिरकाव केला आहे. या सगळ्या व्याधींवर नियंत्रण आणि विजय मिळवण्यासाठी हास्य व्यायाम हा रामबाण उपाय आहे. हास्य व्यायाम हे केवळ ज्येष्ठांसाठी असतात असा गैरसमज असून यासाठी ज्येष्ठांप्रमाणे तरूणांमध्ये हास्य चळवळ रूजली पाहिजे, असे मत पुण्यातील हास्य क्लबचे प्रणेते आणि नवचैतन्य हास्ययोग परिवाराचे संस्थापक-अध्यक्ष विठ्ठल काटे यांनी व्यक्त केले.

पुण्यातील हास्य क्लबचे प्रणेते आणि नवचैतन्य हास्ययोग परिवाराचे संस्थापक-अध्यक्ष विठ्ठल काटे यांनी हास्य चळवळीच्या माध्यमातून आरोग्यदायी समाज निर्मितीत मोलाचे योगदान दिले आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण केली आहे. हास्य चळवळीतील त्यांच्या त्रिदशक वाटचाली निमित्त विदिशा विचार मंचतर्फे आज विठ्ठल काटे यांचा सन्मान कोहिनूर ग्रुपचे चेअरमन आणि कार्यकारी संचालक कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी काटे बोलत होते. या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर जनसेवा फौंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. विनोद शहा, जयराज ग्रुपचे चेअरमन प्रसिध्द उद्योगपती डॉ. राजेश शहा आणि विदिशा विचार मंचच्या संस्थापक-संचालक ममता क्षेमकल्याणी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना विठ्ठल काटे म्हणाले की, पुण्यामध्ये प्रारंभी ही हास्य चळवळ सुरू करण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागले. हास्य व्यायाम हा केवळ शरीराच्या आरोग्यासाठी नव्हे, तर मानसिक आरोग्यासाठी देखील महत्वाचा असून त्याविषयी शास्त्रीय संशोधन झाले आहे.



> हास्य हा जगण्याचा गुरूमंत्र आहे. रोजच्या जगण्यात ताणतणाव खूप असून मोकळेपणाने हासणे हे देखील आता कठीण झाले आहे. महाराष्ट्रात विठ्ठल काटे यांनी हास्य चळवळ रूजवली. हास्य क्लबमध्ये घालवलेला एक तास हा तुमच्या आयुष्याला कलाटणी देऊ शकतो, एवढी ताकद त्यामध्ये आहे.
> **-कृष्णकुमार गोयल;** चेअरमन आणि कार्यकारी संचालक, कोहिनूर ग्रुप

संपादकीय विशेष

# बंगाल सतत का धुमसते?

गेल्या काही दिवसांपासून पश्चिम बंगालमधील तीन जिल्हे दंगलीच्या वणव्यात होरपळत आहेत. भाजपने पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश आणि बिहारमधील विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नजरेसमोर ठेवून वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर करून घेतले असले, तरी सत्ताधारी आणि विरोधक त्याचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न करत असून मतांच्या लालसेपोटी समाजात अस्वस्थता पसरवली जात आहे. पश्चिम बंगालमधील तीन जिल्हे वक्फ कायद्यानिमित्त होत असलेल्या दंगलीमध्ये होरपळत आहेत. पश्चिम बंगाल सरकारचे दंगल हाताळणीतील अपयश उघड झाले आहे. त्यामुळे तर उच्च न्यायालयाला केंद्रीय सुरक्षा दलांना तिथे पाठवावे लागले. त्यानंतर काही प्रमाणात दंगल आटोक्यात आली असली, तरी आता मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राज्यात 'सीएए' आणि वक्फ कायदा लागू होऊ देणार नाही, अशी भूमिका घेतली आहे. अर्थातच पश्चिम बंगालमधील 31 टक्के मुस्लिम समाज डोळ्यासमोर ठेवून ती घेतली आहे, हे वेगळे सांगायला नको; परंतु केंद्र सरकारने केलेले कायदे संपूर्ण देशासाठी असताना पश्चिम बंगालसारखे एखादे राज्य अशी वेगळी भूमिका घेऊ शकते का, हा खरा प्रश्न आहे आणि त्याचे उत्तर नाही असे आहे.

केंद्राने केलेल्या कायद्याच्या विरोधात भूमिका घेण्याचा राज्यांना फारच मर्यादित अधिकार आहे. ते कसे हे जाणून घेतले पाहिजे. वक्फ हा मध्यवर्ती मुद्दा आहे. वक्फचा समावेश भारतीय राज्यघटनेच्या समवर्ती यादीत करण्यात आला आहे. याचा अर्थ केंद्र आणि राज्य सरकार असे दोघेही त्यावर कायदे करू शकतात. केंद्र सरकारने कोणताही कायदा केल्यास त्याला आव्हान देण्याचा किंवा त्याचे पालन न करण्याचा अधिकार राज्यांना नाही. वक्फ दुरुस्ती कायद्याच्या विरोधात पश्चिम बंगालमध्ये विविध भागांमध्ये अशांतता पहायला मिळाली. सर्वात वाईट परिस्थिती मुर्शिदाबादमध्ये दिसली. समशेरगंज, धुलियान-सुतीसह अनेक ठिकाणी हिंसाचार झाला. सरकारी मालमत्तेची तोडफोड आणि जाळपोळ करण्यात आली. राज्याच्या इतर भागातही अशांतता पसरली आणि काहीजणांना पश्चिम बंगालमधील हिंसाचारात जीव गमवावा लागला. हिंसाचारामुळे मुर्शिदाबादमधील सर्वसामान्य नागरिक भयभीत झाले. या अशांततेमागे कोण आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

हा निषेध फक्त वक्फच्या विरोधात आहे की या हिंसक निदर्शनामागे बांगलादेशी मूलतत्त्ववाद्यांचा संबंध आहे, याचा विचार व्हायला हवा. मुर्शिदाबाद बांगलादेशच्या सीमेला लागून आहे तसेच मुर्शिदाबादमध्ये अवैध घुसखोरी आणि तस्करीचे आरोप आहेत. भाजप नेते आणि विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांनी म्हटले आहे की संपूर्ण मुर्शिदाबाद जिल्हा आता खासदार आणि आमदारांच्या नियंत्रणाखाली नाही, तर 'पीएफआय', 'सिमी' आणि 'अन्सारुल बांगला टीम' यासारख्या अतिरेकी संघटनांच्या आणि मालदा आणि मुर्शिदाबादमधील कट्टरपंथी गटांच्या नियंत्रणाखाली आहे. सुवेंदू अधिकारी यांच्या वक्तव्यात ममता बॅनर्जी यांच्यावर टीकेचा रोख असला, तरी त्यांनी केलेला बांगलादेशी संघटनांचा उल्लेख पाहता पश्चिम बंगालमधील हिंसाचाराला बांगलादेशी घटक कारणीभूत आहेत आणि त्यात राज्याबरोबरच केंद्र सरकारचे अपयश अधोरेखित होते. त्याचे कारण देशाच्या सीमा संरक्षणाची जबाबदारी राज्यांची कमी आणि केंद्राची जास्त असते. मुर्शिदाबादमधील सुती, धुलियान, समशेरगंज आणि जंगीपूरचे चित्र पाहता एक विशिष्ट शक्ती अशांतता निर्माण करत असल्याचे स्पष्ट होते. पोलिसांशी चकमकीत मोठा वर्ग सामील आहे. तोच तोडफोड घडवून आणत आहे; मात्र स्थानिकांचे म्हणणे आहे की हाणामारी करणारे मुख्य मिरवणुकीमध्ये सहभागी नव्हते. वक्फविरोधी मोर्चा संपल्यानंतर वेगळेच लोक हिंसाचार पसरवत आहेत. ते पोलिसांवर दगडफेक करत आहेत. बॉम्ब फेकत आहेत, लूटमार करत आहेत. हे व्यावसायिक गुन्हेगार असल्याचे दिसून येते. अशांतता पसरलेल्या भागातील रहिवासी हिंसाचारात सामील असलेल्यांना ओळखत नाहीत.

देशात तसेच पश्चिम बंगालमध्ये 'एनआरसी' आणि कृषी कायद्याच्या विरोधात निदर्शने झाली; पण तिथे सर्वसामान्यांवर हल्ले झाले नाहीत. त्यामुळे या हिंसाचारात बांगलादेशी कट्टरवाद्यांचा हात असण्याची भीती आहे. मुर्शिदाबाद हा बांगलादेशच्या सीमेला लागून असलेला जिल्हा आहे. बाहेरील हल्लेखोरांनी येथे प्रवेश करणे असामान्य नाही. काही वर्षांपूर्वी कालियाचक पोलिस ठाणे जाळल्याच्या प्रकरणात कोणतीही कट्टरतावादी शक्ती नसून या परिसरात सक्रिय असलेल्या बनावट नोटा आणि अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या टोळ्यांशी संबंधित गुन्हेगार असल्याचे उघड झाले आहे.

धुलियान, सुती हेदेखील पश्चिम बंगालमधील संवेदनशील क्षेत्रांपैकी एक आहे. एका बाजूला झारखंडची सीमा तर दुसऱ्या बाजूला बांगलादेशची सीमा आहे. अमली पदार्थांची तस्करी आणि बनावट चलनाचा हा एक मार्ग आहे.

याच सुमारास पश्चिम बंगाल शिक्षक भरती घोटाळ्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर, तृणमूल सरकारने मध्यममार्ग शोधला आहे. या घोटाळ्यात 25,753 शिक्षकांचा समावेश आहे. शालेय सेवा आयोगाने (एसएससी) 19,000 पात्र शिक्षकांची यादी राज्य शिक्षण विभागाला पाठवली आहे. घोटाळा उघडकीस येईपर्यंत कार्यरत असलेल्या सुमारे सात हजार शिक्षकांनाच अपात्र घोषित केले जाईल. राज्य सरकार लवकरच पात्र शिक्षकांची नावे सार्वजनिक करू शकते. 3 एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयाने या घोटाळ्याबाबत कोलकाता उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला होता. उच्च न्यायालयाने 2016 ची शिक्षक आणि कर्मचारी भरती बेकायदेशीर ठरवून रद्द केली होती. भरती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे उच्च न्यायालयाने म्हटले होते.

नोकरी गमावलेले शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी दहावीच्या परीक्षेच्या 'ओएमआर शीट्स' सार्वजनिक करण्याची मागणी करत आहेत. सीबीआयने 19 हजार पात्र उमेदवारांची यादी तपासली. पश्चिम बंगाल सरकारने 2016 मध्ये राज्यस्तरीय निवड चाचणी-2016 (एसएलसीटी) द्वारे सरकारी आणि अनुदानित शाळांसाठी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती केली. त्यानंतर, 24,640 रिक्त पदांसाठी 22 लाखांहून अधिक लोकांनी भरती परीक्षेत भाग घेतला होता. या भरतीमध्ये निवड होण्यासाठी 5 ते 15 लाख रुपयांची लाच घेतली गेल्याचा आरोप आहे. दरम्यान, ममतादीदी बेफाम विधाने करत कायद्याच्या राज्यालाच आव्हान देत

# व्यापारयुध्द आणि चीन, युरोपवरील परिणाम

विश्वभ्रमण

**प्रा. जयसिंग यादव**

**अमेरिकेच्या जशास तशा शुल्कवाढीच्या निर्णयामुळे युरोपीय महासंघ आणि चीन द्विपक्षीय व्यापार वाढवण्याचा प्रयत्न करू शकतात. असे असताना युरोपला दुहेरी फटका सहन करावा लागू शकतो, अशी भीती अर्थतज्ज्ञांना आहे. एकीकडे अमेरिकेकडून प्रचंड शुल्क आकारले जात आहे आणि दुसरीकडे चीनसोबत नवी व्यापारी स्पर्धा सुरू होणार आहे. चीनचा प्रचंड पुरवठा युरोपीयन प्रतिस्पर्ध्यांसाठी धोका आहे. त्याचाच हा वेध.**

'जोखीम कमी करा, वैविध्य आणा आणि व्यवसाय धोरण बदला'हा एके काळी जागतिक व्यापारावरील चीनच्या वाढत्या वर्चस्वाचा मुकाबला करण्यासाठी वापरला जाणारा मंत्र होता. तो आता अमेरिकेला लागू केला जात आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुल्क लादून ऑस्ट्रेलियापासून ब्राझीलपर्यंतच्या वित्तीय बाजारात खळबळ उडवून दिली. त्यांनी चिनी बनावटीच्या वस्तूंवरील शुल्क 125 टक्क्यांपर्यंत वाढवले आहे. व्हाईट हाऊसने स्पष्ट केले की चिनी उत्पादकांना अमेरिकेत आयातीवर एकूण 145 टक्के शुल्क भरावे लागेल. कारण नवीन 125 टक्के शुल्क वर्षाच्या सुरुवातीला लादलेल्या 20 टक्क्यांव्यतिरिक्त आहे. बऱ्याच चिनी वस्तू, खास करून अमेरिकी बाजारपेठेसाठी बनवल्या जात असल्याने, चीनला ती उत्पादने देशांतर्गत ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यात अडचणी येतील, अशी चिंता अर्थतज्ज्ञांना वाटते. अशा परिस्थितीमध्ये चीन आपल्या निर्यात धोरणाचा पुनर्विचार करत आहे; जेणेकरुन तो अमेरिकेत कमी झालेल्या निर्यातीचा धक्का दूर करण्यासाठी इतर जागतिक भागीदारांना प्राधान्य देऊ शकेल. लंडन येथील 'एनोडो इकॉनॉमिक्स'च्या संस्थापक आणि मुख्य अर्थशास्त्रज्ञ डायना चोयलेवा यांच्या मते चीन आपल्या प्रादेशिक शेजाऱ्यांना निर्यात वाढवण्याचा प्रयत्न करेल. त्यापैकी काहीजणांशी त्याचे ऐतिहासिकदृष्ट्या तणावपूर्ण संबंध आहेत. चीन जुन्या शत्रूंसोबत संबंध सुधारण्याचा प्रयत्न करत आहे. सहा वर्षांमध्ये प्रथमच जपान आणि दक्षिण कोरियाशी चीनचा आर्थिक संवाद नुकताच पुन्हा सुरू झाला आहे. हे सूचित करते की या प्रदेशातील प्रमुख शक्ती अमेरिकेच्या अनिश्चिततेला प्रतिसाद म्हणून त्यांच्या संबंधांचा पुनर्विचार करत आहेत.

दक्षिण कोरियाने अमेरिकेच्या शुल्कवाढीला 'संयुक्त प्रतिसाद' देण्याचा चिनी सरकारी माध्यमांचा दावा नाकारला असला, तरी अनेक वर्षांच्या तणावपूर्ण संबंधांनंतर केवळ त्रिपक्षीय आर्थिक सहकार्य पुन्हा सुरू करणे हे धोरणात्मक बदलाचे संकेत देते. गेल्या दोन दशकांमध्ये चीन आणि आग्नेय आशियाने त्यांचे व्यापारी संबंध लक्षणीयरीत्या मजबूत केले आहेत. चीन सरकारच्या आकडेवारीनुसार, 2023 मध्ये चीन आणि 'एशियन' देशांमधील एकूण व्यापार सुमारे 872 अब्ज डॉलरपर्यंत पोहोचला आहे. चिनी कंपन्यांची अमेरिकेला होणारी निर्यात बंद झाल्यामुळे हा आकडा आणखी वाढणार आहे. चिनी उत्पादक आग्नेय आशियामध्ये अशा संधी शोधतील, ज्यात त्यांनी पूर्वी जास्त वेळ, मेहनत आणि पैसा गुंतवला नाही. कारण त्यांच्याकडे एक किफायतशीर अमेरिकी बाजारपेठ होती, जी त्यांची सर्व उत्पादने वापरत असे. अमेरिकेने पुकारलेल्या व्यापारयुद्धाला युरोपनेही त्याच भाषेत उत्तर दिले.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुल्कवाढीला नव्वद दिवसांची स्थगिती दिल्याने युरोपीय महासंघानेही नव्याने लादलेल्या शुल्काला नव्वद दिवसांची स्थगिती दिली. याचा अर्थ अमेरिका आणि युरोप सध्या तरी जशास तसे उत्तर देण्याच्या मनस्थितीत आहेत. 'टॅरिफ वॉर'मुळे अमेरिकेने जगातील अनेक मित्र गमावले आहेत, असा त्याचा अर्थ आहे. युरोपलाही आपल्या व्यापारात विविधता आणण्याची गरज आहे. अमेरिकेने लादलेले नवीन परस्पर शुल्क 90 दिवसांसाठी रोखून ठेवले असले तरी 416 अब्ज किमतीच्या युरोपीय महासंघामधील निर्यातीवर अमेरिका अजूनही 20 टक्के शुल्क भरत आहे.

अमेरिकी संरक्षणवादाचा मुकाबला करण्यासाठी युरोपीय महासंघ 'इंडो-पॅसिफिक' आणि 'ग्लोबल साऊथ'मधील देशांपर्यंत पोहोचण्याची योजना आखत आहे. या आठवड्यात व्हिएतनामच्या तीन दिवसांच्या भेटीदरम्यान स्पॅनिश पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांनी युरोपला नवी बाजारपेठ शोधण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, त्यांचे सरकार युरोपला आग्नेय आशियाशी अधिक व्यापारासाठी खुले करण्यासाठी वचनबद्ध आहे. तथापि, 'युरोपीयन पॉलिसी सेंटर' (ईपीसी) मधील धोरण विश्लेषक वर्ग फोकमन यांनी इशारा दिला की युरोपला इतर बाजारपेठांमधून ट्रान्स अॅटलांटिक निर्यातीची भरपाई करणे कठीण जाईल. कारण अमेरिकेची अर्थव्यवस्था मोठी आणि श्रीमंत आहे. नवीन व्यापार सौद्यांना युरोपीय महासंघाच्या सदस्यांमध्ये खूप विरोध केला. यामध्ये त्यांनी दक्षिण अमेरिकन प्रादेशिक ब्लॉक मर्कोसूर सोबत युरोपीय महासंघाच्या व्यापार कराराच्या वेळी ब्राझील आणि अर्जेंटिनासाठी कृषी क्षेत्र उघडण्याच्या फ्रान्सच्या सावधगिरीवर भर दिला. या कराराच्या वाटाघाटी करण्यासाठी 25 वर्षे लागली आणि अद्याप त्याला मान्यता मिळणे बाकी आहे. आज गरज असूनही नवीन सौद्यांची अंमलबजावणी करणे कदाचित खूप कठीण जाईल. वॉशिंग्टनस्थीत 'सेंटर फॉर स्ट्रॅटेजिक अँड इंटरनॅशनल स्टडीज' (सीएसआयएस) या थिंक टॅंकने प्रकाशित केलेल्या एका टिप्पणीत म्हटले आहे, की अमेरिकेने चीनवर लादलेल्या टॅरिफमुळे चीन आता युरोपीय महासंघाला आपला माल पाठवण्यास सुरुवात करेल. यामुळे युरोपीयन उत्पादकांवर आणखी दबाव येईल. यातून व्यापार वाचवण्यासाठी संरक्षणवादी उपायांची मागणी होऊ शकते.

युरोपीय महासंघाला बऱ्याच काळापासून चिंता आहे की चीनचे सरकार त्यांच्या उत्पादकांना मोठ्या प्रमाणात अनुदान देते. यामुळे ते युरोपीयन बाजारपेठेत अत्यंत स्वस्त किमतीत वस्तू विकतात. म्हणजेच ते युरोपीयन बाजारपेठेत स्वस्त माल डंप करू शकतात. स्वस्तात उपलब्ध असलेले मनुष्यबळ आणि मोठ्या प्रमाणावरील उत्पादनासह या अनुदानांमुळे युरोपीय कंपन्यांवर प्रचंड दबाव निर्माण झाला आहे. यामुळे अनेक कंपन्या बंद पडू शकतात. अनेकांच्या नोकऱ्या जाऊ शकतात. सरकारी सबसिडी, टॅक्स ब्रेक आणि स्वस्त कर्जांमुळे 'बीवायडी', 'निओ'सारखे चिनी ब्रँड आता युरोपीयन बाजारपेठेत आक्रमकपणे प्रवेश करत आहेत आणि तिथल्या स्पर्धकांना मागे टाकत आहेत. युरोपमधील ऑटोमोबाईल उद्योग सध्या मोठ्या बदलाच्या काळातून जात आहे. यामुळे अनेक कारखाने बंद होण्याचा धोका आहे. काही कारखाने लहान होत आहेत आणि हजारो लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. विशेषतः जर्मनीला त्याचा मोठा फटका बसला आहे. चिनी कार निर्मात्यांना अमेरिकन बाजारपेठेतून बाहेर ढकलून अमेरिकेने चिनी बनावटीच्या 'ईव्ही'वर शंभर टक्के शुल्क लागू केले आहे. त्याच वेळी युरोपीय महासंघात चिनी कार उत्पादकांवर 35.3 टक्के कमाल शुल्क आहे, तर 'बीवायडी'वर केवळ 17 टक्के शुल्क आकारले जाते. आशियापासून उर्वरित जगामध्ये स्वस्त वस्तूंचा लवकर 'पूर' येऊ शकतो. लवकर सावध झाल्यास युरोप डंपिंग ग्राउंड होण्याचे टाळू शकेल. चीनमधून 'ओव्हरकॅपॅसिटी त्सुनामी' युरोपकडे जात आहे. नवीन, स्वस्त वस्तू युरोपमध्ये टाकल्या जाणार नाहीत, याकडे लक्ष ठेवावे लागेल. युरोपीयन औद्योगिक धोरणाचे अभ्यासक फोकमन यांना शंका आहे की युरोपीयन महासंघ निषेध न करता व्यापार विकृती स्वीकारेल. युरोपीय महासंघाने सूचित केले आहे की ते आयातीवर बारीक लक्ष ठेवतील.चीन किंवा इतर ठिकाणाहून आयातीमध्ये तीव्र वाढ झाली, तर त्यावर ते अंकुश आणतील. चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी युरोपीय महासंघ मध्य आशियाकडे नजर ठेवून आहे. 2023 मध्ये युरोपीय महासंघाने कोणत्याही कमोडिटीची आयात अचानक खूप वाढल्यास युरोपीयन उद्योगाला धोका आहे का हे तपासण्यावर पाळत ठेवण्यासाठी कार्य दल तयार करण्याची योजना जाहीर केली. ही प्रारंभिक प्रणाली चीनशी संबंधित जोखीम कमी करण्यासाठी तयार करण्यात आली होती. ही 'टास्क फोर्स' युरोपीय महासंघाला जलद पावले उचलण्यास मदत करू शकते. उदाहरणार्थ, स्वस्त वस्तूंची तपासणी (अँटी-डंपिंग तपासणी), अतिरिक्त शुल्क लादणे किंवा काही काळ आयातीवर बंदी घालणे. तथापि, ट्रम्प यांच्याप्रमाणे संरक्षणवादी धोरणांचा अवलंब केल्यामुळे युरोपीय महासंघाला टीकेला सामोरे जावे लागू शकते. असे वागणे युरोपीय महासंघाच्या दीर्घकाळ चाललेल्या मुक्त व्यापार तत्वज्ञानातून बाहेर पडण्यासारखे असेल. त्यामुळे जागतिक व्यापार संघटनेचे नियम कमकुवत होऊ शकतात आणि जगभरातील व्यापार तणाव वाढू शकतो

करिअरवाटा


## पर्यावरणक्षेत्राकडे वळा



पर्यावरण रक्षणाप्रती सजगता वाढली असून या संदर्भातील उपक्रमांमध्ये तरूणाईचा सहभाग उत्साह वाढवणारा आहे. विशेष म्हणजे या विषयातील उपक्रमांना शासनाचं तसंच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांचं पाठबळ लाभत आहे. त्यामुळे या क्षेत्रात मोठं काम उभं राहत आहे. या क्षेत्रामध्ये कारकिर्द घडवण्याची जिज्ञासा असेल तर 'इकॉलॉजी अॅन्ड एन्व्हायर्नमेंट' या विषयाचे पदविकेपासून पदव्युत्तर पदवीपर्यंत अभ्यासक्रम देशातील विविध महाविद्यालयं आणि विद्यापीठांमधून उपलब्ध आहेत. काही मुक्त विद्यापीठांनी सुरु केलेल्या अशा अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांचाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. या विषयाचा बी.एस्सी.चा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असून त्यासाठी बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर प्रवेश दिला जातो. यात इकॉलॉजी, एन्व्हायर्नमेंट, झुऑलॉजी आणि बॉटनी हे विषय शिकवले जातात. एकदा ही पदवी प्राप्त केली की केवळ इकॉलॉजी आणि एन्व्हायर्नमेंट या विषयांना वाहिलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येतो. बी.एस्सी.ची ही पदवी घेणारा विद्यार्थी पदव्युत्तर अभ्यासक्रमात वाईल्ड लाईफ म्हणजे वन्य जीवांचा अभ्यास करू शकतो. अर्थात बी.एस्सी.ला प्रवेश घेताना प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होणं आवश्यक असतं.


स्टाईल फंडा

## उन्हाळ्यातली हेअर स्टाईल



उन्हाळ्यात मानेवर रुळणारे केस नकोसे वाटतात. म्हणूनच हेअर स्टाईलबाबत वेगळा विचार करुन हटके स्टाईल करणं योग्य ठरतं.

* **डबल बन** – उन्हाळ्यासाठी ही परफेक्ट हेअरस्टाईल आहे. यासाठी केसांचं मधोमध पार्टीशन करावं. त्यानंतर दोन वेगवेगळे बन करावेत. हेअर पिन्सच्या साह्याने सेट करावेत. * **हाफ बन** – सध्या ट्रेंडमध्ये असणारी ही हेअरस्टाईल आहे. हाफ बन घालताना सर्वप्रथम केसांच्या मधला भाग घेऊन आंबाडा घाला. उरलेले केस मोकळे ठेवा. कॅज्युअल आऊटफिटवर ही हेअरस्टाईल खुलून दिसते. * **हाय बन** – सगळे केस एकत्र करून क्राऊन एरियावर बांधणं म्हणजे हाय बन घालणं. साडीसारख्या पारंपरिक प्रावरणांवर ही हेअरस्टाईल छान दिसते. * **साईड बन** – एखाद्या कॉर्पोरेट पार्टीसाठी ही हेअरस्टाईल परफेक्ट ठरते. यासाठी सगळे केस डाव्या अथवा उजव्या बाजूला बांधावेत. एका बाजूचा हा आंबाडा वेगळा लूक देतो * **लो बन** – ही स्टाईल करण्यासाठी केसांचं पार्टीशन करून घ्यावं. मानेलगत आंबाडा घालावा. हा आंबाडा फुलवता येतो. बाजूने गजरा गुंडाळल्यास बन आणखी सुंदर दिसतो.




राशीभविष्य

- **मेष** : आशा–निराशेचा खेळ सुरू राहील. व्यवसायात अडचणी संभवतात. चर्चेतून प्रश्न सोडवा
- **वृषभ** : सुवार्ता कानी येईल. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. नोकरीत बदली, बढतीचे योग आहेत.
- **मिथुन** : यशासाठी प्रयत्नात सातत्य ठेवावं. आर्थिक बाबतीत अडचणी उद्‌भवतील. बाकी चिंता नसावी.
- **कर्क** : महत्त्वाचे करार मार्गी लागतील. आर्थिक बाबतीत काही आघाड्यांवर समाधान लाभेल.
- **सिंह** : कलाकारांचा मानसन्मान होईल. नव्या संकल्पना साकार कराल. मित्र, नातलगांचं सहकार्य लाभेल.
- **कन्या** : कामाचा व्याप वाढता राहील. विवाहेच्छुकांचे विवाह ठरतील. कुलदेवतेची उपासना करावी.
- **तूळ** : अडचणींवर प्रयत्नपूर्वक मात कराल. मुलांच्या प्रश्नातून मार्ग निघेल. कामाचा ताण वाढता राहील.
- **वृश्चिक** : अनपेक्षित भेटीतून लाभ होईल. हाती घेतलेल्या कामात यश लाभेल. इतरांकडून कौतुक होईल.
- **धनु** : अनुभवींचा सल्ला लक्षात घ्यावा. आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करावेत. महत्त्वाच्या भेटीगाठी होतील.
- **मकर** : नोकरीच्या प्रश्नात दिलासा मिळेल. ज्येष्ठांचं सहकार्य लाभेल. वाद– विवादांपासून दूर रहावं.
- **कुंभ** : कामात प्रगती दिसून येईल. वरिष्ठांची मर्जी राखाल. संपत्तीच्या प्रश्नातून मार्ग निघेल.
- **मीन** : महत्त्वाचे निर्णय विचाराने घ्यावेत. व्यवसायात आवक साधारण राहील. बाकी चिंता नसावी.

सल्ला मोलाचा

## मुलं पौगंडावस्थेत आहेत?

उमलत्या वयातल्या मुलांना समजून घेणं काहीसं गुंतागुंतीचं झालं आहे. पण योग्य दृष्टीकोन बाळगून तुम्ही त्यांच्या बेस्ट फ्रेंड बनू शकता. या कामी काही टिप्स तुम्हाला नक्कीच उपयोगी पडतील. * कुटुंबात पारदर्शकता असू द्या. काही चुका झाल्या असतील तर मुलांसमोर स्वीकारा. यामुळे मुलं तुमचा आदर करू लागतील. * मुलांवर फार बंधनं लादू नका. प्रत्येक कृतीबद्दल त्यांना प्रश्न विचारू नका. सतत बंधनात ठेवल्याने पालक आपल्यावर उगाचच हक्क गाजवत असल्याची भावना मुलांमध्ये वाढीस लागते. यामुळे ते बंड करू शकतात. तरूणांना त्यांची स्पेस द्या. * मुलांना वेळ द्या. त्यांच्यासोबत चित्रपट बघा. शॉपिंगला जा. मुलांसोबत कार्यशाळेला जा. त्यांच्यासोबत छोटी सहलही काढता येईल. मुलांसोबत स्वयंपाक करा. बागकाम, व्यायाम यात मुलांना सहभागी करून घ्या. यामुळे मुलांसोबतचे बंध अधिक बळकट व्हायला मदत होईल. * मुलांचं म्हणणं शांतपणे ऐकून घ्या. त्यांची मतं तुम्हाला पटत नसली किंवा एखादी परिस्थिती हाताळण्याचा मार्ग योग्य वाटत नसला तरी उपदेश करू नका. आपली मतं त्यांच्यावर लादू नका.

## २१ एप्रिल

दिनविशेष

१९०९: मराठी चित्रकार ज. द. गोंधळेकर यांचा जन्म.
१९२६: राणी एलिझाबेथचा (द्वितीय) जन्म.
१९३८: भारतीय कवी अल्लामा इकबाल यांचा मृत्यू.
१९९७: भारतीय पंतप्रधान म्हणून इंद्रकुमार गुजराल यांचा शपथविधी.
२०१३: ज्येष्ठ गणितज्ज्ञ शकुंतला देवी यांचे निधन.
२०१५: चीनचे अध्यक्ष शि जिनपिंग यांना पाकिस्तान सरकारचा सर्वोच्च नागरी पुरस्कार 'निशान–ए–पाकिस्तान' प्रदान.

महत्त्वपूर्ण काही

## ऑल न्यू 'ईव्हो व्हिल'

दोस्तांनो, सध्याचा जमाना ई–बाईक्सचा आहे. सध्या या प्रकारच्या बाईक्स लोकप्रिय होत आहेत. असं असलं तरी 'इव्हो व्हिल्स'च्या मदतीने तुम्ही सायकलचं रूपांतर ई–बाईकमध्ये करू शकता. सायकलच्या पुढच्या चाकाच्या जागी हे इव्हो व्हिल बसवलं की झालं काम, तुम्ही ई–बाईक चालवायला मोकळे! हे चाक बसवल्यावर पॅडल मारण्याची गरजच भासत नाही. हे चाक सिंगापूरच्या इव्हो व्हिल टीमने बनवलं आहे. त्याचा वापर करण्यासाठी खास ब्लू टूथ डिव्हाइस तयार करण्यात आलं आहे. संबंधित डिव्हाइस हँडल बारवर बसवायचं असतं. तो एक प्रकारचा रिमोट आहे. त्याच्या मदतीने बाईकची गती कमी–जास्त करता येते.

इव्हो व्हीलचा वापर करण्यासाठी खास अॅप तयार करण्यात आलं आहे. ते डाउनलोड केल्यावर तुम्हाला सगळ्या इलेक्ट्रिक मोड्सचा वापर करता येतो. इतकंच नाही तर व्हीलची बॅटरी आणि त्याची गती यासंबंधीची माहितीही तुम्हाला मिळते. या चाकात चार रायडिंग मोड्स देण्यात आले आहेत. मॅन्युअल, कम्युट, एक्सरसाइज आणि क्लाईंबिंग अशा चार मोड्सचा वापर तुम्ही करू शकता.

आरोग्यमंत्र

## हे उपाय करुन पहा

तोंडाशी संबंधीत अनेक आजार आपल्याला त्रस्त करत असतात. त्यांच्यावर काही घरगुती उपायांनी मात करता येते. आज याबाबत अधिक सखोल माहिती घेऊ या.



तोंडाची चव गेली असेल तर एक लिंबू चिरुन त्याच्या अर्ध्या फोडिवर दोन चिमूट काळं मीठ आणि मिरपूड शिंपडून ते लिंब आगीवर थोडं गरम करावं. हे लिंबू चोखल्यानं जिभेचा कडवटपणा जाऊन जिभेला चव येते आणि अपचन तसंच गॅसेसचा त्रासही कमी होतो. तोंडात कडवटपणा असेल तर डाळिंबाची साल पाण्यात उकळावी आणि त्यात थोडी बडीशेप टाकून चुळा भराव्या. या उपायामुळे तोंडातला कडवटपणा कमी होतो.

ओठ फाटणं ही एक सामान्य समस्या आहे. ती दूर करण्यासाठी अर्धा चमचा दुधाच्या मलईमध्ये एक चिमूट हळद मिसळून ओठांवर लावावी. यामुळे मुलायम होतात. रखरख दूर होते. कोरड्या हवेमुळे ओठ फाटले असतील तर रात्री झोपताना त्यावर मोहरीचं तेल किंवा साजूक तूप लावावं. यामुळेही आराम मिळतो. रात्री झोपण्यापूर्वी बदाम उगाळून ओठांवर लावल्यानं ओठ मुलायम होतातच खेरीज त्यावर सुरकुत्या पडत नाहीत. सकाळी स्नानापूर्वी तळहातावर दोन–तीन थेंब गोडेतेल घ्यावं आणि बोटानं रगडून तेल ओठावर लावावं. यामुळेही ओठ फाटत नाही.

पंचांग

**सोमवार, २१ एप्रिल २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
चैत्र कृ. ८, नक्षत्र : उत्तराषाढा
चंद्रराशी : मकर, योग : साध्य
सूर्योदय : ६.१९, सूर्यास्त : ६.५६

फॉरवर्डस

**झूठ कहूँ तो लफ्जों का दम घुटता है...**

**सच कहूँ तो. लोग नाराज हो जाते हैं ।...**

स्मार्ट शॉपिंग

* फॉर्मल्समध्येही तुम्ही वेगळे प्रयोग करू शकता. इथेही कलर ब्लॉकिंग ट्राय करता येईल. उदाहरण द्यायचं तर निळ्या आणि पांढऱ्या रंगाचं कॉम्बिनेशन असलेल्या शर्टसोबत शर्टमधल्या निळ्या रंगाला साजेशी पँट कॅरी करा. अशाच प्रकारे विविध रंगसंगतींमध्ये प्रयोग करा. * सध्याचे भटकंतीचे दिवस पाहता फिरायला जाताना तुमच्याकडे फॅशनेबल कपडे असायला हवे. कलर ब्लॉकिंगवाला स्ट्राईपचा शर्ट आणि शॉर्टस हा लूक अशा प्रसंगी छान दिसेल. * कलर ब्लॉकिंग हा फॅशन जगतातला हिट ट्रेंड आहे. तो फॉलो करताना रंगसंगतीकडे विशेष लक्ष द्या. बॉटमला शोभून दिसणारा शर्ट घातला तरच तुमचं व्यक्तिमत्त्व खुलून दिसेल.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### देशात २२ लाख प्रशिक्षित चालकांची गरज

**नागपूर :** देशात सध्या २२ लाख प्रशिक्षित चालकांची गरज असून केंद्र सरकारच्यावतीने १५ हजार चालक प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येणार आहेत. यातीलच देशातील पहिल्या प्रशिक्षण केंद्राचे आज उद्घाटन झाले. केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त चालक प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन आणि स्वयंचलित तपासणी केंद्राचे भूमिपूजन केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते एम वझलवार ड्रायव्हिंग स्कूल प्रायव्हेट लिमिटेड सावरमेंढा तालुका सावनेर जिल्हा नागपूर येथे पार पडले.

### राफेलचा करार २८ तारखेला होणार

**नवी दिल्ली :** २८ एप्रिल रोजी फ्रान्सचे संरक्षण मंत्री सेबॅस्टियन लेकोर्नू यांच्या उपस्थितीत भारत आणि फ्रान्स भारतीय नौदलाला २६ राफेल मरीनच्या विक्रीसाठी आतापर्यंतचा सर्वात मोठा संरक्षण करार करण्याची अपेक्षा आहे. संरक्षण सूत्रांनी सांगितले की, ६३,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या या करारावर दोन्ही बाजूंच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी केली जाईल. यासाठी, साउथ ब्लॉकमधील संरक्षण मंत्रालयाच्या मुख्यालयाबाहेर एक कार्यक्रम आयोजित करण्याची योजना आहे. या करारासाठी फ्रान्सचे संरक्षण मंत्री रविवारी संध्याकाळपर्यंत नवी दिल्लीत पोहोचतील आणि सोमवारी परत येतील. ९ एप्रिल रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत भारताच्या या सर्वात मोठ्या संरक्षण कराराला मंजुरी देण्यात आली.

# १० हजार महिलांना ई-रिक्षा वाटप

## लाडक्या बहिणींना मोठे गिफ्ट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महिला व बाल विकास विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या महत्वाकांक्षी 'पिंक ई-रिक्षा' योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील पात्र महिलांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रविवारी (दि. २०) १० हजार पिंक ई-रिक्षा वितरीत करण्यात आल्या. महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्या उपस्थितीत महिलांना सवलतीच्या दरात पिंक रिक्षा उपलब्ध करून देण्याच्या सरकारच्या योजनेची नागपूरात सुरुवात झाली आहे.

नागपूर शिवाय पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, कोल्हापूर, अहिल्यानगर, अमरावती या आठ जिल्ह्यात टप्प्याटप्प्याने पिंक रिक्षा गरजू महिलांना उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. पिंक रिक्षाच्या एकूण किमती पैकी २०% अनुदान राज्य सरकार देणार असून दहा टक्के रक्कम लाभार्थी महिलांना द्यावी लागणार आहे. तर उर्वरित ७० टक्के रक्कम सवलतीच्या व्याजदरावर कर्ज म्हणून उपलब्ध करून दिली जात आहे.

यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील १० हजार महिलांना रोजगार देण्याचा उद्दिष्ट तर या योजनेमागे आहे. सोबतच शहरात महिलांना सुरक्षित सार्वजनिक वाहतुकीचे साधन मिळावे, रात्री अप-रात्री महिला या पिंक इ-रिक्षाच्या माध्यमातून सुरक्षित फिरू शकतील. तसेच पिंक इ-रिक्षा योजनेच्या पहिल्या टप्प्याचा वितरण नागपुरातून करत आहे, याचा मला आनंद आहे, असं देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

'पिंक ई-रिक्षा' योजनेच्या लाभासाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न तीन लाखांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. अर्जदाराचे वय १८ ते ३५ वर्षांदरम्यान आणि महिलेकडे वाहन चालक परवाना असणे आवश्यक आहे. दारिद्र्यरेषेखालील महिलांना योजनेत प्राधान्य असून, सर्व स्तरांतील महिलांना योजनेत अर्ज करता येईल, असेही परिवहन विभागाने स्पष्ट केले.



### लाडकी बहीण योजनेसारखीच ही योजना

● म्हणाले, लाडकी बहीण योजनेसारखीच ही पिंक इ रिक्षा योजना आहे. या माध्यमातून महिलांना पायावर उभा राहता आले पाहिजे, असा उद्देश आहे. तसेच कामकाजी महिलांना प्रवासात सेफ, सुरक्षित वातावरण मिळावं, म्हणून महिलाद्वारे चालवल्या जाणा-या इ-रिक्षा उपलब्ध करून देण्याचा उद्दिष्ट आहे, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### अशी आहे पिंक ई-रिक्षा योजना

● राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या वतीने महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पिंक ई-रिक्षा ही महत्वाकांक्षी योजना आहे. नागपूर जिह्यामध्ये २००० महिलांना पिंक ई-रिक्षा वाटप करण्याचे उद्दिष्ट दिलेले आहे.

# ट्रम्प यांच्या धोरणांविरुद्ध अमेरिकेत एल्गार

**नवी दिल्ली:** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांविरुद्ध शनिवारी पुन्हा एकदा हजारो निदर्शक रस्त्यावर उतरले. हे निदर्शने सर्व ५० राज्यांमध्ये झाली. ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉर धोरणांविरुद्ध आणि सरकारी नोकऱ्यांमधील कपातीविरुद्ध अमेरिकन नागरिक निदर्शने करत आहेत. यावेळी, निदर्शकांनी राष्ट्रपतींचे निवासस्थान असलेल्या व्हाईट हाऊसला वेढा घातला. लोकांनी ट्रम्प यांच्यावर सभ्यता आणि कायद्याचे राज्य चिरडल्याचा आरोप केला.

व्हाईट हाऊस व्यतिरिक्त, निदर्शकांनी टेस्ला शोरूमलाही घेराव घातला. ट्रम्प यांच्या विरोधात निदर्शनांचा हा दुसरा टप्पा आहे. यापूर्वी ५ एप्रिल रोजी देशभरात ट्रम्प यांच्या विरोधात निदर्शने झाली होती.

राजधानी वॉशिंग्टन डीसीसह सर्व राज्यांमध्ये होणाऱ्या निदर्शनांचे प्रमुख कारण म्हणजे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि उद्योगपती मस्क यांची आक्रमक धोरणे. मस्क यांचा कार्यक्षमता विभाग सरकारी विभागांमध्ये सतत कपात करत आहे. आतापर्यंत हजारो सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या नोकरीवरून काढून टाकण्यात आलं आहे. दुसरीकडे, स्थलांतरितांविरुद्ध कारवाई करण्याचे आणि इतर देशांवर शुल्क लादण्याचे डोनाल्ड ट्रम्प यांचे कठोर धोरण हे देखील या निदर्शनांचे एक प्रमुख कारण आहे. ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉरमुळे इतर देशांमधून अमेरिकेत येणाऱ्या वस्तूंच्या किमती वाढल्या आहेत. याचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या खिशावर होत आहे.

अमेरिकन सर्वेक्षण एजन्सी गॅलपच्या मते, ४५ टक्के अमेरिकन मतदार ट्रम्प यांच्या पहिल्या तीन महिन्यांतील कामावर समाधानी आहेत, तर फक्त ४१ टक्के मतदार ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळातील पहिल्या तीन महिन्यांतील कामावर समाधानी होते. जरी हे इतर राष्ट्रपतींच्या तुलनेत खूपच कमी आहे. १९५२ ते २०२० दरम्यानच्या सर्व राष्ट्रपतींसाठी सरासरी पहिल्या तिमाहीची मान्यता रेटिंग ६० टक्के आहे. त्या तुलनेत, ट्रम्प यांचे रेटिंग कमी असल्याचे दिसून येते. एजन्सीच्या मते, ट्रम्प यांनी पदभार स्वीकारला तेव्हा त्यांचे रेटिंग ४७ टक्के इतके होते. यामध्येही घट नोंदवण्यात आली आहे.

# राज्यभरातील १ लाखांहून अधिक शाळांची तपासणी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणाऱ्या जिल्हा परिषद व नागरी भागातील शाळांमध्ये नेमक्या कोणत्या सुविधा आहेत आणि काय कमी आहे, याबाबतची सखोल माहिती आता मिळणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने घेतलेल्या सुमोटो याचिकेच्या अनुषंगाने शिक्षण विभागाला मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे आदेश दिल्यानंतर शिक्षण खात्याच्या यंत्रणेला खडबडून जाग आली आहे.

या आदेशाची अंमलबजावणी करताना शासनाने राज्यस्तरीय समिती गठीत केली असून, समितीच्या ९ एप्रिल रोजी दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील तब्बल १,०८,१७३ शाळांची तपासणी होणार आहे. ही तपासणी ११ एप्रिल ते १५ मे या कालावधीत केली जाणार आहे. या मोहिमेअंतर्गत प्रत्येक जिल्ह्याने आपापल्या भागातील स्थितीवर आधारित अहवाल पुणे येथील शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांच्याकडे पाठवायचा आहे.

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांसाठी केंद्रप्रमुख, तर शहरांतील शाळांसाठी पर्यवेक्षक, विस्तार अधिकारी, सहायक प्रशासकीय अधिकारी, मनपा आणि नगरपालिका प्रशासकीय अधिकारी, तसेच गटशिक्षणाधिकारी यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. या अधिका-यांनी तपासलेल्या किमान दोन शाळांचा पुन्हा एकदा जिल्हास्तरीय समितीमार्फत स्वतंत्र तपासणी केली जाणार आहे. यामध्ये आधीच्या अहवालांची वस्तुनिष्ठ छाननी होणार असून, प्रत्येक शाळेची सद्यस्थिती प्रत्यक्ष पाहणीतून तपासली जाणार आहे.

हा सर्व अहवाल केवळ कागदोपत्री न राहता खऱ्या अंमलबजावणीकडे वाटचाल करेल का, हा खरा प्रश्न आहे. मात्र, न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे आणि समितीच्या कठोर भूमिकेमुळे यंदाची तपासणी केवळ औपचारिकतेपुरती मर्यादित राहणार नाही, अशी पालक व शिक्षकवर्गाची अपेक्षा आहे.

पान १ वरून

### जम्मू-काश्मीरमध्ये ढगफुटीने हाहाकार

फटका बसल्याचे दिसून येते. रामबन जिल्ह्यातील चिनाब नदीजवळील धर्मकुंड गावात भूस्खलन झाले आहे. १० घरांची पूर्णपणे वाताहात झाली, २५-३० घरांचेही नुकसान झाले. धर्मकुंड पोलिसांनी सुमारे ९०-१०० लोकांना सुरक्षितपणे वाचवले.

उधमपूर जिल्ह्यातील सतैनी पंचायतीतही मुसळधार वादळ आणि पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. माजी पंचायत सरपंच परशोत्तम गुप्ता म्हणाले की, परिसरात अनेक झाडे उन्मळून पडली आहेत, ज्यामुळे वाहतूक आणि वीज पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. मी माझ्या पंचायतीची पाहणी केली आहे. अनेक झाडे कोसळली आहेत आणि वीजपुरवठा खंडित झाला आहे. गेल्या ४-५ वर्षांत पहिल्यांदाच इतके जोरदार वारे वाहताना दिसत आहेत.

भारतीय हवामान विभागाच्या मते, जम्मू आणि काश्मीरमध्ये पुढील २-३ दिवस पाऊस सुरूच राहू शकतो. विशेषतः डोंगराळ आणि उंच भागात गडगडाटी वादळासह पाऊस आणि गारपीट होण्याची शक्यता आहे. रामबन, उधमपूर, पुंछ आणि बारामुल्ला जिल्ह्यात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. येथे लोकांना सावधगिरी बाळगण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

ओमर अब्दुल्ला यांची प्रतिक्रिया

जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. ते म्हणाले की, रामबनमध्ये भूस्खलन आणि अचानक आलेल्या पुराच्या दुःखद घटनेने मला खूप दुःख झाले आहे. या कठीण काळात माझ्या संवेदना पीडित कुटुंबांसोबत आहेत. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, ते स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात आहेत जेणेकरून मदत आणि बचाव कार्य त्वरित पार पाडता येईल. त्यांनी सांगितले की आज ते स्वतः मदत, पुनर्वसन आणि पुनर्वसन योजनांचा आढावा घेतील.

केंद्र सरकार संपर्कात

केंद्रीय मंत्री आणि उधमपूरचे भाजप खासदार डॉ. जितेंद्र सिंह यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर लिहिले की ते उपायुक्त बसीर-उल-हक चौधरी यांच्या सतत संपर्कात आहेत. त्यांनी जिल्हा प्रशासनाच्या बचाव कार्याचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की सर्वतोपरी मदत केली जात आहे आणि गरज पडल्यास ते वैयक्तिक संसाधनांसह देखील मदत करतील.

### राज-उद्धव युतीला 'मनसे' विरोध

असल्याचे संकेत दिले आहेत. मुंबईचे शहराध्यक्ष संदीप देशपांडे यांनी युती म्हणजे फक्त निवडणुकीपुरती असे नाही. मराठीच्या मुद्यावर तो मराठी पक्ष एकत्र आले तर काय हरकत आहे, असे म्हटले. मात्र, उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री असताना १७ हजार मनसेसैनिकांवर गुन्हे दाखल केले होते त्यासाठी माफी मागणार का? असा सवाल केला. मनसेच्या चित्रपट सेनेचे प्रमुख अमेय खोपकर यांनी तर ट्विट करत 'अशी अभद्र युती होऊ नयेत हीच ईश्वर चरणी प्रार्थना', असे म्हणत अप्रत्यक्ष मनसे-शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षासोबतच्या युतीला विरोधच केला आहे.

### सुसाईड नोटमध्ये...

कोणतीही नोंद न करता स्वीकारली जात होती. यासंदर्भात त्यांनी आक्षेप नोंदवला होता. पण त्यांचं कोणी ऐकत नव्हतं. जी महिला कर्मचारी अशी रक्कम स्वीकारत होती, तिला डॉ. वळसंगकरांनी कामावरून देखील काढलं होतं. पण नंतर या महिला कर्मचाऱ्याने कामावरून काढल्यानंतर आत्महत्या करण्याची धमकी डॉक्टरांना दिली होती. तिच्या धमकीवरून डॉक्टरांना पोलिसांत तक्रार दाखल करण्याचा सल्ला दिला होता. मात्र, डॉक्टरांना ते मान्य नव्हते. या प्रकरणामुळे देखील डॉक्टर तणावाखाली गेल्याचे आणि त्यांनी असं टोकाचं पाऊल उचलल्याचीही चर्चा आहे.

डॉ. शिरीष वळसंगकर हे सोलापुरातील न्युरोफिजिशियन होते. त्यांचे वय ६९वर्षे होते. त्यांच्या नेतृत्वाखाली अत्याधुनिक सुविधांसह रुग्णालय त्यांनी उभारलं आहे. डॉ. वळसंगकर यांनी सोलापूरमधील दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स येथून महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी डॉ. व्ही.एम. मेडिकल कॉलेज, सोलापूर येथून एमबीबीएस, एमडीचे शिक्षण घेतले.

### म्हणून सोडला काँग्रेसचा 'हात'

दिलं नाही, विरोधी पक्षनेतेपदाची अपेक्षा होती, तीही पूर्ण झाली नाही. राजकीय दृष्टिकोनातून पक्ष ताकद देत नव्हता, म्हणूनच मला आणि माझ्या कार्यकर्त्यांना वाटत होतं की, भाजपमध्येच आपल्याला न्याय मिळू शकेल, असंही ते यावेळी बोलताना म्हणाले.

दोन दिवसांपूर्वी राजीनामा दिला आहे. विकासाला गती द्यायची असेल तर पक्ष बदलावा लागेल, भाजपमध्ये जावं अशी कार्यकर्त्यांची भूमिका आहे. येणाऱ्या २२ तारखेला पक्ष प्रवेश होईल. देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुंबईत पक्ष प्रवेश होईल. माझ्यावर पक्ष सोडण्याची वेळ काँगेसने आणली. ३ वेळा निवडून आलो, २०१९ ला वाटत नव्हतं सत्ता येईल काँग्रेसला १२ मंत्रिपद मिळाली. पुण्याला मंत्रीपद मिळेल त्यात मला संधी मिळेल अशी कार्यकर्त्यांची भूमिका होती. पण मंत्रिपद मिळालं नाही. पटोले यांनी राजीनामा दिला, त्यावेळी विधानसभा अध्यक्ष पद मिळेल वाटलं पण तिथेही संधी मिळाली नाही. विरोधी पक्षनेते पद मिळेल वाटलं पण तेव्हा पण मिळाले नाही. पक्ष सोडताना दुःख होतंय. पण विकासासाठी निर्णय घेतोय. मी दबावाला बळी पडलो नाही. पक्ष आदेश नेहमी पाळला असंही त्यांनी पुढे म्हटलं आहे.

सलग तीन वेळा निवडून आलो, पण मला ताकद द्यायला पाहिजे होती ती दिली नाही. पश्चिम महाराष्ट्रात जर ताकद दिली असती, तर विधानसभा निवडणुकीत चित्र वेगळं पाहायला मिळाले असते. मला पक्ष प्रवेश करताना कोणतंही आश्वासन दिले नाही. मी कोणत्याही पदासाठी गेलो नाही. २०१९ पासून नाराजीला सुरुवात झाली. पुणे जिल्ह्यात वजन वाढवण्याचा प्रयत्न करायला पाहिजे होता. फॉर्म भरायला पक्षश्रेष्ठींना बोलावलं, कुणी वेळ दिला नाही. मी पडल्यावर पण मला फोन केला नाही. महाराष्ट्रामध्ये काँग्रेसमध्ये आश्वासक चेहरा नाही.अनेक प्रकल्प आहेत. त्याला केंद्र आणि राज्य सरकारकडून निधी मिळाला नाही. अनेकदा कात्री लागली. सत्ता असताना काही कामे झाली नाहीत. मुळशी तालुक्यात लोकसभेला मतदान झालं ते विधानसभाला मला झालं नाही. ताईंनी माझं काम केलं पण कार्यकर्त्यांनी कामे केले नाही. काहींनी काम केलं नाही. पण आकडा बोलतो आहे, काम झालं नाही. मी अमित शाह यांच्याशी बोललो. एनसीडीसीतून कर्ज मिळावे यासाठी मी त्यांना बोललो असल्याचं थोपटेंनी सांगितलं आहे.

थोपटे यांचा भाजप प्रवेश २२ एप्रिलला मुंबईत पार पडणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडेल. त्यापूर्वी त्यांनी काँग्रेस सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याचं जाहीर केलं.

### पालिकेसाठी भाजपची खास रणनिती!

ताकद दृढ करण्याच्या दृष्टीनं निर्णायक ठरतोय. संपूर्ण राज्यभर १२२१ मंडळ गठीत करण्यात आले आहेत, त्यापैकी ९६३ मंडळांची रचना जाहीर करण्यात आली असून, यातील २५८ मंडळ नव्यानं स्थापन केली गेली आहेत. प्रमुख विभागवार पाहता: कोकण-ठाणे विभागात १८४, उत्तर महाराष्ट्रात १८४, पश्चिम महाराष्ट्रात २२२, विदर्भात ३१३, मराठवाड्यात २०७, तर मुंबई विभागात १११ मंडळ गठीत करण्यात आले आहेत. या संपूर्ण नियुक्त्या केवळ आकडेवारी नाही, तर पक्षाची जनाधारावर आधारित शक्ती वाढवण्याचा प्रयत्न आहे. यातून भाजपच्या कार्यपद्धतीतील शिस्त, संघटन आणि वेळेचं भान प्रकर्षानं अधोरेखित होतं. भाजपचे कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी एका संघटित आणि समर्पित कार्यपद्धतीची ही सुरुवात आहे. भाजपची रणनीती आता अधिक गावखेड्यांपर्यंत पोहोचवण्याचा आणि सर्वसामान्य मतदाराशी थेट संवाद साधण्याचा ध्यास घेतेय.

### श्रीसाईचरणी...

आंध्रप्रदेश मधील गुंटूर येथील एका साईभक्ताने साईचरणी ७८८.४४ ग्रॅम वजनाचा आकर्षक सुवर्ण मुकुट अर्पण केला आहे. त्यामुळे आता साईबाबा संस्थानकडे सुवर्ण मुकुटांची संख्या २८ वर पोहचली आहे. मुकुटासोबत सोन्याचे दागिने दान देणाऱ्यांची संख्याही वाढली आहे.

### सहा महिन्यांत दहशतवादाला मूठमाती - सिन्हा

आहे. श्रीनगरमध्ये उद्योगपतींच्या शिष्टमंडळाला भेटताना सिन्हा बोलत होते. या शिष्टमंडळात माजी आमदार विक्रमादित्य सिंह, वायपीओ-ग्लोबल वनचे सदस्य आणि उद्योगपतींचा समावेश होता.

तत्पूर्वी, एलजी यांनी शेर-ए-काश्मीर इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर येथे 'नूर-ए-सामा' या सूफी परिषदेला संबोधित केले. यावेळी ते म्हणाले की, दहशतवादाचे पुरस्कर्ता आणि व्यापारी यांना पुन्हा डोके वर काढू दिले जाणार नाही. निष्पाप लोकांचे रक्त सांडणे हे दहशतवाद्यांचे काम बनले आहे. राष्ट्राच्या शत्रूंनी दहशतीचे एक मोठे वातावरण निर्माण केले आहे. गेल्या चार-पाच वर्षांत, जम्मू आणि काश्मीर पोलिस, सुरक्षा दल आणि प्रशासनाने, जनतेसह, केंद्रशासित प्रदेशाला त्या टप्प्यातून बाहेर काढण्यात मोठ्या प्रमाणात यश मिळवले आहे, परंतु अजूनही बराच पल्ला गाठायचा आहे. काही देशद्रोही घटक सक्रिय होण्याचा प्रयत्न करत आहेत, परंतु अशा कोणत्याही व्यक्तीला उदयास येऊ दिले जाणार नाही. जम्मू आणि काश्मीरमधील तरुणांना सरकारच्या योजना समजू लागल्या आहेत याचा मला आनंद आहे, असे ते म्हणाले.

### महाराष्ट्रात पाणीटंचाईच्या झळा!

पाण्यासह पिण्याच्या पाण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. गेल्या वर्षी याच सुमारास पाणीसाठा ३३.६२% एवढा होता. तो यंदा ३८.९५% एवढाच राहिलाय.

राज्यात पुणे विभागातील लघु मध्यम आणि मोठ्या एकूण ७२० धरणांमध्ये आता केवळ ३२.७०% पाणीसाठा शिल्लक आहे. खडकवासला धरण ५१.१२ टक्क्यांवर भरले असून त्यात सध्या २८.५८ दलघमी उपयुक्त पाण्यासाठी आहे. पानशेत धरणात ३४.१०% पाणीसाठा शिल्लक आहे. सांगलीतील वारणा धरण ४०.५६ टक्क्यांवर येऊन पोहोचले आहे. साताऱ्यातील कोयना ३७.२२ टक्क्यांवर आहे. तर सोलापूरमधील उजनी धरण शून्यावर पोहोचले आहे. कोल्हापुरातील दूधगंगा २६.४८ टक्क्यांवर असून राधानगरी धरण ५४ टक्क्यांवर आहे.

# शक्तीपीठ महामार्ग कुणाच्या फायद्यासाठी ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आम्ही शक्तीपीठ मार्गाच्या विरोधात आहोत. नागपूर- गोवा शक्तीपीठ मार्गासाठी कोणतीही मागणी नाही. गोव्यात अशी कोणती शक्ती आहे की तिथे शक्तीपीठ मार्ग तयार केला जात आहे. हे भाजपचेच एक कारस्थान आहे. गोव्याच्या जवळ एक बंदर आहे. तिथून खरेद इम्पोर्ट एक्सपोर्ट होत असते. केवळ अदानी समुहासाठी त्या बंदरापासून सेंट्रल इंडियापर्यंत एक रेडकार्पेट टाकण्यासाठी शक्तीपीठ महामार्गाचा जागर सुरू आहे. असा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

महाराष्ट्रातील प्रस्तावित नागपूर- गोवा शक्तीपीठ महामार्गाला राज्यभरातून विरोध होत आहे. त्यासाठी अनेक संघटनांकडून आंदोलनेही करण्यात आली. तर काँग्रेसकडूनही या महामार्गाला विरोध केला जात आहे. अदानींच्या फायद्यासाठी शक्तीपीठ महामार्गाचा घाट घाटला जात असल्याचा आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. नवराष्ट्र समुहाला दिलेल्या मुलाखतीत बोलताना सपकाळ म्हणाले की, महाराष्ट्र सरकारकडे लाडक्या बहिणींना २१०० रुपये द्यायला पैसे नाहीत, एसटी कामगारांचे पगार द्यायला पैसे नाहीत. शेतक-यांच्या कर्जमाफीसाठी पैसे नाही. मग पैशांचा एवढा तुडवडा असताना,८८ हजार कोटींचा शक्तीपीठ महामार्ग कशासाठी, हा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे त्याचा पीपीआर कोणीतरी मुख्यमंत्र्यांना दिला आहे. त्याअनुषंगाने स्वत; मुख्यमंत्री त्याचा डीपीआर बनवत आहेत. अडानी आणि अंबानी यांना फायदा होण्यासाठीच सेंट्रल इंडियातून या बंदरापर्यंत शक्तीपीठ महामार्ग बांधण्याचे कारस्थान रचले जात आहे.



हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, इस्ट इंडिया कंपनी जेवढी चुकीच्या पद्धतीने कारभार करत होती. त्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक रान मोकळ करून देण्यासाठी शक्तीपीठ महामार्गाचा प्रपंच घातला आहे. गडचिरोलीला उत्खनन सुरू केलं आहे. सेंट्रल इंडियापासून यांचा पुढचा डाव छत्तीसगड आणि ओडिसापर्यंत घेऊन जाण्याचा यांचा प्लॅन आहे, म्हणजेच एक मोठा कॉरिडॉर ओपन करून द्यायचा आहे.

### महाराष्ट्र लुटण्याचा डाव


● जगभरात अडानींच्या माईन्सवर बंदी घालण्यात आली आहे. अडानींच्या कोणत्याही प्रकल्पाला ऑस्ट्रेलिया, युरोप, न्युझीलंडमध्ये बंदी घालण्यात आली आहे. त्या ठिकाणी असलेल्या यंत्रसामग्री काढून आणतील आणि आपला देश लुटतील. त्यासाठी शक्तीपीठ महामार्गाच्या माध्यमातून महाराष्ट्र लुटण्याचा डाव आखला जात आहे. असंही सपकाळ यांनी म्हटलं आहे.

## उपराष्ट्रतींच्या त्या वक्तव्यावर माजी न्यायमूर्तींकडून परखड भाष्य

# सर्वोच्च न्यायालय राष्ट्रपतींना सूचना देऊ शकते

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** तमिळनाडू सरकार विरुद्ध राज्यपाल वादात सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांना फटकारताना राष्टपतींना सुद्धा वेळेचं बंधन निश्चित केलं आहे. यावर उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं होतं. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी घेतलेल्या भूमिकेनंतर सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अशोक कुमार गांगुली यांनी त्यांचे कान टोचताना संविधान सर्वोच्च असून कायद्यावर कोणीच नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालय राष्ट्रपतींना सूचना देऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.




तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करताना सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अशोक कुमार गांगुली म्हणाले की, "कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही. संविधानाच्या मूलभूत भावनेचे रक्षण करणे ही सर्वोच्च न्यायालयाची जबाबदारी आहे." ते म्हणाले की, "आपला देश धर्मनिरपेक्ष आहे. संविधानाच्या मूळ भावनेचे रक्षण करणे हे सर्वोच्च न्यायालयाचे काम आहे, म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाने वक्फ कायद्याबाबत सरकारसमोर काही प्रश्न उपस्थित केले आहेत. यानंतर, सरकार मागे पडले आणि म्हणाले की ते कायद्यातील काही कलमे लागू करणार नाही. संविधानाच्या कलम ५३ नुसार, राष्ट्रपतींनी संविधानानुसार काम करावे, जर तसे नसेल तर सर्वोच्च न्यायालय राष्ट्रपतींना सूचना देऊ शकते. यात काहीही चुकीचे नाही. यामुळे लोकशाही मजबूत होते. हे दुर्दैवी आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी हे समजून घेतले पाहिजे की कोणीही कायद्यापेक्षा वर नाही." अशोक कुमार गांगुली यांनी स्पष्टपणे म्हटले आहे की संविधान सर्वोच्च आहे आणि कोणतीही व्यक्ती, संस्था किंवा पद, कितीही उच्च असले तरी, कायद्यापेक्षा वर असू शकत नाही.

### निशिकांत दुबे काय म्हणाले?

वक्फ सुधारणा कायदा २०२५ बाबत देशात एक नवीन संवैधानिक वादविवाद सुरू झाला आहे. या कायद्याच्या वैधतेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे आणि यावरील सुनावणीदरम्यान भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्याबद्दल वादग्रस्त विधान केले. दुबे म्हणाले की, "देशात धार्मिक गृहयुद्ध भडकवण्यास सर्वोच्च न्यायालय जबाबदार आहेत." भाजप खासदार निशिकांत दुबे म्हणाले की, जर न्यायालय स्वतः कायदा करणार असेल तर संसद बंद करावी. ते म्हणाले, "या देशात होणाऱ्या सर्व यादवी युद्धासाठी भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना जबाबदार आहेत." कलम १४१ आणि कलम ३९८ चा हवाला देत त्यांनी असा युक्तिवाद केला की कलम ३६८ संसदेला कायदे करण्याचा अधिकार देते. कलम १४१ अंतर्गत, सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय सर्व न्यायालयांवर बंधनकारक आहेत, परंतु याचा अर्थ असा नाही की सर्वोच्च न्यायालय कायदे करू शकते. राम मंदिर, ज्ञानवापी किंवा कृष्ण जन्मभूमीचा प्रश्न येतो तेव्हा सर्वोच्च न्यायालय कागदपत्रे मागते, पण वक्फ मालमत्तेसाठी ते तसे का करत नाही? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित करत, विधेयकांवर किती वेळेत निर्णय घ्यावा, याबद्दल सर्वोच्च न्यायालय राष्ट्रपतींना कसे निर्देश देऊ शकते, अशी विचारणा केली होती.

#रा

## एमटीएनएलने थकवले ८,३४६ कोटींचे कर्ज




**नवी दिल्ली :** सार्वजनिक क्षेत्रातील सात बँकांचे ८,३४६.२४ कोटी रुपयांचे कर्ज एमटीएनएलने थकवले आहे. तोट्यात चाललेल्या सार्वजनिक क्षेत्रातील टेलिकॉम कंपनीची एकूण कर्जे ३१ मार्च २०२५ पर्यंत ३३,५६८ कोटी रुपयांवर पोहोचली आहेत. युनियन बँक ऑफ इंडियाचे ३,६३३.४२ कोटी रुपये, इंडियन ओव्हरसीज बँकेचे २,३७४.४९ कोटी रुपये, बँक ऑफ इंडियाचे १,०७७.३४ कोटी रुपये, पंजाब नॅशनल बँकेचे ४६४.२६ कोटी रुपये, स्टेट बँक ऑफ इंडियाचे ३५०.०५ कोटी रुपये, युको बँकेचे २६६.३० कोटी रुपये आणि मुद्दल व व्याज देयकासह १८०.३ कोटी रुपयांचे कर्ज थकले आहे.

## यूपी सरकार ८ लाख सोलर रूफटॉप प्लांट उभारणार



**लखनौ :** पंतप्रधान सूर्यघर योजनेंतर्गत मार्च २०२७ पर्यंत राज्यभरात ८ लाख सोलर रूफटॉप प्लांट उभारण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट उत्तर प्रदेश सरकारने ठेवले आहे. चालू आर्थिक वर्षात २.६५ लाख युनिट बसविण्याचे उद्दिष्ट असून, दरमहा २२,००० आस्थापनांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्याची पद्धतशीर अंमलबजावणी व्हावी, यासाठी जिल्हा, डिस्कॉम, महापालिका आणि नगरपालिका स्तरावर उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

## तामिळनाडूत हिंदी लादणार : उदयनिधी



**चेन्नई :** केंद्रातील भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीसरकारने त्रिभाषा धोरण, नीट आणि नवे शैक्षणिक धोरण लागू करण्यामागे तामिळनाडूत काहीही करून हिंदी लादणे हाच हेतू आहे, असा आरोप तामिळनाडूचे उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन यांनी रविवारी केला. केंद्राच्या षडयंत्राबाबत विद्यार्थ्यांनी सावध राहावे, असे आवाहन करतानाच नीट (राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षा) आणि त्रिभाषा धोरणामुळे तामिळनाडूतील शिक्षण व्यवस्थेला धोका निर्माण केल्याबद्दल त्यांनी केंद्र सरकारवर टीका केली. हे षडयंत्र आणि केंद्राने शिक्षणावर टाकलेले धोके समजून घेतले पाहिजेत. तुम्ही तुमच्या भूमिकेवर ठाम असाल तर आमचे शत्रू आमच्याविरोधात जिंकू शकत नाहीत, हे तुम्ही लक्षात घेतले पाहिजे, असेही ते म्हणाले.

## अमरावती पहिले पूर्णपणे नवीकरणीय ऊर्जेवरील शहर

**विजयवाडा :** आंध्र प्रदेशची नियोजित राजधानी अमरावती इतिहास रचणार असून पूर्णपणे नवीकरणीय ऊर्जेवर चालणारे जगातील पहिले शहर बनण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. २,७०० मेगावॅट (मेगावॅट) हरित ऊर्जेचा वापर करण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेसह शहराने सौर, पवन आणि जलविद्युत यासारख्या शाश्वत स्रोतांद्वारे विजेच्या सर्व गरजा भागविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांचा ड्रीम न्यू कॅपिटल सिटी प्रकल्प स्वच्छ ऊर्जा आणि हवामान विषयक कृतीसाठी भारताच्या व्यापक बांधिलकीशी ठामपणे जुळलेला आहे.

## रामबनमध्ये पावसामुळे झालेल्या मृत्यूंबद्दल शोक व्यक्त



**जम्मू :** जम्मू-काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी रामबन जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरामुळे तीन जणांचा मृत्यू झाल्याबद्दल दु:ख व्यक्त केले आहे, तर उपमुख्यमंत्री सुरिंदर चौधरी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी पूरग्रस्त भागात जात आहेत. नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष फारुख अब्दुल्ला म्हणाले की, त्यांच्या पक्षाचे सरकार प्रभावित कुटुंबांना पुरेशी मदत देण्यासाठी केंद्राकडे आर्थिक मदतीची विनंती करेल. मुसळधार पावसामुळे रामबन जिल्ह्यात विविध ठिकाणी आलेल्या पुरामुळे तीन जणांचा मृत्यू झाला असून १०० हून अधिक जणांना वाचवण्यात यश आले आहे.

# अंतराळ क्षेत्रात भारताची भरारी

## ऐतिहासिक कामगिरीसाठी इस्रोच्या दोन नव्या मोहिमा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अंतराळ क्षेत्रात भारत आणखी एक ऐतिहासिक वळण घेणार आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) येत्या दोन महिन्यांत दोन हायप्रोफाईल मोहिमा राबवणार आहे. यातील पहिली मोहीम मे महिन्यात होणार असून, भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला अमेरिकी अंतराळ संस्था नासाच्या सहकार्याने एक्सिओम-४ मोहिमेअंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर (आयएसएस) जाणार आहेत. राकेश शर्मा यांच्यानंतर अंतराळात जाणारे ते दुसरे भारतीय ठरणार आहेत.




या ऐतिहासिक मोहिमेची घोषणा करताना केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह म्हणाले की, ग्रुप कॅप्टन शुक्ला यांचा हा प्रवास केवळ अंतराळ प्रवास नसून भारताच्या नव्या अंतराळ युगातील एका धाडसी पावलाची ही सुरुवात आहे. शुक्ला यांनी अंतराळ प्रवासासाठी रशिया आणि अमेरिकेत सखोल प्रशिक्षण घेतले आहे. त्यांचा हा दौरा भारताच्या मानवी अंतराळ मिशन योजना गगनयानसाठी मैलाचा दगड ठरणार आहे. एक्सिओम-४ मोहिमेदरम्यान त्यांना अंतराळ उड्डाण ऑपरेशन्स, प्रक्षेपण प्रक्रिया, मायक्रोग्रॅव्हिटीमध्ये अनुकूलन आणि आपत्कालीन तयारीचा व्यावहारिक अनुभव मिळेल.

इस्रो आणि नासाच्या संयुक्त प्रयत्नातून तयार करण्यात आलेला आतापर्यंतचा सर्वात महागडा पृथ्वी निरीक्षण उपग्रह निसार (नासा-इस्रो सिंथेटिक अपर्चर रडार) जीएसएलव्ही-मार्क २ रॉकेटद्वारे भारतातून प्रक्षेपित केला जाणार आहे. हा उपग्रह दीड अब्ज डॉलर खर्च करून तयार करण्यात आला आहे.

नासाच्या म्हणण्यानुसार, हा उपग्रह पृथ्वीची बदलती परिसंस्था, पृष्ठभागावरील बदल आणि बर्फाच्या चादरीकोसळण्याचे मोजमाप करेल. बायोमास, समुद्रपातळीतील वाढ, भूजल आणि भूकंप, त्सुनामी, ज्वालामुखी आणि भूस्खलन यांसारख्या नैसर्गिक आपत्तींची सविस्तर माहिती यात दिली जाईल. दोन वेगवेगळ्या रडार फ्रिक्वेन्सी (एल-बँड आणि एस-बँड) द्वारे पृथ्वीच्या पृष्ठभागातील सेंटीमीटर पातळीपर्यंत होणारे बदल मोजणारा हा जगातील पहिला उपग्रह असेल. इस्रो सॅटेलाईट बस, एस-बँड रडार, प्रक्षेपण यान, प्रक्षेपण सेवा पुरवत आहे, नासा एल-बँड रडार] इतर महत्त्वाच्या यंत्रणा पुरवत आहे.

यावेळी इस्रोचे अध्यक्ष व्ही नारायणन यांनी ईओएस-०९ उपग्रह वाहून नेणाऱ्या पीएसएलव्ही-सी ६१ मोहिमेसह भविष्यातील मोहिमांचे सविस्तर सादरीकरण केले. हा उपग्रह सी-बँड सिंथेटिक अपर्चर रडारने सुसज्ज असेल, हवामान आणि दिवस आणि रात्रीच्या परिस्थितीत उच्च-रिझोल्यूशन प्रतिमा घेऊ शकेल. याशिवाय टेस्ट व्हेइकल-डी २ (टीव्ही-डी२) मोहिमेचाही इस्रोच्या कार्यक्रमात समावेश आहे, ज्याचा उद्देश गगनयान क्रू एस्केप सिस्टीमच्या कार्यपद्धतीची चाचणी घेणे हा आहे. भारताच्या पहिल्या मानवी अंतराळ उड्डाणासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या 'क्रू मॉड्यूल'च्या सागरी पुनर्प्राप्ती प्रक्रियेचा सराव या मोहिमेत केला जाणार आहे.



# फारुख अब्दुल्लांची केंद्र सरकारवर टीका

## मुर्शिदाबाद हिंसाचार





पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद येथे झालेल्या हिंसाचारावरून नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांनी केंद्र सरकार आणि प्रशासनावर जोरदार हल्ला चढवला आहे. हिंदू-मुस्लिमांमध्ये जाणीवपूर्वक द्वेष निर्माण केला जात आहे, त्यामुळे या द्वेषाचे आता हिंसेत रूपांतर होत आहे, असा आरोप त्यांनी केला.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीनगर :** फारुख अब्दुल्ला म्हणाले की, मुर्शिदाबादमध्ये जे घडले ते केवळ द्वेषाचा परिणाम आहे. तेथे बुलडोझर चालवण्यात आले. मशिदी पाडण्यात आल्या. शाळा उद्‌ध्वस्त झाल्या. मुस्लिमांची घरे पाडण्यात आली. या लोकांचा गुन्हा काय होता, असा सवाल त्यांनी केला. काही आरोप सिद्ध झाले आहेत का? या प्रकरणात काहीही सिद्ध झाले नाही, असे उत्तर त्यांनी स्वत: दिले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा संदर्भ देत माजी मुख्यमंत्री म्हणाले, न्यायालयाने बुलडोझरवर स्पष्टपणे बंदी घातली आहे, पण असे असूनही कारवाई करण्यात आली. कायदा फक्त आमच्यासाठी वेगळा आणि त्यांच्यासाठी वेगळा आहे का?

विशेष म्हणजे बंगाल हिंसाचारावरून राजकारण शिगेला पोहोचले आहे. एकीकडे केंद्रात सत्तेत असलेला भाजप ममता सरकारवर सातत्याने हिंसाचाराचा आरोप करत आहे. त्याचवेळी ममता सरकार या हिंसाचारामागे भाजपचा कट असल्याचेही सांगत आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने (आरएसएस) राज्यात द्वेषपूर्ण प्रचार सुरू केल्याचा आरोप केला आहे.

ममता बॅनर्जी यांनी लोकांना शांतता राखण्याचे आवाहन केले आणि बहुसंख्य आणि अल्पसंख्याक समुदायांनी एकमेकांची काळजी घेतली पाहिजे, असे सांगितले. मुर्शिदाबादमधील हिंसाचाराचा उल्लेख करताना ममता बॅनर्जी म्हणाल्या की, या शक्ती एका दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीचा वापर फुटीरतावादी राजकारण करण्यासाठी चिथावणीवर करत आहेत.

### ममतांनी लिहिले खुले पत्र

● पश्चिम बंगालमध्ये भाजप आणि त्यांचे मित्रपक्ष अचानक आक्रमक झाले आहेत. या मित्रपक्षांमध्ये संघाचाही समावेश आहे. संघाचे नाव मी आधी घेतले नव्हते, पण आता मला त्याचे नाव घेणे भाग पडले आहे. या दोघांनी मिळून राज्यात अपप्रचार मोहीम सुरू केली आहे.

# मुर्शिदाबाद येथील हत्येप्रकरणी अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमधील हिंसाचारग्रस्त मुर्शिदाबाद जिल्ह्यात एका व्यक्ती आणि त्याच्या मुलाच्या हत्येतील मुख्य आरोपीला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी रविवारी ही माहिती दिली. शमशेरगंजमधील जाफराबाद येथे दोन जणांच्या हत्येप्रकरणी झालेली ही चौथी अटक आहे, अशी माहिती एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने दिली.

झियाउल शेख असे अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव असून तो जाफराबादशेजारील सुलितला पूर्वपारा गावचा रहिवासी आहे. १२ एप्रिल रोजी खून झाल्यापासून तो फरार होता. पश्चिम बंगाल पोलिसांच्या स्पेशल टास्क फोर्स (एसटीएफ) आणि विशेष तपास पथकाने (एसआयटी) शनिवारी उत्तर दिनाजपूर जिल्ह्यातील चोपडा येथील त्याच्या लपून बसलेल्या शेखला अटक केली.

१२ एप्रिल रोजी हरगोविंदो दास आणि त्यांचा मुलगा चंदन दास यांच्या घरांची तोडफोड आणि हत्या करण्याचा कट रचून जमावाला चिथावणी देणारा हा मुख्य आरोपी आहे. 12 एप्रिल रोजी तो घटनास्थळावर हजर होता हे सिद्ध करण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज आणि मोबाइल फोनडिटेल्ससह सबळ पुरावे पोलिसांकडे आहेत.

पिता-पुत्रांच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी काळू नाडर आणि दिलदार आणि इंझमाम उल हक या दोन भावांना अटक केली होती.



काळूला बीरभूम जिल्ह्यातील मुराराई येथून तर त्याचा भाऊ दिलदार याला सुती पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बांगलादेश सीमा भागातून अटक करण्यात आली. तिसऱ्या आरोपीला जाफराबादच्या शेजारच्या सुरीपाडा गावातून अटक करण्यात आली.

मुर्शिदाबाद हिंसाचारप्रकरणी आम्ही १०० हून अधिक एफआयआर दाखल केले आहेत. या प्रकरणी आतापर्यंत २७६ जणांना अटक करण्यात आली आहे. वक्फ कायद्यातील सुधारणांविरोधात नुकत्याच झालेल्या आंदोलनादरम्यान झालेल्या हिंसाचारात तीन जण ठार झाले होते.

# खा. निशिकांत दुबे यांच्या अडचणींत वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालय आणि सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्यावर वादग्रस्त वक्तव्य करणारे भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांच्या अडचणी वाढल्या आहेत. वक्फ कायद्यातील एका फिर्यादीची बाजू मांडणाऱ्या सुप्रीम कोर्टाच्या वकिलाने ॲटर्नी जनरल आर. वेंकटरमण यांना पत्र लिहून निशिकांत दुबे यांच्याविरोधात अवमान कारवाई सुरू करण्यास संमती मागितली आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना या देशातील यादवी युद्धाला जबाबदार आहेत, असे खा. दुबे यांनी म्हटले होते. ॲडव्होकेट अनस तनवीर यांनी ॲटर्नी जनरल यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, दुबे यांचे वक्तव्य अत्यंत आक्षेपार्ह आणि धोकादायक प्रक्षोभक आहे.

झारखंडमधील गोड्डा लोकसभा मतदारसंघाचे माननीय लोकसभा सदस्य निशिकांत दुबे यांच्याविरोधात न्यायालयाचा अवमान कायदा १९७१ च्या कलम १५ (१) (ब) आणि सर्वोच्च न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी कारवाई चे नियमन करणाऱ्या नियम ३ (सी) अन्वये फौजदारी अवमान कारवाई सुरू करण्यासाठी मी तुमची नम्र संमती मागत आहे, असे पत्रात म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाची प्रतिष्ठा आणि अधिकार कमी करण्याच्या उद्देशाने त्यांनी जाहीरपणे विधाने केली आहेत. वक्फ (दुरुस्ती) कायद्यातील काही वादग्रस्त तरतुदींची सुनावणीच्या अंमलबजावणी करणार नाही, असे आश्वासन केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला दिल्यानंतर दुबे यांनी हे वक्तव्य केले. दुबे यांनी सर्वोच्च न्यायालयावर केलेल्या टीकेपासून भाजपने शनिवारी स्वत:ला दूर ठेवले असून पक्षाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी हे वक्तव्य त्यांचे वैयक्तिक मत असल्याचे म्हटले आहे.




बर्लिन — जर्मनीतील बर्लिन येथील हम्बोल्ट विद्यापीठातील एमिल फिशर सभागृहात पॅलेस्टिनी समर्थकांनी इस्रायल विरोधात जोरदार निदर्शने केली, तेव्हा पोलिसांना बळाचा वापर करावा लागला.

# वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा, उष्णतेची लाटही कायम




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** देशात पुढील काही दिवसांमध्ये हवामानात विविध बदल होणार असून, काही भागांमध्ये वादळी पावसाचा इशारा भारतीय हवामान खात्याने दिला आहे. ईशान्य आणि दक्षिण भारतातील अनेक राज्यांमध्ये विजेच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असून, काही भागांत उष्णतेची लाटही जाणवणार आहे.

आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेशमध्ये २२ ते २४ एप्रिलदरम्यान अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. २२ तारखेला आसाम आणि मेघालयमधील काही भागांत खूपच जोरदार पावसाचा इशारा आहे. पूर्व भारतात झारखंड, ओडिशा, पश्चिम बंगाल आणि छत्तीसगढमध्ये २० ते २४ एप्रिलदरम्यान वादळ, विजा आणि ताशी ३०-५० किमी वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. ईशान्य भारतात पुढील पाच दिवसांत वाऱ्याचा वेग वाढून गडगडाटी वादळासह पाऊस होण्याची शक्यता देखील हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

कर्नाटकमधील अंतर्गत भाग, आंध्र प्रदेश, तेलंगणा, केरळ, तामिळनाडू, पुडुचेरी व लक्षद्वीपमध्ये देखील पुढील पाच दिवस वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. विशेषतः तामिळनाडूमध्ये विजा चमकण्याचा इशारा देण्यात आला आहे.

रविवारी (दि. २०) केरळ, कोस्टल आंध्रप्रदेश आणि यानाम भागांतही मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

२० एप्रिल रोजी गुजरात राज्याच्या काही भागांत धुळीचे वारे वाहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

उत्तर-पश्चिम भारतात पुढील पाच दिवसांत तापमानात २-३ अंश सेल्सिअस वाढ होण्याची शक्यता आहे. मध्य भारत व गुजरातमध्ये फारसा बदल होणार नाही; मात्र काही भागांत २-३ अंश तापमान वाढण्याची शक्यता आहे.

पूर्व भारतात तापमानात ४-६ अंश सेल्सिअस वाढ होण्याची शक्यता आहे. २१ ते २४ एप्रिलदरम्यान उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान आणि हरियाणामधील काही भागांत उष्णतेची लाट जाणवण्याची शक्यता आहे.

# माऊलींच्या ७५० व्या जन्मोत्सवी वर्षानिमित्त धार्मिक पर्वणी

## ३ ते १० मे या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**आळंदी :** ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जन्मोत्सवी वर्षा निमित्त श्रीक्षेत्र आळंदीत ३ ते १० मे २०२५ या कालावधीत भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे. या सोहळ्यातील श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यात वारकरी, भाविक, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमेटीचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब यांनी केले आहे.

आळंदी येथील संस्थानचे भक्त निवासात ग्रंथालयात आळंदी देवस्थान आणि ग्रामस्थ यांची सोहळ्याचे उत्सवातील नियोजन, आढावा या अनुषंगाने सुसंवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी संवाद साधताना प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब बोलत होते.

या प्रसंगी देवस्थानचे माजी प्रमुख विश्वस्त व विद्यमान विश्वस्त विधीतज्ज्ञ राजेंद्र उमाप, पालखी सोहळा प्रमुख व विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, देवस्थानचे व्यवस्थापक माऊली वीर, तुकाराम माने, श्रीधर सरनाईक, माजी नगराध्यक्ष राहुल चितळकर पाटील, बबनराव कुऱ्हाडे पाटील, माजी उपनगराध्यक्ष वासुदेव घुंडरे पाटील, विलास घुंडरे पाटील, सागर भोसले, नंदकुमार कुऱ्हाडे, सचिन गिलबिले, माजी नगरसेवक डी. डी. भोसले पाटील, रमेश गोगावले, प्रकाश कुऱ्हाडे, निलेश महाराज लोंढे, बाळासाहेब महाराज शेवाळे, अनिकेत कुऱ्हाडे, संतोष भोसले, मानकरी योगिराज कुऱ्हाडे, शंकरराव कुऱ्हाडे पाटील, पांडुरंग वरखडे, अर्जुन मेदनकर, रोहिदास कदम, अजित वडगांवकर, विष्णू वाघमारे, महेश कुऱ्हाडे, राहुल चव्हाण, किरण येळवंडे यांचे आळंदी ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी देवस्थान आणि ग्रामस्थ यांच्यात विविध विषयावर चर्चा झाली. सोहळ्याचे नियोजना संदर्भात आळंदी ग्रामस्थांशी देस्थान ने संवाद साधला. दरम्यान बैठक सुरु असताना मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी सद्दीच्छा भेट दिली. यावेळी देवस्थान तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आले.

ज्ञानेश्वर महाराज यांचे ७५० व्या जन्मोत्सवी वर्षा निमित्त ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा होत आहे. यात मोठ्या संख्येने भाविक, नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब यांनी अखंड हरिनाम सप्ताहा तील विविध कार्यक्रम सांगितले. सोहळ्यातील काळात उत्तम व्यवस्था व्हावी, संवाद राहावा यासाठी १२ समित्या गठीत करण्यात येणार आहे. यासाठी सेवाभावी व्यक्तींनी आपली नावे देण्याचे आवाहन केले आहे. सोहळ्यात भाविक, वारकरी नागरिक यांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही. याची दक्षता घेत उत्तम व्यवस्था होणार आहे. उन्हाळा लक्षात घेऊन भव्य दिव्य मंडप व्यवस्था आणि उन्हाचा त्रास होऊ नये यासाठी कुलिंग यंत्रणा देखील भव्य राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विश्वस्त, पदाधिकारी यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण प्रत भाविकांना देवस्थान प्रसाद भेट देणार असल्याचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब यांनी सांगितले. उत्सव काळात नागरी सेवा सुविधा प्रभावी देण्यासाठी सर्व नियोजन सुरु असून कोणतीही गैरसोय होणार नाही याची विशेष दक्षता घेतली जाणार आहे. यात पुरेशा प्रमाणात शुद्ध पाणी, आरोग्य सुविधा, स्वच्छता, इंद्रायणी नदीत वरील धरणातून पाणी सोडण्याची मागणी करण्यात आली आहे. देवस्थान सप्ताह काळात भोजन आणि निवास व्यवस्था मोफत केली जाणार आहे.

### कार्यक्रमाचे स्वरुप

● सोहळ्यात ६ ते १० वेळेत ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी १० वाजता कीर्तन, दुपारी दिड वाजता चरित्र चिंतन, यात ३ ते ५ मे कालावधीत संत तुकाराम महाराज यांच्या ३७५ व्या सदेह वैकुंठ गमन सोहळ्या निमित्त जगद्गुरु संत तुकाराम महाराज चरित्र चिंतन, ६ ते ८ मे या कालावधीत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जन्मोतसवी वर्षा निमित्त ज्ञानेश्वर महाराज चरित्र चिंतन, ९ मे दिनी संत नामदेव महाराज यांच्या ६७५ व्या संजीवन समाधी सोहळ्या निमित्त नामदेव महाराज चरित्र चिंतन कथा होणार आहे. या शिवाय सोहळ्यात ३ ते १० मे या कालावधीत दुपारी हरिपाठ नंतर प्रवचन सेवा, सायंकाळी साडे सहा वाजता कीर्तन सेवा सुरु होईल. १० मे दिनी सोहळ्याची काल्याचे कीर्तन होईल. सोहळ्यात पहिला आणि शेवटच्या दिवशी आळंदी ग्रामस्थानी अन्नदान प्रसाद व्यवस्था स्वीकारली असून इतर दिवशी उत्सवातील नियोजनात भव्य अन्नदान प्रसाद वाटप होणार आहे.

## मोरगाव येथे आज लोकशाही दिनाचे आयोजन

**बारामती :** नागरिकांच्या शासनाच्या विविध विभागाकडील अडचणी दूर करण्यासोबतच त्यांच्या प्रलंबित असणाऱ्या स्थानिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सोमवार, २१ एप्रिल २०२५ रोजी तालुकास्तरीय लोकशाही दिनाचे ग्रामपंचायत सभागृह, मोरगाव येथे सकाळी ११ वाजता आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती तहसीलदार गणेश शिंदे यांनी दिली. नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे याकरिता मुख्यमंत्री यांनी सात कलमी कृती कार्यक्रम निश्चित करुन दिला आहे. त्याअंतर्गत राज्याच्या प्रशासनात १०० दिवसात प्राधान्याने करावयाच्या बाबींबाबत सविस्तर जिल्हाधिकारी कार्यालयाने सूचना दिल्या आहेत, नागरिकांचे प्रश्न तालुकास्तरावर मार्गी लावण्याच्या अनुषंगाने लोकशाही दिनाचे आयोजन केले असून नागरिकांनी सहभागी होऊन आपल्या हरकती, दावे या लोकशाहीत दिनात मांडाव्यात, असे आवाहन तहसीलदार श्री. शिंदे यांनी केले आहे.

## आळंदी मल्टीटेकच्या विद्यार्थ्यांनी बनवले थेम्स



**आळंदी :** महाराष्ट्र राज्यात अनेक ठिकाणी एमएस-सीआयटी कोर्स शिकवला जातो, परंतु आळंदी येथील मल्टीटेक कॉम्प्युटर सेंटरने आपल्या विद्यार्थ्यांना केवळ बेसिक संगणक शिक्षण देण्यापली कडे जाऊन, थेट "कॉम्प्युटर गेम डेव्हलपमेंट" सारख्या इनोव्हेटिव्ह प्रोजेक्टमध्ये सहभागी करून घेतल्याने, संपूर्ण जिल्ह्यात एक वेगळाच प्रेरणादायी आदर्श निर्माण केले आहे. "कॉम्प्युटर गेम क्रिएशन स्पर्धा"च्या पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन मल्टीटेक कॉम्प्युटर आळंदीत उत्साहात झाले. या कार्यक्रमात फक्त एमएस-सीआयटी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनीच सहभाग घेतला होता आणि त्यांनी स्वतःच्या कल्पकतेने थ्रीडी, एचटीएमएल, ॲनिमेशन इ. तंत्रज्ञान वापरून गेम्स तयार केले. या स्पर्धेत १५० एमएस-सीआयटी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामधून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या काही विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक आणि श्रीफळ देऊन गौरवण्यात आले. या यशस्वी विद्यार्थ्यांची नावे अशी: अथर्व मिंडे, भक्ती मिसाळ, रेणुका तळपे, गौरव गीते, गुरुराज साठे, हर्षद सुरवसे, करन आंबुरे, कृष्णकली मांडगे, पार्थ गुरव, प्रणाली घावरे, प्रसाद पोपुले, प्रीती कारले, सपना दहातोंडे, सार्थक कदम, शुभम घुटाळ, स्नेहा सावंत, सोमनाथ कसबे, वेदांत मीरधे, पृथ्वीराज मस्के या सर्व विद्यार्थ्यांनी एमएस-सीआयटी शिकत असतानाच गेम डेव्हलपमेंटमध्ये झेप घेतली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या संचालिका स्वाती थोरवे, मुख्य प्रशिक्षक रूपाली मॅडम, आणि प्रशिक्षक विश्वजीत बघे यांनी परिश्रम घेतले.

## धोकादायक विहिरीजवळील झुडपे काढली

**लोणी-धामणी :** लोणी ते मंचर ( ता.आंबेगाव ) या रस्त्यावर जारकरवाडी येथील भोजणधरा येथे अगदी रस्त्याच्या कडेला विहीर आहे. पण विहिरीच्या कडेला मोठया प्रमाणात झुडपे आहेत व नेमकी याच ठिकाणी थोडे वळण असल्याने समोरा समोरून येणारी लहान मोठी वाहाने दिसत नव्हती. त्यामुळे अपघाताची दाट शक्यता होती. या संदर्भात स्थानिक ग्रामस्थ व वाहन चालकांनी जारकरवाडी ग्रामपंचायतीला सांगितले. ग्रामपंचायतीने सार्वजनिक बांधकाम विभाग हे काम करेल याची वाट न पाहाता सरपंच प्रतिक्षा बढेकर व उपसरपंच सचिन टाव्हरे, माजी उपसरपंच कौशाल्या भोजणे व ग्रामपंचायत सदस्यांनी यांनी तातडीने रस्त्याला अडथळा ठरणारी विशेषतः झुडपे जेसीबीच्या साह्याने काढून टाकली व रस्ता मोकळा केला. या ठिकाणी असणारी विहिरी अजूनही धोकाधायक असल्याने, विहिरीच्या कडेला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यामातून किंवा ग्रामपंचायतीच्या शासनाच्या फंडातून संरक्षक भिती बांधू, असे उपसरपंच सचिन टाव्हरे यांनी सांगितले. हे काम सार्वजनिक विभागाचे आहे. पण जारकरवाडी ग्रामपंचायतीने स्वतः पुढाकार घेऊन ही झुडपे काढली,

## रात्रीच्या वेळी वाटसरूंना लुटणारी टोळी जेरबंद



**बारामती :** रात्रीच्या वेळी वाटसरूंना अडवून त्यांना मारहाण करून मोबाईल, रोख रक्कम जबरीने चोरून नेणाऱ्या सराईत टोळीला पोलिसांनी जेरबंद केले. या प्रकरणी अरबाज उर्फ बबलू हैदर शेख (वय २४ वर्ष, रा. खंडोबानगर बारामती), अविनाश उर्फ माऊली धनंजय लोंढे (रा. मळद भोंगळे वस्ती बारामती), समाधान दत्तात्रय खंडागळे (वय १९ वर्ष), रोहित विठ्ठल पवार वय, १९ वर्ष दोघे रा. दादा पाटील नगर तांदुळवाडी, बारामती) यांना अटक केली. दोन आरोपी फरार असल्याची माहिती गणेश बिरादार अप्पर पोलीस अधीक्षक बारामती विभाग यांनी दिली. पोलीस अधीक्षक पंकज देशमुख,अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, बारामती तालुका पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक वैशाली पाटील स्थानिक गणेशाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कुलदीप संकपाळ, तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम पवार, स्थानिक गुन्हे शाखेचे अंमलदार बाळासाहेब कारंडे, स्वप्निल अहिवळे, अभिजीत एकशिंगे, अतुल डेरे, राजू मोमीन, ज्ञानदेव क्षीरसागर, अजय घुले, निलेश शिंदे, धीरज जाधव, अमोल शेडगे, तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल अविनाश भागवत यांनी केली.

# जमावाकडून त्या नराधमाचे घर पेटवून देण्याचा प्रयत्न

## घरासमोरील ट्रॅक्टर पेटवला, घरालाही लावली आग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**खेड :** मांजरेवाडी (धर्म) ता. खेड गावात मागील आठवड्यात अल्पवयीन मुलीचे अपहरण, अत्याचार आणि नंतर निघृणपणे खून केल्याची घटना घडली. त्याचे तीव्र पडसाद उमटत असुन विविध स्तरातून आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी होत आहे.याच संतप्त भावनेतून नराधम आरोपीचे घर शुक्रवारी (दि १८) रात्री अज्ञातांनी घर पेटवून देण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे मोठा अनर्थ टळला. मात्र, या घटनेमुळे गावात तणावाचे आणि भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मांजरेवाडीत मागील आठवड्यात संताप जनक घटना घडली. त्याचे तीव्र पडसाद उमटत आहेत. राजगुरुनगर शहरात केंडल मार्च झाला. त्याला मोठ्या प्रमाणात गर्दी होती. महिलांनी मोर्चा हातात घेतला. आरोपीच्या फोटोला जोडे मारले, पायदळी तुडविले आणि जाळले सुध्दा. अनेक संघटना, संस्थांनी आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी यासाठी पोलिसांना निवेदन दिले आहे. अनेक सामाजिक संघटना, राजकीय नेते पीडित परिवाराला भेट देत आहेत.अशातच शुक्रवारि रात्री १० वाजण्याच्या सुमारास अज्ञात व्यक्तीनी नराधम आरोपीच्या घरासमोरील ट्रॅक्टर पेटवला.

घराच्या खिडकीतुन आगीचे बोळे आत फेकल्याने घरातही आग लागली. घरच्या खिडकीच्या काचा फोडून पेटते बोळे घरात टाकण्यात आले. मात्र पोलिसांना माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांसह राजगुरुनगर नगरपरिषदेचे आग्निशामक वाहन पथकासह दाखल झाले.

काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. या घटनेच्या पार्श्वभूमीवर आरोपीच्या घरासमोर एक पोलीस आणि पोलिस पाटील यांना सतर्क करण्यात आले आहे. नागरिकांचा प्रक्षोभ असणे साहजिक आहे. मात्र कोणीही कायदा हातात घेऊ नये असे आवाहन पोलीस निरीक्षक प्रभाकर मोरे यांनी केले आहे.गावात सध्या तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून नराधमाला फाशी झालीच पाहिजे, नाहीतर गाव शांत बसणार नाही.अशी भुमिका ग्रामस्थांनी घेतली आहे.

## मांजरेवाडी आरोपीला फाशीची शिक्षा द्या



**उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांना निवेदन देताना खेड तालुका सरपंच परिषदेचे सदस्य.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

### खेड सरपंच परिषदेची मागणी

**खेड :** खेड तालुक्यातील मांजरेवाडी धर्म येथे अल्पवयीन निष्पाप निर्भयावर गावातील नराधमाने पाशवीअत्याचार केल्यानंतर तिचा निघृण खुन केला. ही घटना संपूर्ण समाजाचे मन हेलावून टाकणारी आहे. या घटनेने राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. हा खटला जलदगती न्यायालयात चालवावा आरोपीला फाशी द्यावी, अशी मागणी खेड तालुका सरपंच परिषदेने केली.

माणुसकीला काळीमा फासणारी घटना मांजरेवाडी धर्म येथे घडली. गावातील नराधम नवनाथ कैलास मांजरे याने गावातीलच अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिची हत्या केली होती. या घटनेने पुणे जिल्हा हादरला होता. नवनाथ मांजरे या नराधमाला फाशीची शिक्षा झाली पाहिजे हा खटला जलदगती न्यायालयात चालवावा, त्यासाठी चांगल्या हुशार सरकारी वकिलाची नेमणूक करावी जेणे करून आरोपीला फाशी होईल, अशी मागणी खेड तालुका सरपंच परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. मागणीचे निवेदन उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे, खेड ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रभाकर मोरे यांना दिले. यावेळी खेड तालुका सरपंच परिषदेच्या महिला अध्यक्ष प्रतीक्षा पाचारणे, सरपंच भाग्यश्री चव्हाण, सरपंच मुदिता देखणे, सरपंच सुमित्रा चांभारे, सरपंच ॲड स्नेहल टोपे, सरपंच पंढरीनाथ कोहिनकर, समन्वयक रामचंद्र सोनवणे उपस्थित होते.

## कनेरसर येथील आंबिका विद्यालयात वीस वर्षांनी शाळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** कनेरसर, ता. खेड येथील आंबिका विद्यालयात सन २००५-०६ या वर्षात दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थांचे गेट टुगेदर (एक दिवसाची शाळा) नुकतीच पार पडली. त्यावेळी दहावीत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थांना व तत्कालीन शिक्षकांना निमंत्रित करण्यात आले. आणी १३ एप्रिल रोजी या माजी विद्यार्थांची एक दिवसाची शाळा सुरू झाली. प्रार्थना करुन शाळेचा पहिला तास सुरु झाला. आपले बालपणाचे सर्व मित्र मैत्रिण एकत्र जमल्याने जुन्या आठवणीना उजाळा मिळु लागला आणि सर्वच जण बालपणाच्या आठवणीत रमुन गेले. दरम्यान त्या वेळच्या मार्गदर्शक शिक्षकांचा सन्मान व सत्कार करण्यात आला. विद्यार्थी व शिक्षकांनी मनोगत व्यक्त करत जुन्या आठवणी व त्यावेळी घडलेल्या गमतीजमती सांगितल्या.

यावेळी आदिवासी शिक्षण संस्थेचे सचिव देवराम मुंढे,आंबिका विद्यालयाचे मुख्याध्यापक दत्तात्रय कुमकर, पत्रकार बाळासाहेब सांडभोर, वी.टी. दौंडकर, वायाळ सर, कासार सर, काळे सर आदि मान्यवर, माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन भास्कर दौंडकर, पोर्णिमा पाचपुते, संचित हजारे, पंकज दौंडकर, सीमा माशेरे, विशाल दौंडकर, विशाल लोखंडे, विशाल खरपुडे यांनी केले. माजी विद्यार्थी अविनाश गोरडे, सागर दौंडकर, महेश साळुंके यांनी मनोगत व्यक्त केले, तर अवधुत देशमुख यांनी गिटारच्या तालावर छान संगीत गायन केले. सूत्र संचालन कविता दौंडकर व कोमल माशेरे यांनी केले तर आभार मुख्याध्यापक दत्तात्रय कुमकर यांनी मानले.




# लोणी-धामणीत अखेर बिबट्याचा बछडा पिंजऱ्यात




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** गेल्या तीन महिन्यांमध्ये वाळूजनगर, खडकवाडी, धुमाळस्थळ या ठिकाणी मनुष्यावर होणाऱ्या हल्ल्याच्या अनुषंगाने खडकवाडी, वाळूजनगर, धुमाळस्थळ या ठिकाणी वन विभागाच्या मार्फत तीन पिंजरे बसवण्यात आले होते. वाळुंजनगर येथील गणेशनगर परिसरात गणेश मंदिरा जवळ सतत बिबट्याचा वावर असल्याने, तसेच मानवी वस्तीवर येण्याचे प्रमाण तसेच पशुधन हल्ले वाढल्याने व माणिक वाळूज यांच्या घराजवळील बंदिस्त जाळीमध्ये असलेल्या कोंबड्या गेली दोन दिवस येऊन बिबट्या फस्त करून जात. तसेच येणाऱ्या जाणाऱ्यांनाही बिबट्याचे दर्शन होत होते. त्या तक्रारीच्या अनुषंगाने वन विभागामार्फत वाळूंजनगर येथे चार दिवसांपूर्वी पिंजरा लावण्यात आला होता. शनिवारी पहाटे अजित शिंदे वाळुंजनगर यांनी वनरक्षक योगेश निघोट लोणी यांना बिबट्या पिंजऱ्यात अडकला, असे भ्रमणध्वनीद्वारे कळवले. तसेच बिबट्या एक बिछडा शेजारी उसाच्या शेतात वीस ते तीस मीटरच्या अंतरावर पिंजऱ्याच्या बाजूला बसून होते व सारख्या घिरट्या घालत आहेत असे सांगितले. त्यानंतर वनरक्षक लोणी यांनी वनपाल सोनल भालेराव यांना कळविले. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने वनपाल धामणी यांनी सर्व टीमला बरोबर घेऊन घटनास्थळी जाण्याचा तातडीने निर्णय घेतला. त्यानंतर पहाटे घटनास्थळी पोहोचलो असता, सदर पिंजऱ्यामध्ये बछडा वय एक ते दोन वर्ष असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर रेस्क्यू टीम मेंबर ऋषिकेश कोकने, देवेंद्र वाघ, वनसेवक दिलीप वाघ, वनरक्षक योगेश निघोट यांनी सर्वांच्या मदतीने प्रसंगावधान राखून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रथम बिबट्या मादीवर सोबत असलेल्या बॅटरीचा उजेड मारून, शासकीय गाडीचा हॉर्नचा आवाज करून, काठ्यांचा आवाज करून तिला थोड्या वेळा करता ती बाजूला गेल्यानंतर पाच वाजण्याच्या दरम्यान त्यानंतर तातडीने पिंजऱ्यावर चढून पिंजऱ्याचा दरवाजा उघडून, बिबट बछडा याला सोडवले.

पिंजऱ्याचा दरवाजा उघडतात तो पळतच उसामध्ये गेला. बिबट बछडा व आईची ताटातूट झाली, तर हल्ले होण्याची संभाव्य शक्यता वाढते व मनुष्य व मानव बिबट संघर्ष निर्माण होऊन धोका वाढतो. त्या अनुषंगाने बिबट मादी सतत त्या ठिकाणी गिरट्या घालत असल्याने बिबट बछडा याला त्याच ठिकाणी निसर्गाच्या सानिध्यात सोडण्यात आले, असे वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी सांगितले. यावेळी ऋषीकेश कोकणे,देवेंद्र वाघ,निखिल वाळूंज, माणिक वाळूंज,मनोज वाळूंज,अजित शिंदे, कैलास शिंदे, कुंदन वाळूंज, मोहन कांबळे हे बछडा अडकलेच्या पिंजऱ्याच्या बाजूला दूरवर उभे राहून लक्ष ठेवून होते.

# पुरंदरमध्ये आजपासून टँकर

## धरणांच्या पाणीसाठ्यात घट, यात्रांच्या काळात पाण्यासाठी वणवण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर :** पुरंदर तालुक्यात टंचाईची भीषणता दिवसेंदिवस वाढत आहे. तालुक्यातील धरणांच्या पाणीसाठ्यात प्रचंड प्रमाणात घट झाली असून नागरिकांना पाण्यासाठी ऐन यात्रांच्या काळात वणवण फिरण्याची वेळ आली आहे. त्यामुळे काही दिवसापर्यंत केवळ दोन टँकर सुरू असताना आता त्यामध्ये देखील वाढ झाली असून अनेक गावांनी टँकरचे प्रस्ताव मंजूर केले आहेत. त्यामुळे टँकरची संख्या वाढली आहे त्यामुळे सोमवारपासून गावोगांवी पाण्याचे टँकर दिसण्यास सुरुवात होणार आहे.

पुरंदर तालुक्यातील पिसे, नायगाव आणि पूरपोखर या तीन गावांत दोन टँकर च्या माध्यमातून पाणी पुरवठा सुरु होता. मात्र या पंधरवड्यात पाणी पुरवठा करणाऱ्या धरणातील पाणीपाठा प्रचंड प्रमाणात कमी झाला. अनेक गावांच्या नळ पाणी पुरवठा करणाऱ्या योजना अडचणीत आल्या आहेत. नळ पाणी योजना बंद होत असल्याने आणि परिसरातील पाणवठे रिकामे झाल्याने या गावांना आता टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहण्याची वेळ आली आहे.

दरम्यान, पुरंदर तालुक्यात चैत्र महिन्यात विविध गावांच्या ग्रामदेवतेच्या वार्षिक यात्रांचा हंगाम सुरू असून यानिमित्त गावोगावी विविध धार्मिक, सांस्कृतिक, पारंपरिक आणि करमणुकीचे कार्यक्रम पार पडत असतात. वर्षातून एकदा येणाऱ्या उत्सवानिमित्त घरोघरी जेवणाच्या पंक्ती बसत असतात. नाते वाईक, पाहुणे, मित्रमंडळी यानिमित्त येतात. मात्र याच कालावधीत पिण्याच्या पाण्याची समस्या उभी राहिल्याने यात्रांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

अनेक वेळा केवळ पाण्याअभावी कित्येक गावांनी वार्षिक यात्रा रद्द केल्याचा अनुभव आहे. सध्या यात्रांचा कालावधी सुरू असून एकेका दिवशी दोन, तीन गावांच्या यात्रा असतात. साधारण महिना अखेरपर्यंत यात्रांचा कालावधी असून त्यासोबतच लग्न हंगाम सुरू असल्याने प्रशासनाकडून पाण्याबाबत खबरदारी घेण्याची ग्रामस्थांकडून मागणी होत आहे.

घोरवडी धरणातून दिवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सुरू आहे. परंतु, पाइप फुटीने ही योजना बंद आहे. त्यामुळे या योजनेवर असलेल्या दिवे व वाड्यावस्त्या तसेच सोनोरी, वनपुरी, उदाचीवाडी या गावांना सध्या पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. सोनोरी, झेंडेवाडी, राजुरी, वाल्हे, सिंगापूर, पोंढे, साकुर्डे, वागदरवाडी आदी गावांना टँकर मंजूर झाले आहेत.

त्याचप्रमाणे एखतपूर, रिसे, खानवडी, वाळुंज या गावांचे टँकरने मागणी प्रस्ताव प्रशासनाकडे प्राप्त झाले असून त्यांनाही लवकरच मंजुरीची प्रक्रिया सुरू आहे. पिसे, नायगाव, पूरपोखर या गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केल्याचे पाणीपुरवठा उपअभियंता सचिन घुबे यांनी सांगितले.




### या गावांचे टँकर मंजूर

● या आठवड्यात टँकरची मागणी सोनोरी, झेंडेवाडी, राजुरी, वाल्हे, सिंगापूर, पोंढे, साकुर्डे, वागदरवाडी आदी गावांना टँकर मंजूर झाले असून साधारणपणे सोमवार पासून टँकर सुरु होण्याची शक्यता पंचायत समितीच्या पाणी पुरवठा विभागकडून व्यक्त करण्यात अली आहे. त्याचप्रमाणे एखतपूर, रीसे, खानवडी, वाळूंज या गावांचे टँकर मागणी प्रस्ताव प्रशासनाकडे प्राप्त झाले असून त्यानाही लवकरच मंजुरीची प्रक्रिया सुरू आहे.

❝ सध्या गावातील पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीने तळ गाठलेला आहे. घोरवडी धरणावरील दिवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना तीन वर्षे बंद आहे. टँकरसाठी प्रस्ताव देऊन 15 दिवस झाले तरीही प्रशासनाकडून टँकर पुरवण्याच्या कामात दिरंगाई होत आहे. गावात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. तसेच जलजीवन योजनेचे काम अपूर्ण आहे.

**-संतोष काळे, ,** सरपंच, सोनोरी.

---

## पुरंदर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची बुधवारी सोडत

**सासवड :** पुरंदर तालुक्यातील पुढील कार्यकाळात होऊ घातलेल्या ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाच्या सोडती संदर्भात तहसीलदार विक्रम राजपूत यांनी एक पत्र प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार पुरंदर तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची निवडणूक प्रक्रिया राबवली जाणार असून यासंदर्भात सरपंच पदाच्या आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली आहे. बुधवारी (दि. २३) सासवड येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवन येथे दुपारी १२.१५ वाजता आरक्षण सोडत म्हणजेच ड्रॉ घेतला जाणार असल्याचे तहसीलदार विक्रम राजपूत यांनी पत्राद्वारे कळवले आहे.

## डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभियान

**इंदापूर :** उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय महाराष्ट्र राज्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे व इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १८ तास वाचन अभ्यास अभियानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे यांनी डॉ. आंबेडकर यांच्या अनेक पैलूंविषयी माहिती दिली. उपप्राचार्य प्रा. दत्तात्रय गोळे यांनीही विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. सांगता समारोपमध्ये अनिकेत गुरगुले, ओंकार शिंगारे, शिंदे गायत्री, पूजा मासुळे या विद्यार्थ्यांना शाल व गुलाब पुष्प देऊन १८ तास अभ्यास पूर्ण केल्याप्रती सत्कार केला. यावेळी कला शाखाप्रमुख डॉ. भिमाजी भोर, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. शिवाजी वीर, डॉ. राजाराम गावडे, प्रा. श्रीनिवास शिंदे, डॉ. राजेंद्र भोसले, प्रा.मृदुल कांबळे, प्रा. पुरुषोत्तम साठे, प्रा.देशमाने, प्रा. दिनेश जगताप उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथालयाच्या प्रमुख डॉ. मनिषा गायकवाड यांनी केले. विद्यार्थी विकास मंडळाचे प्रमुख डॉ. तानाजी कसबे यांनी आभार मानले.

## खेड तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण २३ एप्रिलला

**खेड :** खेड तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाचे आरक्षण सोडत बुधवारी (दि. २३) काढण्यात येणार आहे. खेड पंचायत समितीच्या सभागृहात दुपारी १२ वाजता प्रांताधिकारी अनिल दौंडे यांच्या अध्यक्षतेखाली ही आरक्षण सोडत करण्यात येणार आहे. सर्व गावातील नागरिक आणि इच्छुकांचे या आरक्षण सोडतीकडे लक्ष लागले आहे. पाच वर्षांपूर्वी म्हणजे ८ ऑक्टोबर २०२० ला तत्कालीन तहसीलदार डॉ. वैशाली वाघमारे यांच्या उपस्थितीत तालुक्यातील १६२ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत झाली होती. हे आरक्षण रद्द होऊन पुन्हा २० जानेवारी २०२१ मध्ये फेर आरक्षण सोडत काढुन अंतिम करण्यात आली होती. या आरक्षण सोडतीमध्ये ६० % महिलांना सरपंच पदाची संधी मिळाली होती. महा विकास आघाडी सरकारने लोकनियुक्त सरपंच पदाची निवडणुक पध्दती रद्द करुन सदस्यामधुन सरपंच निवडणुक घेण्यास सुरुवात केली होती. नंतर शिवसेना फुटीनंतर महायुतीचे सरकार येताच पुन्हा लोकनियुक्त सरपंच निवडणुक अमंलबजावणी करण्यात आली. सध्या महायुतीचे सरकार राज्यात सत्तेत असल्यामुळे लोकनियुक्त सरपंच पदाची निवडणुक कायम राहणार आहे. त्यामुळे गावोगावच्या सरपंच पदाच्या आरक्षणाकडे राजकीय क्षेत्रातील जाणकारांचे लक्ष लागून राहिले आहे.

## २५ लाखांची लाच मागितल्याने गुन्हा दाखल

**पुणे :** जिल्ह्यातील भूअभिलेख विभागाचे दोन वरिष्ठ अधिकारी सध्या अडचणीत आले आहेत. जमिनीच्या मोजणीसंदर्भात ५० लाख रुपयांची लाच मागितल्याच्या गंभीर आरोपांनंतर उप-अधिक्षक अमरसिंह पाटील आणि मोजणी अधिक्षक किरण येटोळे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी तक्रारदाराने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे थेट तक्रार केली होती. त्यानंतर प्रशासनाने लक्ष घातल्यानं हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, तक्रारदाराने २०२३ पासून पुणे ग्रामीणमधील एका शेतजमिनीची मोजणी व हद्द निर्धारण प्रक्रियेबाबत सातत्याने अर्ज करूनही अधिकारी टाळाटाळ करत होते. याच दरम्यान, अमरसिंह पाटील व किरण येटोळे यांनी कामासाठी ५० लाखांची मागणी केल्याचा आरोप आहे. एवढंच नाही तर, हेलिकॉप्टर शॉट लावतो, अशा प्रकारची धमकी दिल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. या तक्रारीनंतर पुणे शहरातील आर्थिक व सायबर गुन्हे शाखेने प्राथमिक चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

---

# कऱ्हा नदी कोरडी ठणठणीत

## काठावरील शेतीपिके आली धोक्यात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामती तालुक्यातील पश्चिम जिरायत भागातील पुरंदर व बारामती तालुक्यातून वाहणारी कऱ्हा नदी सध्या कोरडी ठणठणीत आहे. त्यामुळे या नदीकाठावरील शेतीपिके धोक्यात आली आहेत. तसेच पाणीपुरवठा योजनाही अडचणीत आल्या आहेत.

पावसाळ्यात या नदीला थोडेफार पाणी आले होते. त्यानंतर या नदीचे पाणी प्रवाहित झाले नाही. या नदीकाठी मयूरेश्वर पाझर तलावात शेतकरी विकत घेऊन पुरंदर उपसा सिंचनचे पाणी साठवले जाते. ते बंधाऱ्याच्या खाली जात नसल्याने त्या काठावरील शेतीला या योजनेचा उपयोग होत नाही. या नदीच्या काठावरील शेतीपिके धोक्यात आली आहेत.

या भागातील शेतीत सध्या ऊसपीक आहे. हे पीक विहिरीच्या पाण्यावर घेतले जाते. परंतु, विहिरीच्या पाण्याने तळ गाठल्याने सध्या ऊस पीक जळून जाण्याच्या मार्गावर असल्याचे शेतकरी चंद्रकांत टेकवडे, महेश टेकवडे, मिथुन टेकवडे यांनी सांगितले. ऊस पीक वाळून गेल्यास उत्पादन खर्च वाया जाण्यासह आर्थिक अंदाजपत्रक कोलमडण्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली.

### तापमान वाढीमुळे पाण्याचे स्रोत आटले

मोरगाव परिसरात सध्या ३९ ते ४१ अंशांवर तापमान आहे. त्यामुळे पाण्याचे स्रोत आटू लागले आहेत. पाण्याअभावी चारा पिकांसह भाजीपाला लागवडी संकटात आहेत, असे मत अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केले. या नदीकाठावर असणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या पाणीपुरवठा योजनाही अडचणीत आल्या आहेत. बारामती तालुक्याच्या पश्चिम जिराईत भागातील कऱ्हा नदीकाठावरील शेतकऱ्यांची परिस्थिती गंभीर असल्याचे अनेक शेतकऱ्यांनी सांगितले.



---

## गाईंची क्रूरतेने वाहतूक; इंदापुरात तिघांवर गुन्हा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** विठ्ठलवाडी येथे इंदापूर- अकलूज मार्गावर चार चाकी टेंपोमध्ये जनावरांची क्रूरतेने वाहतूक केल्याप्रकरणी तिघा जणांविरोधात इंदापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, यामध्ये २४ गाईंसह तब्बल दहा लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत आकाश संजय भैसडे (वय २४, मूळ रा. तपनेश्वरगल्ली जामखेड, जि. आहिल्यानगर, सध्या रा. हडपसर, ता. हवेली) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, बुधवारी (ता. १६) सायंकाळी अकलूज इंदापूर मार्गावर विठ्ठलवाडी गावच्या हद्दीत आयशार टेम्पोमध्ये २४ जर्सी गायी दाटीवाटीने कोंबून ट्रकमध्ये गोवंशाना ठेवण्याची सुरक्षीत स्वतंत्र व्यवस्था न करता व ट्रकमध्ये प्रथमोपचाराचे साहित्य न ठेवता जनावरांना क्रूरतेने वागवून त्यांची वाहतूक करताना मिळून आले. यावरून अतुल अरुण शिंदे (रा. बाबुर्डी, ता. अहिल्यानगर), रोहन सुभाष सरवदे, गणेश बबन दोरकर (दोघे रा. राऊत नगर, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर) यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून, यामध्ये सात लाख रुपये किमतीचे चारचाकी वाहन व साडेतीन लाख रुपये किमतीच्या २४ गाई, असा एकूण १० लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार अप्पा हेगडे करत आहेत.

## सद्‌गुरु शंकर महाराज भक्तांचा उरुळी कांचन येथे स्नेहमेळावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** दरवर्षीप्रमाणे यावर्षीही संतवर्य योगीराज सद्गुरु श्री शंकर महाराजांच्या भक्तांचा स्नेहमेळावा पुण्याजवळ उरुळी कांचन येथे रविवारी (दि. २७) रोजी आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती पुणे येथील ओम जय शंकर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प.पू. सद्गुरु सु.द. उर्फ पप्पाजी पुराणिक महाराज यांनी दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ६.३० ते रात्री ९.३० वाजेपर्यंत भरगच्च कार्यक्रम होणार होणार आहेत. प.पू.महंत शेरनार्थ बापू (मठाधिपती गिरनार), प.पू.महंत योगी देवराह जंगल बाबा (महुआ प्रयागराज ), प.पू.श्री विश्वेश्वर स्वामी महाराज (नगर), प.पू. गोरख रायते महाराज (अंतापूर ), आयएएस अधिकारी अनिल कवडे, प्रभाकर देशमुख उपस्थित राहणार आहेत.

---

## खरपुडी येथील कुस्ती आखाड्याचा मानकरी शिवराज राक्षे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खरपुडी बु. ता खेड येथील तुकाई माता देवीच्या उत्सवा निमित्ताने नुकतेच निकाली कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात ८० नामवंत मल्लांनी सहभाग घेतला.

जोडीस जोड आणि तोडीस तोड कुस्त्या यावेळी कुस्ती शौकीनांना पाहायला मिळाल्या. सुमारे नऊ लाख रुपयांची बक्षीसे मल्लांना वाटण्यात आली. डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे यांचा हप्ते डावावर विजय झाला. महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील आणि महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीर कुस्ती बरोबरीत सुटली. श्रीमंत भोसले विरुद्ध मनोज मानेने आकडे डावा वर विजय मिळवला. पंच म्हणून पैलवान मनोज बोत्रे, गणेश बोत्रे, पप्पू पडवळ, अरुण खेंगले,सचिन वहिले यांनी काम पाहिले. कुस्तीचे निवेदन युवराज केचे यांनी केले. खेड कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील, खरपुडीचे सरपंच व बाजार समितीचे संचालक जयसिंग भोगाडे , यात्रा उत्सव कमिटीचे अध्यक्ष प्रसाद भोगाडे, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष हिरामण सातकर, बाजार समितीचे संचालक अशोकदादा राक्षे, आनंदा काळे, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष नरेंद्र थिगळे, माजी सभापती दशरथ गाडे, सोसायटी अध्यक्ष संदीप गाडे, तानाजी बरबटे, दिलीप गायकवाड, संजय गायकवाड, अशोक काशीद, विलास चौधरी पाटील, ऋषिकेश काशीद ,निलेश सुपेकर, उद्योजक मयूर भोगाडे उपस्थित होते.

खरपुडी येथील तुकाई मातेचा उत्सव १६ एप्रिल रोजी सुरू झाला. या दिवशी सकाळी देवीला अभिषेक घालून महापूजा करण्यात आली. सकाळी ग्रामस्थांची वैयक्तिक पूजा व विधी कार्यक्रम झाला. त्यानंतर दुपारी मिरवणुक व अघोरीचा कार्यक्रम पार पडला. रात्री लोकनाट्य तमाशाचा कार्यक्रम झाला. दुसऱ्या दिवशी कुस्ती स्पर्धा पार पडल्या.यंदा प्रथमच यात्रा कमिटी अध्यक्ष प्रसाद भोगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली निकाली कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते. कुस्त्यांचा आखाडा पाहण्यासाठी पंचक्रोशीतील नागरिकांनी गर्दी केली होती. रात्री गौतमी पाटील यांचा आर्केस्ट्राचा कार्यक्रम पार पडला.



खरपुडी येथे पैलवान शिवराज राक्षे यांची कुस्ती लावताना सरपंच जयसिंग भोगाडे.

---

# काकडी, मिरची, टोमॅटोची मोठी आवक; कांद्याच्या आवकेत घट; भाव स्थिर

### एकूण उलाढाल ५ कोटी २० लाख रुपये




चाकण बाजारात कांद्याची झालेली आवक. ( छाया : अविनाश दुधवडे, चाकण )

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केट यार्डमध्ये काकडी, हिरवी मिरची व टोमॅटोची मोठी आवक झाली. कांदा, बटाटा व लसणाची आवक घटूनही भाव स्थिर राहिले. पालेभाज्यांची भरपूर आवक झाल्याने भाव कोसळले. भुईमूग शेंगा व जळगाव भुईमूग शेंगांची काहीच आवक झाली नाही. एकूण उलाढाल ५ कोटी २० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ६,००० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ५,५०० क्विंटलने घटून कांद्याचा कमाल भाव १,४०० रुपयांवर स्थिर राहिला. बटाट्याची एकूण आवक १,५०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक २५० क्विंटलने वाढून बटाट्याचा कमाल भाव २,००० रुपयांवर स्थिरावला. लसणाची एकूण आवक २० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ५ क्विंटलने घटूनही लसणाचा कमाल भाव १० हजार रुपयांवर स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ४०० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला २ हजार रुपयांपासून ते ४ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला. बटाटा - एकूण आवक - १,५०० क्विंटल.भाव क्रमांक १.२,००० रुपये, भाव क्रमांक २.१,५०० रुपये,भाव क्रमांक ३.१,३०० रुपये.

**शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे**

कांदा - एकूण आवक - ६,००० क्विंटल.भाव क्रमांक - १.१,४०० रुपये,भाव क्रमांक २.१,२०० रुपये,भाव क्रमांक ३.८०० रुपये. पालेभाज्या -

चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे - मेथी - एकूण १ लाख ५१ हजार जुड्या (१,००० ते १,५०० रुपये ),कोथिंबीर - एकूण २९ हजार ५४० जुड्या (४०० ते ९०० रुपये,),शेपू - एकूण ३ हजार ९०० जुड्या (६०० ते १,००० रुपये ), पालक - एकूण ३ हजार ५५० जुड्या (४०० ते ७०० रुपये),.

जनावरे -

चाकण येथील जनावरांच्या बाजारात विक्रीसाठी आलेल्या ४५ जर्शी गाईपैकी ३५ गाईची विक्री झाली.(१५,००० ते ७०,००० रु.),७० बैलांपैकी ६२ बैलांची विक्री झाली. (१०,००० ते ४०,००० रु.), १२० म्हशीपैकी ९० म्हशींची विक्री झाली. (३०,००० ते ८०,००० रु.), १० हजार ७२० शेळ्या - मेंढ्यापैकी १०,५५० शेळ्यांची विक्री झाली. (२,००० ते २५,००० रु.),.

**फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -**

टोमॅटो - ३५२ क्विंटल (८०० ते १,२०० रू.),कोबी - २७५ क्विंटल ३०० ते ५०० रू.),फ्लॉवर -१७५ क्विंटल (१,२०० ते १,८०० रु.), वांगी - ९० क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.),भेंडी - १०४ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रु.),दोडका - ६० क्विंटल (३,००० ते ४,००० रु.),कारली - ७४ क्विंटल ( ३,००० ते ४,५०० रु.),दुधीभोपळा - ५० क्विंटल (१,००० ते २,००० रु.),काकडी - ९० क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.),फरशी - ५० क्विंटल (४,००० ते ६,००० रु.),वालवड - ५४ क्विंटल (५,००० ते ६,००० रुपये), ढोबळी मिरची -१०० क्विंटल (३,००० ते ४,००० रु.),चवळी -५४ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.),शेवगा -६२ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.),गाजर - २०० क्विंटल (१,००० ते १,५०० रु.),गवार - ७८ क्विंटल (४,००० ते ६,००० ),वाटाणा - १०० क्विंटल (६,००० ते ७,०००).



## ससा तो ससा

*ससा तो ससा की कापूस जसा... हे बालगीत अनेकांच्या स्मरणात असेल. फोटोतले हे ससेही कापसासारखे मऊ आणि गोंडस आहेत. हे दोन मित्र मस्तपैकी खादाडी करण्यात गुंग झाले आहेत. हे दोन्ही ससुले एकमेकांना काय बरं सांगत असतील? 'या फुलांची चव खूपच छान आहे, तूही खाऊन बघ' हाच सल्ला एक ससुला दुसऱ्याला देत असावा...*

## गार्यीमध्ये बर्ड फ्लू




गार्यीमध्ये प्रथमच बर्ड फ्लूचा विषाणू आढळून आला आहे. या रोगामुळे गाईचे दूध घट्ट होऊन रंग बदलला आहे. स्थलांतरित पक्ष्यांकडून अमेरिकेतील गार्यीना हा आजार झाला आहे. अमेरिकेच्या कृषी विभागाने याला दुजोरा दिला आहे.टेक्सास आणि कॅन्ससमधील चार डेअरी फार्ममधील गार्यीमध्ये एव्हियन इन्फ्लूएंझासाठी सकारात्मक चाचणी झाली असल्याचे कृषी विभागाने सांगितले. न्यू मेक्सिकोमध्येदेखील बर्ड फ्लू झाल्याला दुजोरा मिळाला आहे; परंतु बाधित डेअरी फार्मची संख्या जाहीर करण्यात आलेली नाही. इलिनॉय विद्यापीठातील पशुवैद्य आणि इन्फ्लूएंझा संशोधक जिम लोव म्हणाले की, दूषित दूध सिरपसारखे घट्ट दिसते. हे उत्पादन लोकांपर्यंत पोहोचले तरी पाश्चरायझेशनमुळे ग्राहकांना विषाणूपासून संरक्षण मिळेल. पाश्चरायझेशन ही एक प्रक्रिया आहे, ज्यामध्ये हानिकारक जीवाणू नष्ट करण्यासाठी विशिष्ट कालावधीसाठी दूध विशिष्ट तापमानाला गरम केले जाते.

काही शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात मृत स्थलांतरित वन्य पक्षी पाहिले आहेत, ज्यावरून असे सूचित होते, की व्हायरस त्यांच्यापासून आला असावा. आतापर्यंत या विषाणूमुळे फार कमी गार्यीचा मृत्यू झाला आहे, परंतु संसर्गामुळे दूध उत्पादनात ४० टक्के घट झाली आहे.

## असाही योगायोग

भारतात येणारे राजकीय नेते ताज महालला भेट देतात. ताज महाल हे प्रेमाचं प्रतीक. सौंदर्याची खाण. म्हणूनच हा संगमरवरी ताज महाल अनेकांना भुरळ घालतो. अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनाही ताज महालची भुरळ पडली होती. ताज महाल प्रेमाचं प्रतीक असलं तरी या ऐतिहासिक ठिकाणाला भेट देणाऱ्या राजकीय नेत्यांचं तसंच काही प्रसिद्ध व्यक्तींचं लग्न मोडल्याच्या घटना घडल्या आहेत! अर्थात हा एक योगायोग म्हणता येईल. २००० मध्ये रशियाचे राष्ट्रपती ब्लादिमिर पुतीन आपल्या पत्नीसोबत ताज महाल पहायला गेले. मात्र तीन वर्षांनंतर त्यांचा घटस्फोट झाला. १९९२ मध्ये प्रिन्सेस डायना यांनी ताज महालाला भेट दिली. त्यावेळी प्रिन्स चार्ल्स त्यांच्यासोबत नव्हते. प्रिन्स चार्ल्सच्या अनुपस्थितीबाबत त्यांना काही प्रश्नही विचारण्यात आले. मात्र यानंतर दहा महिन्यांनी डायना आणि प्रिन्स चार्ल्स यांचा घटस्फोट झाला. हॉलिवूड अभिनेता टॉम क्रूज २०११ मध्ये भारतात आला होता. टॉम क्रूज अनिल कपूरसोबत ताज महाल बघायला गेला होता. मात्र २०१२ मध्ये त्याने तिसरी पत्नी कॅटी होम्सशी घटस्फोट घेतला. २००९ मध्ये हॉलिवूड स्टार रसेल ब्रांड ताज महाल बघायला आला होता. त्याच्यासोबत प्रेयसी कॅटी पेरीसुद्धा होती. नंतर या दोघांनी लग्न केलं. पण १४ महिन्यांनी त्यांचा घटस्फोट झाला. २०१२ मध्ये प्रसिद्ध टेनिसपटू बोरिस बेकर पत्नी लीलीसह ताज महाल बघायला आला होता. मात्र नंतर त्यांचा घटस्फोट झाला. १९६२ मध्ये अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्रपती जॉन एफ. केनेडी यांच्या पत्नी जॅकलीन केनेडी भारत दौऱ्यावर आल्या होत्या. या दौऱ्यात त्यांनी ताज महाल बघितला. मात्र नंतर १९६३ मध्ये केनेडी यांची हत्या झाली आणि जॅकलीन एकट्या पडल्या.





## वराऐवजी भटजीचेच बूट पळवले

लग्नसमारंभात नवऱ्या मुलाच्या चपला चोरण्याची पद्धत खूप लोकप्रिय झाली आहे. वराच्या चपला पळवण्यासाठी वधूच्या बहिणी, मैत्रिणी प्रयत्न करत असतात, तर त्या चपला सांभाळून ठेवायची जबाबदारी वराच्या मित्रांची आणि भावांची असते. त्यासाठी अनेक जुगाडही केले जातात. काही जण चपला लपवतात, तर काही जण त्या चपला सतत स्वत:कडेच ठेवून फिरत असतात. चपलांच्या बदल्यात पैसे उकळण्याचा वधूच्या बहिणींचा प्लान असतो. काही वेळा हा यशस्वी ठरतो, काही वेळा वेगळेच मजा घडते. परंतु, एका विवाह समारंभात वराच्या चपला पळवण्याऐवजी चक्क भटजीचा बूट पळवले!

वधूच्या बहिणी आणि मैत्रिणी या वराचे बूट पळवण्याचा प्रयत्न करत होते. पण त्यांचा प्लान त्यांच्यावरच उलटला. घाईघाईत त्यांनी बूट तर पळवले, पण नंतर लक्षात आले, की ते बूट नवरदेवाचे नव्हे, तर लग्न लावणाऱ्या भटजींचे होते. जेव्हा ही गोष्ट नवरदेवाला समजली, तेव्हा त्यालाही हसू आवरता आले नाही. वराकडचे कुटुंबीय आणि त्याचे मित्रही हसून हसून बेजार झाले. ते भटजी लग्न लावण्यासाठी आले होते, त्यांना दक्षिणाही चांगली मिळाली; पण त्या बदल्यात त्यांचे बूट चोरीला गेले.

पंडितजी मंत्र म्हणत असताना वधूच्या बहिणींनी तिथले बूट चोरले; पण ते बूट वराचे नव्हतेच. कारण, त्याच्या मित्रांनी ते अतिशय शिताफीने लपवून ठेवले होते. वधूच्या मैत्रिणींनी बूट पळवले; पण ते लग्न लावणाऱ्या भटजींचे होते. मुलीकडच्यांना समजलेच नाही की ते बूट कोणाचे आहेत. मित्रांना हे समजले आणि त्यांनी वरील गोष्ट सांगितली. त्यांनाही हसू आवरलं नाही. भटजीही पोट धरून हसू लागले.

## दाल मखनी, बटर चिकनच्या संशोधनाचा वाद न्यायालयात



भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. आपल्या देशात प्रत्येक राज्याची वेगळी संस्कृती आहे. राज्यांप्रमाणे तिथल्या खाण्याची चवही बदलत जाते. काही पदार्थ असे असतात जे प्रत्येक संपूर्ण देशभरात आवडीने खाल्ले जातात. यापैकीच दोन पदार्थ म्हणजे बटर चिकन आणि दाल मखनी. हे दोन पदार्थ जगभरात प्रसिद्ध आहेत; पण सध्या या पदार्थांचा शोध कोणी लावला यावरून वाद सुरू आहे. दिल्लीतल्या मोती महल आणि दरियागंज या दोन प्रतिष्ठित रेस्टॉरंटने या दोन पदार्थांचा शोध लावल्याचा दावा केला आहे. प्रकरण इतके टोकाला गेले की, हा वाद आता दिल्ली उच्च न्यायालयात पोहोचला आहे. १९४७ मध्ये कुंदनलाल गुजराल यांनी बटर चिकन आणि दाल मखनीचा अविष्कार केला असा दावा मोती महल रेस्टॉरंटने केला आहे, तर या पदार्थांचा इतिहास १९ व्या शतकाशी जोडला गेला, असे दरियागंज रेस्टॉरंटचे म्हणणे आहे. 'मोती महल रेस्टॉरंटच्या म्हणण्यानुसार, कुंदन लाल गुजराल हे चिकन टिक्का मसाला बनवत असताना त्यांनी चुकून त्यात टोमॅटो आणि बटर मिक्स केले. त्याची चव खूपच छान होती, म्हणून त्यांनी या डिशला बटर चिकन असे नाव दिले. बटर चिकनप्रमाणेच गुजराल यांनी दाल मखनीच्या रेसिपीतही बदल केला होता, तर दरियागंज रेस्टॉरंटने केलेल्या दाव्यानुसार बटर चिकन आणि दाल मखनी हे दोन्ही पदार्थ पेशावरमधून भारतात आले.

दरियागंज रेस्टॉरंटने दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. बटर चिकन आणि दाल मखनीचा शोध लावल्याचा दरियागंजचा दावा चुकीचा असून न्यायालयाने त्यांच्यावर असे करण्यापासून रोख लावावा, अशी मागणी मोती महल रेस्टॉरंटने केली आहे.

## ग्रेट तुझी माझी!

एखाद्या जत्रेत हरवलेली भावंडं बऱ्याच वर्षांनंतर एकमेकांना भेटतात, अशा आशयाची बरीच कथानकं हिंदी चित्रपटांमध्ये पहायला मिळतात. सध्याच्या सोशल मीडियाच्या काळात प्रत्यक्ष आयुष्यातही असे चमत्कार घडतात. कंबोडियामध्येही अशीच घटना घडली. इथे ९८ आणि १०१ वर्षांच्या बहिणींची भेट झाली. या दोघी ४७ वर्षांनंतर एकमेकींना भेटल्या. या वेळी या दोघींच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. या दोघींनी १९७३ मध्ये एकमेकींना अखेरचं पाहिलं होतं. १९७० च्या दशकात कंबोडियामध्ये सत्ता परिवर्तन झालं. हुकुमशहा पॉल पॉट आणि त्याच्या सेनेने कंबोडियाची सत्ता आपल्या ताब्यात घेतली. १९७६ मध्ये इथे साम्यवादी सरकार स्थापन झालं. पॉल पॉट पंतप्रधान बसला. १९७९ पर्यंत इथे पॉलची सत्ता होती. या कालखंडाला 'ख्मेर रूज' असं म्हटलं जातं. या काळात २० लाख लोक विस्थापित झाले. त्यात या बहिणींचाही समावेश होता. बन सेन आणि बन चिया अशी या बहिणींची नावं आहेत. २००४ पासून या बहिणींना भेटवण्याचे प्रयत्न होत आहेत. चिल्ड्रन्स फंड या स्थानिक सेवाभावी संस्थेचे या दोघींच्या भेटीसाठी प्रयत्न सुरू होते. या प्रयत्नांचं फळ अखेर मिळालं आणि या भावंडांची भेट झाली. यावेळी बन सेन बहिणीसह आपल्या भावालाही भेटली. घर सोडल्यानंतर बन सेनला परत येणं शक्य झालं नाही. आता जवळपास अर्ध्या शतकानंतर ही भावंडं एकत्र आली आहेत.





## हुंडा न घेणारं आदर्श कुटुंब

हुंड्याची कुप्रथा आजही अस्तित्वात आहे. लालसेपायी अधिकाधिक हुंडा घेतला जातो. घरच्या सुनेला त्रास दिला जातो. टोमणे मारले जातात. मात्र काही लोक या प्रथेला फक्त विरोधच करत नाहीत तर आपल्या कृतीतून समाजासमोर आदर्श निर्माण करतात. इंदूरमधलं फतेहचंदानी कुटुंब अशाच काही मोजक्या कुटुंबांपैकी एक. गेल्या ४२ वर्षांमध्ये या कुटुंबात सहा विवाह सोहळे संपन्न झाले. मात्र या कुटुंबाने सुनांकडून कधीही हुंडा घेतला नाही. लग्नाला येणाऱ्या पाहुण्यांकडून भेटवस्तूही स्वीकारल्या नाहीत. फतेहचंदानी कुटुंबात २१ सदस्य राहतात. एकत्रच स्वयंपाक करतात, एकत्रच जेवतात. या कुटुंबात घरी येणाऱ्या सुनेला लक्ष्मीचं रुप मानलं जातं. त्यामुळे मुलीच्या घरच्यांकडून हुंडा घेतला जात नाही. साखरपुड्यात मुलीकडून पाच किलो खडीसाखर आणि अकरा नारळ घेतले जातात. या शिवाय दुसरी कोणतीही वस्तू स्वीकारली जात नाही. फतेहचंदानी कुटुंबियांना आदर्श मानून त्यांच्या समाजातल्या अनेकांनी हुंडा न घेण्याचा निर्णय घेतला आहे. ही खूप मोठी गोष्ट असल्याचं कुटुंबाला वाटतं. समाजात बदल घडणं आवश्यक असल्याचं त्यांचं म्हणणं आहेय फतेहचंदानी कुटुंबाकडूनच सुनेला दागिने घातले जातात. लग्नाच्या पत्रिकेत भेटवस्तू न आणण्याची विनंती केली जाते. आजच्या काळात सुखाने नांदणारं एकत्र कुटुंब पहायला मिळत नाही. पण फतेहचंदानी कुटुंबात एकत्र कुटुंबाची परंपरा जोपासली आहे. सुनेला लक्ष्मीचं रुप मानण्याचा या कुटुंबाकडून समाजाने धडे घेणं गरजेचं आहे.

## अकरा वर्षाच्या मुलाने लुटली बँक!



शाळेला सुट्टचा असतात, तेव्हा बहुतेक मुले एकतर त्यांच्या पालकांसोबत कुठेतरी बाहेर जातात किंवा त्यांचा सगळा वेळ खेळण्यात, टी.व्ही. पाहण्यात घालवतात. मोकळ्या वेळेचा सदुपयोग करण्यासाठी एखादं मूल बँक लुटायला निघालं असं कधी घडलं आहे? हो, असेच एक विचित्र प्रकरण सध्या चर्चेत आहे. त्यामुळे केवळ लोकच नाही तर पोलिसही हैराण झाले आहेत.

अमेरिकेतील टेक्सास राज्यातील ह्युस्टन शहरात नुकतीच तीन तरुणांनी स्थानिक बँक लुटली. या तिघांचे वय ११, १२ आणि १६ वर्षे आहे. पोलिसांचा दावा आहे की, तिन्ही मुले नॉर्थ ह्युस्टनच्या ग्रीन्सपॉईंट भागातील वेल्स फार्गो बँकेत गेले आणि त्यांनी कॅशियरला धमकीची नोट दिली. यानंतर तो पैसे घेऊन तेथून पळून गेला. पोलिसांना या घटनेची माहिती मिळताच त्यांनी बँक गाढून सीसीटीव्ही फुटेज तपासले. तेव्हा बँक दरोडेखोर ही मुले असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

निवृत्त जुवेनाइल जिल्हा न्यायालयाचे न्यायाधीश माईक श्राइडर यांनी सांगितले की, त्या तीन मुलांपैकी दोन मुले बँक लुटण्यासाठी असामान्य वयाची आहेत. कदाचित त्यांच्यासोबत एक प्रौढ व्यक्तीदेखील सामील आहे. हे असामान्य नाही. या विचित्र दरोड्यात आणखी कोणाचा सहभाग आहे की नाही हे पोलिसांनी अद्याप उघड केले नसले, तरी या तीन लहान बदमाशांवर सध्या लुटमारीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फौजदारी बचाव पक्षाच्या वकिलाच्या म्हणण्यानुसार, जर तो दोषी सिद्ध झाला, तर त्याला १८ किंवा १९ वर्षांचा होईपर्यंत बाल कारागृहात राहावे लागेल. तीन गुन्हेगारांची छायाचित्रे प्रसिद्ध होताच, दोन लहान मुलांचे पालक पुढे आले आणि त्यांनी त्यांना पोलिसांच्या स्वाधीन केले, तर तिसऱ्याला पोलिसांनी पकडले.




## लक्झाम्बर्गला या, बिनधास्त फिरा

राजधानी दिल्लीत महिलांना बसमधून मोफत प्रवास करता येतो. यासोबतच काही राज्यांमध्ये महिलांना सवलतीत तिकिट दिलं जातं. महिलावर्गाला खूश करण्यासाठी राजकारणी अशा विविध सवलती आणि योजनांची घोषणा करतात. मात्र लक्झम्बर्ग या देशातली सार्वजनिक वाहतूक सर्वांसाठी मोफत करण्यात आली. तुम्ही महिला असा वा पुरुष, सार्वजनिक वाहतूक सेवेचा वापर करण्यासाठी तुम्हाला एकही पैसा खर्च करावा लागणार नाही. ट्रेन, ट्राम तसंच बसमधून प्रवाशांना मोफत फिरता येईल. लक्झम्बर्गचे नागरिकच नाहीत तर इथे येणाऱ्या पर्यटकांनाही या सुविधेचा लाभ घेता येणार आहे. म्हणजेच लक्झम्बर्गमध्ये येणारे पर्यटक सगळीकडे मोफत फिरू शकतील. लक्झम्बर्ग हा युरोप खंडातला सातव्या क्रमांकाचा सर्वात लहान पण श्रीमंत देश आहे. हा देश खूप सुंदर आहे. इथे पर्यटकांचा राबता असतो. एक मार्च २०२० पासून इथे प्रवाशांना मोफत फिरता येत आहे. झेवियर बेटल यांनी लक्झम्बर्गच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली. निवडणूक प्रचारादरम्यान त्यांच्या पक्षाने मोफत वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्याचं आश्वासन दिलं होतं. या आश्वासनानुसार सरकार मोफत प्रवास योजना लागू करत आहे. सरकारच्या या निर्णयाचा लाभ लक्झम्बर्गचे सहा लाख नागरिक, एक लाख ७५ हजार मजूर आणि वर्षभरात लक्झम्बर्गला येणाऱ्या १२ लाख प्रवाशांना होत आहे. सार्वजनिक वाहतूक सेवा मोफत उपलब्ध करून दिल्यामुळे गाड्यांची गर्दी कमी होत आहे. अधिकाधिक नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा लाभ घ्यावा, यासाठी हा निर्णय घेण्यात आला होता. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिक वापर केल्यास प्रदूषणाचं प्रमाणही कमी होते. लक्झम्बर्गमध्ये गाड्यांची संख्या प्रचंड आहे. इथली जवळपास ६० टक्के जनता प्रवासासाठी वैयक्तिक गाड्यांचा वापर करते. मात्र या निर्णयापासून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापराला प्रोत्साहन मिळाले आहे, हे मात्र नक्की.

## हुडहुडी भरवणारा आईस कॅफे

एखाद्या कॅफेमध्ये निवांत बसून कॉफीचे घोट घ्यायला कोणाला आवडणार नाही? उन्हाळात एसीवाल्या गारेगार कॅफेमध्ये खूप मस्त वाटतं. पण हा गारवा एसीऐवजी बर्फाचा असेल तर... काय मस्त वाटेल ना! हा गारवा अनुभवण्यासाठी तुम्हाला लडाखला जावं लागेल. लडाखमध्ये १४ हजार फूट उंचीवरच्या लेह-मनाली राष्ट्रीय महामार्गावर देशातला पहिला आईस कॅफे तयार करण्यात आला आहे. इथे मसाला चहा, आल्याचा चहा, मसाला मॅगी, बटर टी अशी पेयं आणि पदार्थ मिळतात. बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनने इथल्या चार तरुणांच्या साथीने हा कॅफे तयार केला आहे. लडाखमधल्या मीरू गावाजवळ हा अनोखा कॅफे तयार करण्यात आला आहे.




मॅकेनिकल इंजिनिअर सोनम वांगचुक यांनी साकारलेल्या एका प्रोजेक्टमुळे ही कल्पना सुचली. हा कॅफे अनोख्या पद्धतीने तयार करण्यात आला आहे. हा कॅफे पर्यावरणपूरक आहे. मे २०२० पर्यंत या कॅफेला भेट देता येईल. त्यानंतर बर्फाचा हा कॅफे वितळून जाईल. बर्फ वितळल्यानंतर पाणी वाया जाणार नाही, याचीही व्यवस्था करण्यात आली आहे. हे वितळलेलं पाणी साठवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. हे पाणी सिंचनासाठी वापरण्यात येणार आहे. या बर्फाच्या कॅफेमध्ये बसून गरमागरम मॅगी खायला आणि आल्याचा चहा प्यायला खूप मजा येईल हे नक्की! त्यामुळे पट्टीच्या पर्यटकांना या कॅफेचे वेध लागले असल्यास नवल नाही.



# IPL चा महासंग्राम

# बंगळुरु विजयी

## पंजाबला ७ विकेट्सने पराभूत करत पाचव्या विजयाची नोंद



७३* (५४)

**विराट कोहली**

**आयपीएलमध्ये सर्वाधिक वेळा म्हणजेच ६७ वेळा ५०+ धावा करणारा खेळाडू बनला**

१५ व्या षटकात विराट कोहलीने अर्धशतक ठोकले. त्याने षटकाच्या पाचव्या चेंडूवर एक धाव घेतली आणि ४३ चेंडूत त्याचे अर्धशतक पूर्ण केले. हे त्याचे आयपीएलमधील ५९ वे अर्धशतक होते. त्याने ८ शतकेही केली आहेत. कोहली आयपीएलमध्ये सर्वाधिक वेळा म्हणजेच ६७ वेळा ५०+ धावा करणारा खेळाडू बनला.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पंजाब :** इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेत रविवारी (२० एप्रिल) दुपारच्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने पंजाब किंग्सला त्यांच्याच घरच्या मैदानात पराभवाचं पाणी पाजलं. मुल्लनपूरला झालेल्या या सामन्यात बंगळुरूने पंजाबला ७ विकेट्सने पराभूत करत हंगामातील पाचव्या विजयाची नोंद केली आहे.विशेष म्हणजे ८ सामन्यांपैकी बंगळुरूने जे ५ सामने जिंकले आहेत, ते सर्व प्रतिस्पर्ध्यांच्या घरच्या मैदानात जिंकले आहेत.

या सामन्यात बंगळुरूने गोलंदाजी, क्षेत्ररक्षण आणि फलंदाजी अशा तिन्ही विभागात पंजाबपेक्षा वरचढ कामगिरी केली. तसेच या सामन्यात विजय मिळवत दोन दिवसांपूर्वीच शुक्रवारी (१८ एप्रिल) पंजाबकडून घरच्या मैदानात झालेल्या पराभवाचा वचपाही काढला.

रविवारी झालेल्या सामन्यात पंजाबने बंगळुरूसमोर १५८ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग बंगळुरूने १८.५ षटकात ३ विकेट्स गमावत पूर्ण केला. विराट कोहली आणि देवदत्त पडिक्कल यांनी शानदार अर्धशतकं झळकावली.

बंगळुरूकडून सलामीला फिल सॉल्टआणि देवदत्त पडिक्कल उतरले होते. पण पहिल्याच षटकात सॉल्टला अर्शदीप सिंगने जॉस इंग्लिसच्या हातून झेलबाद करत एकाच धावेवर माघारी धाडले. मात्र, त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या देवदत्त पडिक्कलने आक्रमक पवित्रा स्वीकारला. त्याला विराटकडून तोलामोलाची साथ मिळाली. या दोघांनी शतकी भागीदारी करत बंगळुरूच्या विजयाचा पाया रचला.

पडिक्कलने अर्धशतकही झळकावलं.पण अखेर १३ व्या षटकात त्याला हरप्रीत ब्रारने माघारी धाडलं. पडिक्कलने ३५ चेंडूत ६१ धावांची खेळी केली, या खेळीत त्याने ५ चौकार आणि ४ षटकार ठोकले. तो बाद झाल्यानंतर विराट कोहलीने जबाबदारी खांद्यावर घेतली आणि धावगती कायम ठेवली. त्यानेही शेवटी आक्रमक शॉट्स खेळले.

विराटचेही अर्धशतक पूर्ण झाले. त्याचे हे यंद्याच्या आयपीएल हंगामातील ८ सामन्यांमधील चौथे अर्धशतक आहे. त्याला कर्णधार रजत पाटिदाही साथ देत होता. पण पाटिदारला १७ व्या षटकात युजवेंद्र चहलने मार्को यान्सिनच्या हातून १२ धावांवर माघारी धाडले. पण नंतर विराट आणि जितेश शर्माने उर्वरित धावा पूर्ण करत बंगळुरूचा विजय निश्चित केला. जितेशने १८ व्या षटकाच विजयी षटकात खेचला. विराट ५४ चेंडूत ७ चौकार आणि १ षटकारासह ७३ धावांवर नाबाद राहिला. जितेश ८ चेंडूत ११ धावांवर नाबाद राहिला.

## IPL 2025
### आजचा सामना

कोलकाता नाईट रायडर्स

विरुद्ध

गुजरात टायटन्स



६१ (३५)

---

लोकपाल न्यायमूर्ती व्ही. ईश्वरैया यांचा आदेश

## उप्पल स्टेडियमवरून अझरुद्दीनचं नाव हटवण्याच्या सूचना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्टेडियममधून माजी भारतीय कर्णधार मोहम्मद अझरुद्दीन यांचं नाव हटवण्याच्या सूचना दिल्या गेल्या आहेत आणि त्यामुळे एक नवा वाद निर्माण झाला आहे. इंडियन प्रीमिअर लीग फ्रँचायझी सनरायझर्स हैदराबादसोबतचा वाद मिटतोय, तोच आता नवीन प्रकरण सुरू झाले आहे. हैदराबादमधील उप्पल येथील राजीव गांधी स्टेडियमच्या नॉर्थ पॅव्हेलियन स्टँडला भारताचा माजी कर्णधार मोहम्मद अझरुद्दीनचेनाव देण्यात आले होते. पण, एचसीएला ते नाव काढून काढण्याच्या सूचना केल्या गेल्या आहेत.

शिवाय क्रिकेट सामन्यांच्या तिकिटांवरही अझरुद्दीनचे नाव न छापण्याचे निर्देश दिले गेले आहे. शनिवारी HCA चे नीतिमत्ता अधिकारी आणि लोकपाल न्यायमूर्ती



व्ही. ईश्वरैया यांनी हा आदेश दिला.

लॉर्ड्स क्रिकेट क्लबने दाखल केलेल्या याचिकेवर लोकपाल कारवाई करत होते. हा हितसंबंधांच्या संघर्षाचा खटला आहे, कारण भारताचे माजी कर्णधार आणि एचसीएचे माजी अध्यक्ष अझरुद्दीन यांनी स्वतःच्या फायद्यासाठी वैयक्तिक निर्णय घेतला असल्याचे या कारवाईत समोर आले आणि त्यानंतर हे आदेश दिले गेले.

## पुण्यातील तीन संघ रोड टू ओल्ड ट्रॅफर्ड स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी पात्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे येथे पार पडलेल्या टप्प्यातील श्री वाईज मंकी (मुंबई), स्विग(पुणे), के- बार (गोवा) तीन संघ अपोलो टायर्स आयोजित रोड टू ओल्ड ट्रॅफर्ड या आगळ्यावेगळ्या फाईव्ह-अ- साइड फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम टप्प्यासाठी पात्र ठरल्या आहेत.

मँचेस्टर युनायटेड संघाचा पाठिंबा असलेल्या या स्पर्धेच्या पुणे येथील टप्प्यात या तीनही संघानी चमकदार विजयाची नोंद केली. अपोलो जीटीडी फुटबॉल संकुलात भारतीय फुटबॉल पटू ऍनस इडाथोडीका यांच्या उपस्थितीत आणि प्रचंड संख्येने उपस्थित असलेल्या प्रेक्षकांच्या प्रोत्साहनामुळे या संघांनी सलग विजयांची नोंद केली.

आता चेन्नई येथे लवकरच पार पडणाऱ्या अंतिम टप्प्यासाठी हे तीनही संघ दिल्ली येथील टप्प्यातून पात्र ठरलेल्या अन्य तीन संघांसह



सहभागी होणार आहेत. यात अंतिम टप्प्यासाठी मँचेस्टर युनायटेड संघाचा महान खेळाडू फील जोन्स उपस्थित राहणार आहे.

अपोलो टायर्स यांच्या उच्च दर्जाच्या कीर्तीप्रमाणेच या स्पर्धेतील खेळाडूंना सर्वोत्तम कामगिरी बजावून इंग्लंड मँचेस्टर येथील ओल्ड ट्रॅफर्ड या ऐतिहासिक मैदानावर होणाऱ्या तिसऱ्या मँचेस्टर युनायटेड आयोजित स्पर्धेसाठी पात्र ठरण्याची संधी मिळणार आहे.

अपोलो टायर्सच्या क्रीडा विपणन विभागाचे प्रमुख रेम्युज डिक्रुझ म्हणाले की, अंतिम टप्प्यासाठी पात्र ठरणाऱ्या सर्व संघांचे मी अभिनंदन करतो आणि ओल्ड ट्रॅफर्ड येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी पात्र होण्याकरिता त्यांना शुभेच्छा देतो. जगातील सर्वाधिक यशस्वी संघांपैकी एक असलेल्या मँचेस्टर युनायटेड संघाचे मूळ स्थान असलेल्या ऐतिहासिक ओल्ड ट्रॅफर्ड मैदानावर रोड टू ओल्ड ट्रॅफर्ड हा उपक्रम पार पडणार आहे. भारतातील फुटबॉल पटूना आपले कौशल्य दाखवण्यासाठी आम्ही हे जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. भारतातील युवा फुटबॉल पटू आपला खेळ उंचावण्यासाठी या संधीचा प्रेरणा म्हणून उत्तम उपयोग करून घेतील असा मला विश्वास वाटतो. भारतातील प्रत्येक शहरातील टप्प्याकरिता 20 संघानी भरघोस प्रतिसाद दिला होता. यावरूनच या स्पर्धेची लोकप्रियता सिद्ध झाली आहे


## जू-जित्सू क्रीडा शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



**पुणे :** जपान मधे उदयास आलेल्या जगातील पहिल्या ५ क्रमांकावर असलेल्या मार्शल आर्टस् प्रकारातील जू-जित्सू या क्रीडा प्रकारास जागतिक, आशियाई संघटनेची मान्यता मिळाली असून या खेळाचा समावेश आशियाई क्रीडा, जागतिक क्रीडा स्पर्धा तसेच जागतिक पोलिस क्रीडा स्पर्धेत करण्यात आलेला आहे. नुकतेच पुण्यातील व्हर्सटाईल जुनियर कॉलेज येथे घेण्यात आलेले पहिले मोफत जिल्हास्तरीय जु-जित्सू क्रीडा शिबिर उत्सहात पार पडले. पुणे शहरातून २२६ खेळाडूंनी शिबिरात सहभाग नोंदवला होता. शरीराची शक्ती, लवचिकता आणि स्नायूंची ताकद वाढवणाऱ्या तसेच मानसिक ताण तणावातून मुक्तता देणाऱ्या या क्रीडा प्रकारामधे विविध व्यायाम आणि तंत्रांचा वापर केला जातो या विषयीचे मार्गदर्शन आंतरराष्ट्रीय खेळाडू संतोष चोरमले व सौरभ किन्होळकर यांनी उपस्थित खेळाडूंना केले. शिबिराचे आयोजन जू-जित्सू असोसिएशन ऑफ पुणे चे सचिव राजेश पुजारी यांनी केले होते.

## योगेश इलेव्हन ॲकॅडमी संघाची विजयांची हॅट्रीक !!

**पुणे :** पुणे क्रिकेट ॲकॅडमी आणि सागर कांबळे स्पोटर्स मॅनेजमेंट तर्फे






आयोजित तिसऱ्या 'प्रशांतभाऊ शिंदे (पीएस) करंडक' १४ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब क्रिकेट स्पर्धेत योगेश इलेव्हन ॲकॅडमी सलग तिसरा विजय मिळवून विजयांची हॅट्रीक नोंदवली. २२ यार्डस ॲकॅडमी संघाने पहिला विजय मिळवून आपले गुणांचे खाते उघडले. स्वारगेट येथील पंडीत जवाहरलाल नेहरू स्टेडियम मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत अक्षया जाधव हिची अचूक गोलंदाजी आणि अद्विका जाधव आणि अथर्व वाशिवळे यांच्या फलंदाजीच्या जोरावर योगेश इलेव्हन संघाने तिसरा विजय मिळवला. पहिल्यांदा फलंदाजी करताना योगेश इलेव्हन ॲकॅडमीने १६ षटकामध्ये १९१ धावांचा डोंगर उभा केला. अथर्व वाशिवळे याने नाबाद ६२ धावांची आणि अद्विका जाधव हिने नाबाद ५४ धावांची खेळी केली. या दोघांनी पाचव्या गड्यासाठी ५४ चेंडूत १३७ धावांची अभेद्य भागिदारी रचली आणि संघाला मोठी धावसंख्या उभी करून दिली. या लक्ष्याचा पाठलाग करताना पुणे इन्स्टिट्युट ऑफ क्रिकेट संघाचा डाव ४१ धावांवर गडगडला. अक्षया जाधव हिने १२ धावांमध्ये ४ गडी टिपून पीआयओसी संघाच्या डावाला खिंडार पाडले.

'द क्यु कल्चर करंडक' खुली ९-बॉल पुल अजिंक्यपद स्पर्धा !!

## सोनु, तन्मय, ओंकार, साद, कौशल यांची विजयी कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :**पुणे जिल्हा बिलीयडर्स आणि स्नुकर संघटना (पीडीबीएसए) यांच्या मान्येतेखाली आणि क्यु कल्चर क्लब आणि अॅपेक्स् स्पोटर्स तर्फे आयोजित 'द क्यु कल्चर करंडक' खुली ९-बॉल पुल अजिंक्यपद स्पर्धेत सोनु मातंग, तन्मय जातकर, ओंकार ताकवले, साद सय्यद आणि कौशल चंद्रशेखर





यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा संघर्षपूर्ण पराभव करून आगेकूच केली.

वानवडी येथील द क्यु कल्चर क्लब येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत स्नुकर क्लबच्या सोनु मातंग याने डेक्कन जिमखाना क्लबच्या गौरव देशमुख याचा ७-५ असा पराभव केला. ब्रेक द स्नुकर क्लबच्या तन्मय जातकर याने डेक्कन जिमखाना क्लबच्या अभिजीत रानाडे याचा ७-४ असा पराभव केला. स्नुकर क्लबच्या ओंकार ताकवले याने दोन विजयांची नोंद केली. पहिल्या सामन्यामध्ये ओंकारने आरव संचेतीचा ७-३ असा पराभव केला. दुसऱ्या सामन्यामध्ये ओंकारने कार्तिक दिवेदी याचा ७-६ असा संघर्षपूर्ण पराभव करून आगेकूच केली.

क्यु कल्चरच्या साद सय्यद याने स्नुकर क्लबच्या श्रेयस पेडणेकर याचा ७-३ असा पराभव केला. क्यु क्लबच्या कौशल चंद्रशेखर यानेसुद्धा दोन विजय मिळवले. कौशल याने स्नुकर क्लबच्या तहा खानचा ७-३ असा आणि दुसऱ्या सामन्यात खलिल अस्लम याचा ७-० असा पराभव केला.

बिली जीन किंग २०२५ आशिया ओशनिया गट 1

# महिला टेनिस स्पर्धेत भारताचा प्ले ऑफमध्ये प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्य लॉन संघटनेच्या वतीने आयोजित व अखिल भारतीय टेनिस संघटना आणि पीएमडीटीए यांच्या सहकार्याने बिली जीन किंग कप 2025 आशिया ओशनिया गट 1 महिला टेनिस स्पर्धेत पाचव्या दिवशी सुहाना भारत संघाने कोरिया रिपब्लिक संघाचा 2-1 असा पराभव करून सलग चौथ्या विजयासह गुणतालिकेत दुसरे स्थान कायम राखत प्ले ऑफमध्ये प्रवेश निश्चित केला. भारत संघाने 5 सामन्यात 1 पराभव, 4 विजय प्राप्त केले. भारताबरोबरच न्यूझीलंड संघाने देखील प्ले ऑफमधील आपला प्रवेश निश्चित केला आहे.

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथे पार पडलेल्या या स्पर्धेत पाचव्या दिवशी पहिल्या एकेरीच्या लढतीत भारताच्या श्रीवल्ली रश्मिका भामीदीप्ती हिने कोरिया रिपब्लिकच्या सोह्युन पार्कचा 5-7, 6-3, 7-6(5) असा पराभव करून संघाचे खाते उघडले. हा सामना 2 तास 52 मिनिटे चालला. सामन्यात श्रीवल्लीने सुरेख सुरुवात करत सोह्यूनची चौथ्या गेममध्ये सर्व्हिस रोखली व सामन्यात 3-1 अशी आघाडी घेतली. पण ही आघाडी श्रीवल्लीला फार काळ टिकवता आली नाही. सोहयुन हिने आक्रमक खेळ करत सातव्या, अकराव्या गेममध्ये सर्व्हिस ब्रेक केली व स्वतःची सर्व्हिस राखत हा सेट 7-5 असा जिंकून आघाडी मिळवली. दुसऱ्या सेटमध्ये श्रीवल्लीने जोरदार पुनरागमन करत सहाव्या, आठव्या गेममध्ये सोह्यूनची सर्व्हिस भेदली व हा सेट 6-3 असा जिंकून सामन्यातील आपले आव्हान



कायम राखले. तिसऱ्या व निर्णायक सेटमध्ये सामन्यात 5-5 अशी बरोबरी असताना अकराव्या गेममध्ये श्रीवल्लीने सोह्यूनची, तर बाराव्या गेममध्ये सोह्यूनने श्रीवल्लीची सर्व्हिस ब्रेक केली व सामन्यात 6-6 अशी बरोबरी झाली. त्यामुळे हा सेट टायब्रेकमध्ये गेला. टायब्रेकमध्ये श्रीवल्लीने आपल्या बिनतोड सर्व्हिसेसच्या जोरावर हा सेट 7-6(5) असा जिंकून संघाला विजय मिळवून दिला. श्रीवल्लीने आपल्या खेळीत 12 एसेससह आपले वर्चस्व राखले.

दुसऱ्या एकेरीच्या लढतीत कोरिया रिपब्लिकच्या देयोन बॅक हिने भारताच्या सहजा यमलापल्लीचा 6-3, 6-4 असा पराभव करून संघाला बरोबरी साधून दिली. हा सामना 1 तास 45 मिनिटे चालला. सामन्यात बॅकने सहजाची दुसऱ्या व आठव्या गेममध्ये सर्व्हिस भेदली व हा 6-3 असा जिंकला. दुसऱ्या सेटमध्येदेखील बॅकने आपला रंगतदार खेळ सुरु ठेवत सहजाची तिसऱ्या व पाचव्या गेममध्ये सर्व्हिस रोखली व सामन्यात 5-1 अशी आघाडी प्राप्त केली. सहजाने आपली आक्रमणाची धार अधिक तीव्र करत आठव्या गेममध्ये बॅकची सर्व्हिस भेदली व स्वतःची सर्व्हिस राखत सामन्यातील 4-5 ने कमी केली. पण आघाडीवर असलेल्या बॅकने स्वतःची सर्व्हिस राखत हा सेट 6-4 असा जिंकून सामन्यात विजय मिळवला.

तिसऱ्या व निर्णायक दुहेरीच्या लढतीत सामन्यात सुरुवातीला ४-४ अशी बरोबरी असताना नवव्या गेममध्ये अंकिता रैना व प्रार्थना ठोंबरे जोडीने नवव्या गेममध्ये डेबिन किम व सोह्युन पार्कची सर्व्हिस रोखली व स्वतःची सर्व्हिस राखत हा सेट 6-4 असा जिंकून आघाडी मिळवली. दुसऱ्या सेटमध्ये भारताच्या जोडीने पहिल्याच गेममध्ये कोरियाची सर्व्हिस रोखली, पण चौथ्या गेममध्ये कोरियाने भारताची सर्व्हिस रोखली व २-२ अशी बरोबरी निर्माण केली. पाचव्या, सातव्या, नवव्या गेममध्ये अंकिता व प्रार्थनाने कमालीचा खेळ दाखवत डेबिन किम व सोह्युन पार्कची सर्व्हिस रोखली व स्वतःची सर्व्हिस राखत ६-३ असा पराभव करून संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

अन्य लढतीत मॅन यीन मॅगी एमजी, एड्युस चोंग यांच्या विजयी कामगिरीच्या जोरावर हाँगकाँग-चायना संघाने गुणतालिकेत अव्वल स्थानी असलेल्या न्यूझीलंड संघाचा 2-1 असा पराभव केला. थायलंड संघाने चायनीज तैपेई संघाचा 2-1 असा पराभव केला. विजयी संघाकडून लानलाना तारारुडी, पॅचरिन चीपचंडेज, पेंगतारण प्लिपूच यांनी सुरेख कामगिरी करून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

#रा